श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग



# पावनपथ

डॉ. सुहास पेठे

॥ श्री ॥

# पावनपथ

( श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग )

**डॉ. सुहास पेठे**

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* पावनपथ

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : मार्च २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

श्री कृष्णदास महाराज
यांचे चरणी
प्रार्थनापूर्वक
ही विवरणसेवा अर्पण...

'जन्मोजन्मी मज भक्तीच घडावी !'

- सुहास पेठे

# पावनपथावर चालताना...

पूर्वाश्रमीचे श्री. कृष्णाजी दत्तात्रय गोगटे तथा श्री कृष्णदास महाराज, यांच्या अल्पवयातल्या समाधिगमनाला या चैत्र शु. षष्ठी १९३७ला शंभर वर्षं पूर्ण होत आहेत. साधारण सोळा वर्षं अध्ययन, दहा वर्षं अध्यापन आणि अखेरची नऊ वर्षं कट्टर परमार्थ साधन - असा केवळ चौतीस वर्षांचा हा अलौकिक प्रवास २२ मार्च, १९१५ रोजी रात्री ११ वा. ४० मिनिटांनी श्री रामदासचरणी तदाकार झाला.

स्वतःची उत्तम शैक्षणिक घडण, उत्कृष्ट हस्ताक्षर, एकेक विद्यार्थी घडवण्यासाठी घेतलेले अपार कष्ट, नंतरच्या काळात एकेक शिष्य तयार करण्यासाठी बाळगलेली अहोरात्र तळमळ आणि या साऱ्यांत अखंड टिकवलेलं आपलं रामदास्य - असा हा सारा थोडक्यात पण अलौकिक जीवनप्रवास आहे.

गुरुदेवांनी वेळोवेळी लिहून ठेवलेल्या पद्य-गद्य वाङ्मयाचं संकलन 'श्री गुरुबोध' या नावानं त्यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यतिथीच्या वेळी, १९४०ला प्रथम प्रकाशित झालं. त्यानंतर आता मधल्या काळात त्याच्या, तीन आवृत्त्या प्रसिद्ध होऊन, या शताब्दीच्या महोत्सवात या गुरुबोधाची पाचवी विस्तारित आवृत्ती श्री गुरुबंधू मंडळाच्या पुढाकारानं प्रसिद्ध होत आहे. गेल्या शंभर वर्षांमध्ये गुरुदेवांच्या हातची पत्रं, अभंग, - अशा अनेक ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध लागला. त्याचा यथोचित आढावा या विशेष आवृत्तीच्या उत्तरार्धात घेण्यात आला आहे, ही गुरुदेवांचीच कृपा होय. जिज्ञासू साधकांनी गुरुबोधाची ही पाचवी आवृत्ती कृष्णधामशी संपर्क साधून अवश्य पाहावी, ही विनंती.

गुरुदेवांच्या निर्याणानंतर बरोबरीच्या गुरुबंधूंनी, आपल्या गुरूंचं आवडतं शिक्षणकार्य अकोला (उमरी) या भागात सत्तर-ऐंशी वर्षं, गुरुदेवांसारखंच ब्रह्मचर्य व्रत पाळून, राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्याला पूर्ण वाहून घेऊन, निरंतर सुरू ठेवलं. त्याचबरोबर कृष्णधामच्या

समाधिस्थानी राहून काही गुरुबंधूंनी समाधीजवळ नित्योपासना व वार्षिक उत्सव तितक्याच निष्ठेनं सुरू ठेवले. तसंच, साधनेला इथं येणाऱ्या साधकांची मोठी सेवाही पूज्य सबनीस मास्तर, तसंच सध्या श्री. शामराव नाळे व कुटुंबीय यांनी निष्ठेनं सुरू ठेवली आहे. त्याला अकोल्याच्या संस्थेचं सहकार्य मिळतं. अगदी प्रथमपासून स्थानिक पातळीवर कार्य करणारे आणि नित्याची सेवा करणारे गुरुबंधू मंडळाचे सध्याचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब चावरे, त्यांचे सहकारी बंधू आणि गेली अनेक वर्षं, हे स्थान सांभाळीत आहेत. अनेक व्यक्तींच्या सक्रिय सहभागानं गेली शंभर वर्षं त्यांनी ही समाधिस्थानाची सेवा आणि विकासकामं नित्यनेमानं सुरू ठेवली आहेत.

आजवरच्या गुरुबोधाच्या आवृत्त्यांतून गुरुदेवांनी वेळोवेळी लिहून ठेवलेले, आपल्या शिष्यांना पत्रानं कळवलेले श्लोक, सवाया, अभंग - अशा अनेक रचना एकत्रित करून, प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न मोठ्या कटाक्षानं त्यात्या वेळच्या आवृत्तीच्या संपादकांनी व व्यवस्थापकांनी केला. त्यासंबंधीची माहिती समोर असावी म्हणून या सर्व आवृत्त्यांच्या प्रस्तावना गुरुबोधाच्या आत्ताच्या आवृत्तीत देण्यात आल्या आहेत.

साताऱ्यात आल्यानंतर गेली सुमारे बावीस वर्षं, माझा श्री कृष्णदास महाराजांच्या कृपेनं, साधनेच्या निमित्तानं, कृष्णाकाठी असलेल्या या समाधिस्थानाचा संबंध आला. त्यात झालेल्या दृष्टांतांनी मला श्री गुरुदेवांच्या सूक्ष्म अस्तित्वाचा आणि कृपेचा प्रत्ययही अनेकदा येऊन गेला. त्यांच्या गुरुबोधातले अनेक अभंग म्हणण्यात आले. आमच्या घरी आणि आत्ताच्या वास्तव्याच्या, संतनगरी या ठिकाणी असलेल्या, संतछाया या उपासनेच्या हॉलमध्ये चिंतन-निरूपणाच्या निमित्तानं गुरुदेवांच्या उपदेशाचा अधिकच परिचय झाला. त्याचबरोबर त्यांची काही सूक्तिसुमनं, हस्तलिखितांतून मिळालेलं काही साहित्य आणि विशेषतः गुरुबोधामध्ये ग्रथित झालेले ११९ श्लोक - हा माझ्या वैयक्तिक चिंतनाचा नेहमीचा विषय राहिले आहेत.

या स्थानासंबंधी आणि गुरुदेवांसंबंधी काही परिचयात्मक

मजकूर लेखरूपानं प्रसंगोपात दिला होता. परंतु या मनाच्या श्लोकांचं, श्लोकपंचकाचं किंवा एकूणच उपदेशाचं थोडं तरी स्वतंत्र चिंतन आपल्याकडून घडावं, ही इच्छा श्री कृष्ण महाराजांच्या कृपेनं 'पावनपथ'च्या या प्रकाशनाच्या रूपानं, आज आकाराला येत आहे. त्यातल्या विवरणातल्या त्रुटी, उणिवा, अपुरेपणा यांबद्दल उदार वाचकांनी क्षमा करावी. श्री कृष्ण महाराजांच्या उपदेशाच्या प्रकाशात रामरायाकडं नेणारा हा पावनपथ कुणाला दोन पावलं चालता आला तरी, ती मी त्यांची कृपा आणि माझं भाग्य समजतो.

गुरुदेवांनी आपल्या आयुष्यातली शेवटची साधनेची तीनेक वर्षं, माहुलीच्या ज्या रामेश्वर घाटावरच्या रामाच्या ओवरीत काढली, त्या घाटाचं, ओवरीचं दर्शन आज शंभर वर्षांनीही खूप सुस्थितीत आपल्याला घडतं आहे. त्यातून प्रेरणा मिळते आहे, हे आपलं भाग्य होय. या दर्शनाची झलक आज कृष्णदास महाराजांच्या उपदेशाच्या संक्षिप्त विवरणाच्या 'पावनपथ' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पाहायला मिळावी, म्हणून धडपडणाऱ्या माझ्या सहकारी साधकांचा मी ऋणी आहे. कृष्णधाम हे कृष्ण महाराजांचं समाधिस्थान मजप्रमाणं आज इतर असंख्य साधकांनाही प्रेरणा देत आहे. तशीच ती प्रेरणा त्यांच्या बोधाच्या मार्गानंही मिळत राहो, ही या विवरणाच्या रूपानं, गुरुदेवांच्या व साधकांच्या चरणी नम्र प्रार्थना..!

संतछायेतली ही प्रकाशनं अव्यावसायिक रूपानं आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्व साधकबंधुभगिनींचा मी पुन्हा एकदा ऋणी आहे. त्यांची सर्वांची सेवा श्री संतांच्या चरणी रुजू असो आणि त्या सर्वांची कृपा सर्व साधकमंडळींच्यावर राहो..!

संतछाया,
सुहास पेठे

# पावनपथ

## अनुक्रम


१. 'नसे लाभ हा अन्य देहांतरासी' ..९

२. 'बहू निश्चये इच्छिसी तेचि होसी' ..१२

३. 'तरी हीत साधी, नको ती उपाधी !' ..१५

४. 'जिवाला शिवा भेटि, हा लाभ साधी !' ..१८

५. 'अता व्यर्थ देवावरी का रुसावे !' ..२१

६. 'जिवा हीत तू जाण रे जाण आता !' ..२४

७. ' म्हणोनि तुझा लोभ तेथेचि राहे !' ..२७

८. 'नसे भक्ति एका तनूनेचि होणे !' ..३०

९. 'नसे व्यर्थ चिंता मना या तनूची..!' ..३३

१०. 'नको रे मना तू उदासीन होऊ !' ..३६

११. 'सुटोनीच तू जाशि संसारतापा !' ..३९

१२. 'मना रामदासा तुझी सर्व चिंता !' ..४२

१३. 'विचारे पहा घोर संसार भासे !' ..४५

१४. 'तरी भोग तू या तनूचाचि मानी !' ..४८

१५. 'म्हणोनी मना संग सोडोनि राहे !' ..५१

१६. 'तुला भक्ति वैराग्य - हे ज्ञान शोभे !' ..५४
१७. 'तरी देह मी, हे नसावेचि ओझे !' ..५७
१८. 'मना संशयो हाचि बांधोनि पाडी !' ..६०
१९. 'अशी ती तुला होतसे बंधकारी !' ..६३
२०. 'सदा शांति देही न भीती भवाची !' ..६६
२१. 'जयाला क्रियेवीण संतोष आहे !' ..६९
२२. 'नसे आस बाह्यांतरी शुद्ध आहे !' ..७२
२३. 'नसे लोकभीती जयाला कधीही !' ..७५
२४. 'जया द्वेष आनंद होऊ शकेना !' ..७८
२५. 'असे भक्त निंदा स्तुती वेगळा तो !' ..८१
२६. 'मना प्राक्तने अंतरी वृत्ति आली !' ..८४
२७. 'तरि या रिती ब्रह्म होशी स्वभावे !' ..८७
२८. 'डहाळीनं आपल्याला धरलेलं नाही !' ..९०
२९. 'विधीला तुझे नाम मोठे कळेना !' ..९३
३०. 'धरा आस तुम्ही स्वये व्हाल राम !' ..९६
परिशिष्ट : कृष्णधाम व श्री कृष्ण महाराज यांचा संक्षिप्त परिचय ..९९

## १. 'नसे लाभ हा अन्य देहांतरासी'

मनुष्याला जन्म येतो तिथूनच त्याच्याभोवती साध्यासाध्या खेळण्यांपासून अनेक गोष्टी, वस्तू गोळा होत असतात. पहिल्यांदा, रडणारं मूल रमवण्यासाठी आजूबाजूची माणसं, अशा वस्तू त्याच्यासाठी ठिकठिकाणाहून गोळा करतात. त्यात्या वस्तू त्या मुलाचं मन रमवतातही. विशेषतः नवी वस्तू आली की, मुलाला तिच्याशिवाय चैन पडत नाही. सतत ती जवळ बाळगावी, इतरांबरोबर खेळावी - हा छंद त्याला लागतो. पण तीच वस्तू काही दिवसांनी जुनी झाली की, तिच्यातलं, खेळण्यातलं मन हळूहळू उडत जातं.

मग पुन्हा मोठ्यांना काम लागतं. ती माणसं नवनवी दुकानं, नवे बाजार, गावं हिंडून अशी नवी खेळणी, चित्रं, वस्तू, करमणुकीची साधनं शोधीत राहातात, गोळा करीत राहातात, आणीत राहातात. वयानुसार अशा वस्तूही सतत मोठमोठ्या, बदलत जाणाऱ्या आणाव्या लागतात. पुढं मुलं मोठी होत जातात, मिळवती होत जातात, तसा हा वस्तूंचा प्रवास, आता ती स्वतःच करू लागतात. निवडी करतात. पैसे मिळवतात, गुंतवतात. हा प्रवास तसा आयुष्य संपलं तरी, न संपणारा ठरतो.

सामान्य माणसांच्यात आणि जगाला शाश्वत सुखाचा मार्ग देऊन जाणाऱ्या संतांच्यात जर काही मोठा फरक असेल तर, तो हाच की, अनेकदा कुठल्यातरी सामान्य कुळात जन्माला आले, असा थोडा प्रवास कुटुंबाच्या ठेवणीप्रमाणं घडला तरी, ते त्या बाबतीत फार लवकर सावध होतात. आपल्याकडं असलेल्या वस्तू थोड्या खेळण्यापुरत्या, नकळत्या वयात त्यांनी वापरल्या तरी त्याबाबतीत ते आपल्यामानानं खूप लवकर सावध होतात आणि आपल्याकडची खरी मूल्यवान, सहज मिळालेली आणि आयुष्यभर पुरणारी वस्तू कोणती याचा उलगडा ते मोठ्या जिज्ञासेनं, कुणाच्या सांगण्यानं, सत्संगानं करून घेतात !

त्यामुळं सामान्य माणसाचा वेळ, हा या आयुष्यभर न संपणाऱ्या

वस्तू गोळा करण्यात आणि अर्थातच त्या अर्थानं मानवी आयुष्य व्यर्थ जाण्यात, जातो तो अशा संतांच्या बाबतीत जात नाही, असं आपल्याला आढळून येईल. तो काळ खूप असतो आणि तो वाचतो. आपल्याजवळच्या खऱ्या वस्तूची ओळख, तिची मर्यादा, तिचा उपयोग - यांचा इतका सुंदर मेळ ते त्यांच्या जीवनात चांगल्या ग्रंथाच्या अभ्यासानं, श्रवण-मननानं, प्रयोगानं घालतात की, त्यांच्या स्वतःच्या आयुष्याचं ते सार्थक करून जातातच, पण इतर असंख्य लोकांनाही स्वास्थ्याच्या ईश्वराकडं नेणारा पवित्र-पावन मार्ग आखून देतात. चालायला सोपा करून देतात. अनेकांचं कल्याण करून जातात.

अशा संतांच्या जीवनात आढळणारी आधी म्हटली तशी लवकर येणारी सावधानता, त्याचा त्यांनी करून घेतलेला उपयोग, त्यातून त्यांनी घालून दिलेला मार्ग चालणं - ही खरं केवढी भाग्याची गोष्ट आहे, याची कल्पना येणंही कठीण आहे. त्यासाठी संतचरित्र, त्यांची वचनं, वाङ्मय, कुणाकडून श्रवण - असं भाग्य आपल्या वाट्याला आलं तर त्यासारखी कृपा नाही. जरी ते आपोआप आलं नसलं तरी, अशा वस्तू गोळा करून करण्यापेक्षा असं भाग्य मिळावं म्हणून कष्ट घेतले तर, त्याचा उपयोग तरी आपल्याला नक्की करून घेता येईल.

वर म्हटलं तसं अनेक संतांच्या आयुष्यात बालपणीएवढी अनुकूलता नसतेच. श्री ज्ञानेश्वर माउली, ती भावंडं, श्री तुकोबाराय - अशी असंख्य उदाहरणं अशा संतांच्या बालपणची, त्या काळातल्या प्रतिकूलतेची कल्पना आपल्याला आणून द्यायला पुरेशी आहेत. अनुकूलता मिळाली तर त्यांनी अलौकिक काम लवकर केल्याचं आपल्याला आढळून येईलच पण जिथं प्रतिकूलतेत बालपणं गेली, तिथंही त्यांनी तितकंच काय, त्याच्यापेक्षाही अलौकिक काम करून जगाला कल्याणासाठी पवित्र-पावन मार्ग चालून दाखवले, त्यातले काटेकुटे उचलले, ते मार्ग सुखमय करायचा प्रयत्न केला, असं आपल्याला आढळून येईल. हे संतांचे जगावरचे मोठेच उपकार आहेत!

अशा आत्महित साधून शिवाय जगावर उपकार करून

जाणाऱ्या  अनेक पावन पथांतला एक छोटा पण मौलिक पावनपथ आपल्याला देऊन जाणाऱ्या अशाच एका संतांच्या पावन मार्गाचा त्यांच्या कृपेनं आपल्याला काही परिचय करून घेता येतो आहे का, हा श्रद्धेचा नम्र प्रयत्न आपण या छोटेखानी पुस्तकातून करूया.

ज्यांच्या समाधीची शताब्दी या चैत्र शुद्ध षष्ठीला - दि. २५ मार्च, २०१५ ला येत आहे, असे हा पावनपथ देणारे सत्पुरुष म्हणजे श्री कृष्णदास महाराज तथा श्री गुरुदेव होत. चार ओळींच्या एका श्लोकात त्यांनी आपल्यासाठी दिलेला संदेश आपण या पहिल्याच पावलावर पाहाणं आपल्याला सावध करणारं आणि हिताचं ठरेल...

'नसे नेहमी ही तनू तूजपाशी ।
जिचे आयु संपे पुढे काळ ग्रासी ।
बहू निश्चये इच्छिसी तेचि होसी ।
नसे लाभ हा अन्य देहांतरासी.. ।।'

श्री कृष्णदास महाराज यांनी प्रत्यक्ष सावध होऊन चाललेल्या या मार्गातला एकेक शब्द मोलाचा आहे. त्याचा आणि त्यांच्या या पावन मार्गाचा विचार आता आपण करूया...!

* *

## २. 'बहू निश्चये इच्छिसी तेचि होसी'

कितीही सामान्य मनुष्य असला तरी, साध्या दिवसाची सुरुवात करतानासुद्धा त्याच्या मनाशी कळत-नकळत दिवसासंबंधी, दिवसातल्या कामांसंबंधी एक विचार असतो. त्याचं तो मोठं नियोजन करीत असेल, असं नाही. परंतु उठून तोंड धुण्यापासून, रात्री झोपेपर्यंतचा एक दिनक्रम त्याच्या डोळ्यांसमोर असतो. दिवसात करायची कामं त्याच्या इच्छेनं, गरजेप्रमाणं त्यानं ठरवलेली असतात. आजच्या भाषेत बोलायचं झालं तर, हे त्याचं शॉर्ट रेंज प्लॅनिंग - दिनक्रमाचं नियोजन असतं. त्यासाठी तो दिवसभर कष्ट करून ते पूर्ण करायचा प्रयत्नही करतो.

मोठमोठ्या माणसांना आयुष्यात असंख्य कामं समोर असतात. त्यांनाही अशा तऱ्हेनं कामांचं नियोजन सकाळी करावं लागतंच. अलीकडं तर, कामाच्या नियोजनाचं, वेळेचं, साहाय्याचं, आढावा घेण्याचं - असं मोठं शास्त्रही झालं आहे. त्याचा उपयोग आज तरी विशेषतः व्यावहारिक कामं पुरी करण्यासाठी, त्यातले प्रशिक्षित लोक जरूर घेत असतात, हे आनंदाचंच आहे. त्यामुळं व्यक्तींचाही लाभ होतो आणि अशा बुद्धिमान-सुशिक्षित लोकांच्यामुळं जगाचा व्यवहारही सुरळीतपणे चालतो.

यातही जसं या दोन्ही लोकांचं रोजच्या दिनक्रमाचं एक नियोजन असतं, तसंच ते कामांच्या स्वरूपाप्रमाणं पंधरवड्याचं-महिन्याचं-वर्षांचं अनेकांचं तर अनेक वर्षांच्या नियोजनाचं काम असू शकतं. काही ध्येयं किंवा त्यात्या इच्छा-गोष्टी पुऱ्या करायला एकच काय, अनेक वर्षंही जातात. परंतु त्यालाही एक नियोजन असतंच.

या साऱ्या कामांमध्ये मनुष्य विशेषतः एक गोष्ट गृहीत धरतो आणि एका अर्थानं ती सहज असल्यामुळं, विशेषतः विसरूनही गेलेला दिसतो, असं आपल्याला आढळून येईल. खरंतर ती गोष्ट सर्वांत मूलभूत आणि सर्वांत महत्त्वाची आहे.

अशी जर कोणती गोष्ट असेल तर, ती म्हणजे आपण माणूस आहोत. आपल्या या साऱ्या नियोजनात आपण आपलं माणूसपण गृहीत धरलेलं असतं. ते इतकं अंगभूत असतं की, ते आहे हे अनेकदा विसरूनही जातं. तसं ते विसरायलाही हरकत नाही. विसरून जाणंही स्वाभाविक आहे पण ते आपल्या हिताचं नसतं, हे मात्र विसरून चालणार नाही. संत नेमकी जाणीव करून देतात ती, या शाश्वत सत्याचीच. म्हणून कृष्ण महाराज म्हणतात, 'नसे लाभ हा अन्य देहांतरासी !'

म्हणजे काय, याचा थोडासा अगदी सामान्य उलगडा करून घेऊ. आपल्याला माणसांच्या जगात राहायची जास्तीत जास्त सवय असली तरी, लहानपणापासूनच पाल, उंदीर, मांजर, कुत्रं, वासरू, पशुपक्षी - अशा सृष्टीतल्या अनेक सजीव प्राण्यांशीही आपला संबंध येत असतो. त्यांचं जगणं आपण पाहात असतो. सरसर जाणारी पाल पाहातो. पळापळ करणारे उंदीर पाहातो. झेप टाकणारी मांजरं पाहातो. इतकंच काय पळणारी हरणं, बावरलेले ससे, पाला खात हिंडत असणाऱ्या शेळ्या-मेंढ्या, तर त्यांच्यावर हल्ला करणारे हिंस्र लांडगे, वाघ - असे अनेक वन्य प्राणीही आपण पाहातो. सहज पाहायला न मिळाले तर, मुद्दाम सहली काढूनही पाहातो.

हे सारं पाहाताना, आपल्याला सृष्टीतले इतर प्राण्यांचे देह, त्यांचे व्यवहार, त्यांचे खेळ, त्यांचा हिंसकपणा - हे सारं दिसत असलं तरी, आपल्या आणि त्यांच्या सजीव देहांमध्ये वरवर प्राणी आणि मनुष्य एवढाच भेद दिसत असला तरी, त्यावर अधिक विचार किती लोक करीत असतील ?

खरंतर, एक साधा विचार आपल्या मनात येऊन जायला काय हरकत आहे ? आपल्यातलाच एक सामान्य माणूस कुठंतरी एखाद्या चांगल्या कार्याशी परिचित होतो, काही उदात्त ध्येय डोळ्यांसमोर ठेवतो आणि निश्चयानं त्याचा पाठपुरावा करून, आयुष्यात तसा ते ध्येय साध्य करून जातो. इतकंच काय, इतर सामान्य माणसांसारखे विकार, विचार, भय, संकुचितपणा - असलं जीवन जगणारा सामान्य माणूसही

जर त्यानं मनाशी तशी पक्की आणि अत्युच्च देवत्वाची इच्छा धरली त्यासाठी हे सारं आयुष्याचं नियोजन शक्यतो वेळेत केलं तर, आहे त्या जन्मात माणसाचा प्रत्यक्ष देव होऊन जाऊ शकतो. संत या अर्थानं माणसाचे देवच होतात.

यात विचार करून पडण्यासारखा किंवा संतांनी आपल्याला जाणवून द्यावा, असा प्रश्न कुठला ? तर, हा जो लाभ मनुष्याचा देह आणि देहांतर म्हणजे इतर प्राण्यांचे देह - यांत मुळात आहे, तो खरा सहज पडण्यासारखा प्रश्न असायला हवा. एकतर, विचारशक्ती, कल्पनेची झेप - यांचा अपुरेपणा आहेच पण प्राण्यांनी ठरवलं तरी, त्याला उंदराचं मांजर किंवा मांजराचा वाघ निश्चय करूनही होऊन जाता येत नाही. मनुष्यत्व - देवत्व हे तर आणखी फारच दूर ! जी गोष्ट माणसाला मनुष्याचा देह आला म्हणून कळू शकते. सामान्य मनुष्यसुद्धा नियोजन करून, रंकाचा राजा होऊन जाऊ शकतो आणि विचारानं त्याहीपेक्षा झेप घेऊ शकला तर, तो प्रत्यक्ष देव-संत होऊन मुक्त होऊन जाऊ शकतो. जगाचं कल्याण करून जाऊ शकतो ती वेळीच लक्षात येणं, पूर्ण निश्चयानं त्यासाठी नियोजन करणं आणि असा हा दुर्लभ लाभ इतर देहांत नाही, याची सतत जाणीव ठेवणं, ते भाग्य ओळखणं - यांपेक्षा आपल्या आयुष्यात संतांनी आपल्याला जाग देण्याची सर्वांत मोठी गोष्ट कोणती असेल, याचा आता आपणच विचार करावा ! म्हणून, कृष्णदास महाराज म्हणतात ते नित्य मनन करण्यासारखं आहे -

'बहू निश्चये इच्छिसी तेचि होसी ।
नसे लाभ हा अन्य देहांतरासी..!'

* *

## ३. 'तरी हीत साधी, नको ती उपाधी !'

एकदा इतर प्राण्यांचे देह आणि आपला मनुष्य देह - यांतला फरक लक्षात आला की, माणसाच्या आयुष्यात खऱ्या अर्थानं सावधानतेची पहाट होते. अर्थात, बाहेरही रोज उजाडतं, मनुष्याला जाग येते. सकाळ होते. त्याचे व्यवहार सुरू होतात. पण एका नव्या दिवसाच्या रूपानं ही पहाट आपल्या आयुष्यात एक नवी संधी घेऊन आलेली आहे, याची जी जाणीव त्याला सकाळी उठताना असते, ती तशी टिकून राहीलच याची मात्र खात्री नसते.

जगाच्या रहाटीबरोबर कुटुंबाच्या, नोकरीधंद्याच्या कामाबरोबर एकदा एखाद्या मनुष्याचा दिवस सुरू झाला की, सहसा अशा वेगळ्या संधीचीही जाग कधीतरी नकळत विरून जाते. इतरांबरोबरच आपली प्रापंचिक आंघोळी-पांघोळीसारखी आन्हिकं उरकताउरकता मनुष्य प्रापंचिक गप्पांत-विषयांत, कालच्या राहिलेल्या गोष्टींच्या आठवणींत, आजच्या दिवसाच्या करायच्या कामांत, मिळवायच्या-आणायच्या गोष्टींत विचारानं नकळत गुंतत जातो.

त्यात इतर माणसंही साधारणपणे याच पद्धतीनं जगणारी असल्यामुळं एकमेकांच्या गप्पा, गोळा करायच्या वस्तू, येणं-जाणं, देणं-घेणं - असा एकमेकांच्या नादानं दिवस कसाकसा पुढं जातो, हेही अनेकदा कळत नाही. पहाट झाल्यानंतर आलेली सावधानता ही एखाद्याच्या घरात अनेकदा त्याच्याच वाट्याला आलेली असते. अनेकदा त्याला इतरांची त्यात मदत नसते, साथ नसते. अनेकजण तर त्या कुठल्या विचारातही नसतात. त्यामुळं ही जाग टिकून वाढत राहाण्याऐवजी, विसरून मागं पडण्याचाच धोका नेहमी जास्त असतो.

म्हणूनच अनेकदा मनुष्याचा देह लाभून, त्याची जाग येऊन, त्याचा उपयोग प्रत्यक्षात फार कमी वेळा घडून येताना दिसतो. मी मनुष्य म्हणून तर श्रेष्ठ आणि विलक्षण क्षमतेचं आयुष्य घेऊन आलेलो आहे, याची जाणीव आणि सावधानता यांचा उपयोग आपण करून

घ्यायचा ठरवला तरी, त्यात पुन्हा इतरांना साधारणपणे त्याचं कुठलं महत्त्व नसल्यामुळं, त्यांच्याकडून अशा विचारांना किंवा त्यानुसार कृतींना बळ मिळत नाही. उलट अनेक ठिकाणी तर, असल्या विचारांना प्रोत्साहन देण्याऐवजी ते दुबळे,अनावश्यक, निराशाजनक विचार समजले जातात. जगाला अपेक्षित असलेला मोठेपणा, महत्त्वाकांक्षा, सत्ता, स्पर्धा, मानमान्यता - अशा गोष्टींना याची काही आवश्यकता नाही, उलट ते मारकच आहेत - असे विचारही अनेक अपरिपक्व लोक करीत असतात आणि दुर्दैवानं त्यांचाच संबंध आपल्या प्रपंचात जास्त येतो.

त्याचा परिणाम म्हणून मनात कुठं एखादा चांगला विचार, एखादी देवत्वाची, सावधानतेची जाणीव मूळ धरीत असलीच तर ती, अधिकच मरगळून जाते. वेळी चुकीचीही वाटायला लागते. प्रवाहाबरोबर वाहाणं केव्हाही मनालासुद्धा सोपं ठरत असल्यामुळं मनाचा कलही त्या दिशेनंच जास्त असतो.

म्हणूनच आधीच्या प्रकरणात आपण पाहिल्याप्रमाणं मनुष्याचा कल जास्तीत जास्त माणसं, वस्तू, सुखसाधनं - अशा गोष्टी गोळा करण्याकडंच जास्त सहजपणे होतो. गरजेसाठी तर माणसाला प्रपंच म्हणून काही गोष्टी लागतात, काही गोळा करायला लागतात, त्यासाठी कष्ट करावे लागतात, हे उघड आहे. पण राहण्याचं काम एका घरानंही होतं, एकाची चार घरंही बांधता येतात. गरजेच्या वस्तू दहा असतात आणि आपण पंचवीसही गोळा करू शकतो. माणसाला माणसं आठाची दहा लागतात पण तो ती पन्नास-शंभरही गोळा करू शकतो.

इथंच संत आपलं लक्ष वेधतात. त्यांचं म्हणणं यातल्या गरजेच्या गोष्टींना प्रत्येकाच्या आयुष्यात आवश्यक ते स्थान, प्रमाण असेलच, पण त्याबाहेर जाऊन तो जे जे गोळा करील, त्याची काळजी पुन्हा त्यालाच घ्यावी लागेल. राहात्या घराचा केर काढणं, हे काम त्याच्या हाताबरोबर, रोजच्या रोज होऊन जाईल. पण अजून दोन घरं त्यानं बांधून ठेवली असली तर मग मात्र त्याचे प्रश्न त्यानंच वाढवून ठेवले आहेत, हे उघड आहे. एकतर, ती घरं कुणाच्यातरी वापरासाठी

भाड्यानं किंवा कशी ती द्यावी लागतील. ते ती नीट सांभाळतात की नाही, हे त्यालाच पाहावं लागेल. रिकामी ठेवावी तर, त्याचा केर-कचरा काढणं, त्यांचा मेंटेनन्स-रखरखाव ठेवणं. स्वच्छता, रंगकाम अशा मार्गांनी ती नीट सांभाळणं - असली कामं ही अखेर त्यालाच करावी लागतात. ते शक्य नसलं तर, त्यासाठी कुणी नोकरवर्ग ठेवून त्यांच्याकडून करून घ्यावी लागतात. त्यासाठी खर्चवेच, लक्ष ठेवणं हे काम शेवटी त्याचं त्यालाच पडतं. या साऱ्यालाच त्याच्या वाट्याला आलेला दिवसातला-आठवड्यातला वेळ हा त्याचा त्यालाच द्यावा लागतो. त्यानं दोन घरं जास्त बांधली म्हणून काही त्याला कुणी दिवसाचे तास चोवीसच्या ऐवजी बहात्तर करून देत नाही. संतांचं म्हणणं असं की, यासाठी आपल्याला मनुष्याचा देह लाभला आहे काय ? ज्या गोष्टी त्याच्या गरजेच्या बाहेर तो करतो, त्यालाच ते 'उपाधी' असं म्हणतात.

उपाधींचं वैशिष्ट्यच हे की, त्या या जगरहाटीत कधी आपल्याला चिकटतात आणि वाळवीसारख्या आपला आयुष्याचा मोलाचा वेळ घेऊन जातात, ते आपल्यालाच कळत नाही. अडचण ही होते की, आपण खूप निश्चयानं मनुष्यदेहाचं सार्थक करायचा जो निश्चय केलेला असतो, त्याला वेळ द्यायला या साऱ्या उपाधी आड येतात आणि आपल्या स्वहिताचा नाश करून जातात. शेवटी देहाला आयुष्याची मर्यादा असतेच. म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात,

'तरी हीत साधी, नको ती उपाधी !'

अर्थात यासाठी उपाधीबद्दल सावधान होणं हे आता आपलंच काम आहे !

* *

## ४. ' जिवाला शिवा भेटि, हा लाभ साधी !'

आपण मनुष्य नकळत उपाधी कशा गोळा करीत जातो, ते पाहिलं. वस्तूला वस्तू, माणसाला माणूस, कामाला काम, संबंधाला संबंध - असं तो कितीतरी गोळा करतो. त्यांतलं खूपसं गरजेचंही नसतं. पण एकदा संबंध आला की, त्यात्या उपाधीसंबंधी त्याला स्वतःला काही ना काही करावंच लागतं. त्यानं ते नाही केलं तर, एका बाजूनं वाईटपणा येतो, दुसऱ्या बाजूनं मनाला रुखरुख राहते आणि तिसऱ्या बाजूनं, लोक त्यात्या गोष्टी तुमची इच्छा नसली तरी, तुमच्याकडून करून घेतातच आणि चौथ्या बाजूनं त्यातूनही तुम्ही त्या नाकारल्या तर, तुम्हाला सतत निंदेला सामोरं जावं लागतं.

गरजेनं कुणी कुणाचं काही करायला, कुणाचंच काय, संतांचंही काही म्हणणं नसतं. फारतर संत गरजा मर्यादित ठेवा, वेळ वाचवा, आणि तो आपण जे मनुष्यजन्माचं ध्येय ठरवतो त्या ध्येयासाठी द्या - असं म्हणतील. या उपाधींमुळं निर्माण होते ती अडचण मुख्यतः वेळाची आहेच, कारण माणसाला वाटतं खरं, पण कृष्ण महाराज म्हणतात तसं 'नसे नेहमी ही तनू तूजपाशी !'

माणसाला आपला देह आपल्या हातचा आहे, हाताशी आहे, तो कधीही कोणत्याही कामाला मला वापरता येऊ शकेल, असं वाटतं खरं. जरा विचार केला तर लक्षात येईल की, असे अनेक प्रसंग आहेत की, आपण अगदी रात्री उद्या सकाळच्या कामाचं नियोजन करतो, पहाटे पाचला उठून कुठं गावाला जायचं असतं. त्याची सारी तयारी करून ठेवतो. अगदी बॅग भरून तिकीट, पाकीट सारी तयारी करून ठेवतो. आता फक्त पहाटे उठून काय ते आवरायचं आणि निघायचं, इतकं हे सारं हातचं वाटतं.

रात्री नेहमीप्रमाणं लवकर उठण्यासाठी जरा लवकर झोपतोही. पण पहाटे कुठंतरी एक-दोन वाजता अंगात थंडी भरायला सुरुवात होते. पहिल्यापहिल्यांदा कुठं गार वारं सुटलं असेल, हवा बदलली असेल,

एखादं पांघरूण घेऊ, एवढ्यावर भागेल असं सहजपणे वाटतं. पण तासाभरात जी हुडहुडी भरू लागते, ती पांघरूणच काय, अंगावर गाद्या टाकल्या तरी, थांबत नाही.

दोन-तीन तासांनी सारे प्रथमोपचार केले तरी, लक्षात येतं की, आता आपल्याला प्रचंड थंडी भरून ताप चढत चाललेला आहे. कधीकधी तर त्याचं स्वरूप एवढं असतं की, चारपाच तासांत मनुष्याचं डोकं चढतं, त्याला हळूहळू शुद्ध हरपल्यासारखी वाटू लागते, तो असंबद्ध बडबडू लागतो, पहाटे चारला उठून आंघोळ-आवरणं वगैरे सारे विषय कुठल्याकुठं विसरून जातात.

हे जे काही नवीन सुरू झालं आहे, त्यासाठी आता पहाटे उठून गाडी-घोडं घेऊन, डॉक्टर, औषध, पळापळ - हाच कार्यक्रम सुरू होतो. ते एकदा मिळून हे सारं निदान आटोक्यात कसं येईल, हे प्रश्न जास्त भेडसावू लागतात. त्यातूनही ते आलेच आणि त्यांना त्यात काही गंभीर वाटलं, तिथं उपचार करता येणार नाहीत, असं वाटलं, आजार पुढंपुढं जातो आहे, त्याला काही वेगळी वळणं मिळताहेत, असं आढळलं तर, मग वातावरण आणखीच गंभीर होतं.

बरोबरीच्या साऱ्या माणसांची गाड्या काढून दवाखाने, हॉस्पिटलं, औषधयोजना, तपासण्या - अशा साऱ्या धडपडी सुरू होतात. हे सारं स्वाभाविकच आहे. पण यात हे लक्षात घेण्यासारखं आहे की, या साऱ्या प्रसंगात ते गावी जाणं, ते शे-पाचशे रुपयांचं वाया गेलेलं तिकीट, ती केलेली तयारी, तिथं जाऊ न शकल्यानं होणारं नुकसान - या साऱ्या गोष्टी कधी मागं पडल्या तेसुद्धा लक्षात येत नाही !

त्यात सर्वांत विचार करण्यासारखी गोष्ट ही की, ज्या आपल्या शरीराची हुकमी मदत आपण गृहीत धरलेली असते, जी आपल्याला एरवी होतेही, ते मूळ शरीरच आपल्या हाती नाही, हे एवढं सारं घडूनही माणसाच्या लक्षात येतंच असं नाही. उलट त्यानं सर्वांत हुकमी धरलेली मदत आयत्या वेळेला मुळातच गायब झाली आहे, त्याच्या हाती नाही, याइतकं लक्षात घेण्यासारखं सत्य नाही !

पण सर्वसाधारणपणे प्रत्येकाच्या घरी, आयुष्यात घडणारे असे असंख्य प्रसंग पाहूनही, त्यात्या वेळी घडणारं नुकसान-गैरसोय सारं अनुभवूनही मनुष्य या 'हुकमी' मदतीविषयी निश्चिंत असतो. सावधान होत नाही. सर्वांत आधारभूत असलेली मदत खरंतर आपल्या शरीराची. त्याच्या साहाय्यानं आपले हे पुढचे सारे व्यवहार, कामं, भले उपाधीसह सारं साध्य होणार असतं.

पण जे मुळात मी गृहीत धरतो, त्याच्यावरच माझी सत्ता नाही. ती कुणाची आहे, हेही लक्षात येत नाही, त्याचा विचार करावा लागेल, हेही लक्षात येत नाही - एरवी मोठमोठे विचार करणाऱ्या माणसाच्या बाबतीतला हे एवढे विचार सुचत नाहीत हा, केवढा भ्रम म्हणावा लागेल ? त्या शरीराच्या मदतीनं हे सारं होतं खरं, पण ते शरीर मी तसंच्यातसं सर्व कामांसाठी सतत गृहीत धरू शकत नाही, हे शाश्वत सत्य आहे. म्हणून सावधान होऊन, आपली कामं त्याची मदत मिळावी यासाठी शरीराला - ते देणाऱ्या ईश्वराला प्रार्थना करून, मी करावीत, हा संतांचा समजूतदार संदेश आहे.

त्यांचं म्हणणं त्याहीपुढं जाऊन थोडं असं आहे की, एकवेळ उपाधींची कामं नाही झाली तरी चालतील, पण मला आयुष्यात जी भगवंताची भेट घेण्याचं अपरिहार्य ध्येय आहे, ते तरी या शरीराची साथ मिळते आहे तोपर्यंत साधून घ्यावं. शरीराची ही साथ नेहमी नसल्यामुळं कृष्ण महाराज म्हणतात,

'नसे नेहमी ही तनू तूजपाशी..
..जिवाला शिवा भेटि हा लाभ साधी ।'

हे काम प्राधान्यानं करून घ्यावं, हे आपल्याच हिताचं आहे !

* *

## ५. 'अता व्यर्थ देवावरी का रुसावे !'

जगताना अनेक गोष्टी मनाविरुद्ध होतात. अनेक माणसं नको असताना वाट्याला येतात. अनेकदा आपल्या म्हणण्याचा विपर्यास होऊन आपल्याला लोक दोष देतात. अनेकांची समजूत घालूनही त्यांना आपलं खरं म्हणणं पटत नाही. अनेकदा योग्य प्रयत्न करूनही, यश का येत नाही, कळत नाही. अशावेळी सामान्य मनुष्य खंत करतो, नशिबाला दोष देतो, देवाला दोष देतो.

अर्थात, यातून दोष देत असताना, त्याला एक प्रकारचा नकारात्मक मानसिक आनंद मिळतो. असा दोष देण्यानं मूळ परिस्थितीत काहीच फरक पडत नाही. पण बाहेर एखाद्या कार्यात, कामात अपशय येतं, अपघात घडतात, दुर्दैवी गोष्टी होतात, तेव्हा त्यांचा दोष कुणावरतरी ढकलला की, उरलेल्या माणसांना आपण त्यातून सुटल्याचा एक फोल आनंद मिळतो. यातून काही साध्य होत नसतं, हे उघडच आहे.

तशीच थोडीफार अवस्था माणसाची आपल्याच जिवाशी खंत करताना जिवाला, लोकांना दोष देताना, होत असते. माझी इच्छा नसताना या गोष्टी घडल्या, मला नको असताना हे निर्णय घेतले गेले, ही माणसं वाट्याला आली, ही कामं करावी लागली - अशा अनेक प्रकारे अनेक माणसं आयुष्यभर खंत करीत असतात. त्याचा फारसा उपयोग नाही, हे एरवी त्यांच्या लक्षातही येतं. उलट त्यात त्यांच्याकडूनच विनाकारण स्वतःचं आणि इतरांचं मन कलुषित होत असतं. त्यामुळं अनेकदा अकारण संबंधही बिघडत असतात.

मूळ नुकसान झालेलंच असतं. नको असलेल्या परिस्थितीला सामोरं जावं लागतच असतं. त्या साऱ्यामुळं होणाऱ्या नुकसानीत या कलुषितपणामुळं काही न वाचता किंवा काही चांगलं न होता उलट भरच पडत असते.

या प्रसंगाला अनेकांना सामोरं जावं लागत असल्यामुळं

आपल्या जिवाला - मनाला उद्देशून कृष्णदास महाराज म्हणतात, 'तुझ्या या साऱ्या दोष देण्याचा, रुसण्याचा खरोखर काय उपयोग आहे, परिस्थिती आधीच आली होती. ती अजूनही तशीच आहे. तिच्यामुळं होणारा त्रासही होतोच आहे. मग हा दोष देऊन तू वेगळं काय साध्य करतो आहेस, याचा विचार करशील का ?'

'जर विचार केलास तर, उलट लक्षात येईल की, या जगात सरळसरळ कार्यकारणाचा संबंध आहे. कुठली घटना उगाच घडत नाही. कुणाची कुणाशी उगाच गाठ पडत नाही. कुणी कुणाला उगाच त्रास देत नाही. कुणी कुणाच्या गावाला-वाट्याला उगीच जात नाही. काहीच कार्यकारण संबंध नाही अशा कुठल्या त्रासाच्या गोष्टी जगात घडत नाहीत, हे कृपा करून लक्षात घे ! '

'आज जरी दिसताना या गोष्टी मनाविरुद्ध दिसल्या, कुणी अकारण त्रास देतं आहे , असं वाटलं, कुणी आपल्या वाट्याला उगीच आलं आहे, असं वाटलं - तरी तसं ठरवूनही कुणाला करता येणार नाही.'

'आज आपण अनेक चांगल्या गोष्टीही अनुभवतो. अनेक चांगली माणसं तसं कुठलं लौकिक कारण नसताना, आपल्याला भेटतात. अनेक माणसं संबंध नसतानाही आपलं कल्याण करून जातात. अनेकजण आपल्या हितासाठी झटताना दिसतात. अनेकजण संबंध नसताना आपल्याला मदत करून जातात. त्यावेळी आपण त्या साऱ्या चांगल्या अनुभवांच्या आनंदात असल्यामुळं आपल्या डोक्यात - असं का घडलं - असे विचार फारसे मनात येत नाहीत. उलट असंही वाटतं की, आपण त्यांच्याशी चांगलं वागलो म्हणून ती माणसं आपल्याला मदत करताहेत. आपली कामं करताहेत.'

'वास्तविक पाहिलं तर सगळं काही आपण त्यांनी चांगलं करावं असं केलेलं नसतं. अनेक माणसांचा तर आपला पूर्वी संबंधही आलेला दिसत नाही. त्यावेळी जिवाच्या हा विचार कधी मनात येतो का की, देवा किंवा हे मना, का बरं ही माणसं माझं सगळं चांगलं

करतात ? असल्या ठिकाणी अशा तक्रारी मनातसुद्धा येत नाहीत.'

'पण आधी म्हटले तसे त्रास वाट्याला आले की, मात्र जिवावर-मनावर रुसावंसं वाटतं. देवाकडं तक्रार करावीशी वाटते - हा सारा विचार करण्याचा मामला नाही काय ? माझ्या वाट्याला येणारं चांगलं जर माझ्या चांगल्या, विवेकी वागण्यामुळं आज येत असेल तर, ते सारं त्रासदायक, चुकीचं वाटणारं, मनाला ताप देणारं सारं वागणंही माझ्या आधीच्या त्यांच्याशी झालेल्या चुकीच्या वागण्यामुळं घडत असलं पाहिजे.'

'चांगल्या वागण्याला जर माझं कर्तृत्व कारणीभूत आहे तर, अशा वाईट, नकोशा असलेल्या, त्रासदायक अनुभवांनासुद्धा माझंच अविवेकी किंवा चुकीचं वागणं कारणीभूत असलं पाहिजे.'

खरंतर कृष्ण महाराज उलट लक्षात आणून देतात की, 'हे जिवा-मना, खरंतर प्रत्येकजण आपापला स्वार्थ साधण्यासाठी मुळात इतरांशी संबंध ठेवतो, वागतो, हे लक्षात घे. याला तू स्वतःही अपवाद नाहीस. सावध राहाणार नाहीस तर, तुझ्या लक्षात येईल की, तुझ्या पूर्वीच्या आयुष्यात तुझे इतरांशी असलेले संबंधही, असेच आपला आपला स्वार्थ पुरा करण्यासाठी होते. अर्थात, तसेच त्यांचेही तुझ्याशी संबंध होते. त्या संबंधांचे परिणाम हे अनेकदा लगेच दिसतात, असं नाही. चुकीच्या संबंधांचे परिणाम जसे एखाद्या आजाराला व्यक्त व्हायला उशीर लागावा, तसेच चांगल्या किंवा वाईट कर्मांचे परिणाम व्यक्त व्हायला, प्रत्यक्ष आपल्या बाबतीत घडायला-वेळ लागतो, हे लक्षात घे.'

म्हणून जिवाला ते समजावून देतात,

'आता व्यर्थ देवावरी का रुसावे ।
म्हणे दास जीवा मनासी पुसावे !'

हे त्यांचं म्हणणं लक्षात घेऊन जगलं तर जिवाला उगीच खंत करीत राहावं लागणार नाही.

* *

## ६. 'जिवा हीत तू जाण रे जाण आता !'

आपल्यावर येणाऱ्या बऱ्यावाईट संबंधांना, त्रासांना वेळी आनंददायक, मदतीच्या गोष्टींनासुद्धा आपलीच पूर्वकर्मं कारणीभूत असतात, हे आपल्याला कृष्ण महाराज लक्षात आणून देत आहेत. ते एकदा समजून घेतलं की, त्यांनी जिवाला उद्देशून 'जिवा जे तुवा पूर्वसंचीत केले । तयाचेमुळे भोग ठाकोनि आले ।' असं जे म्हटलं आहे ते समजून घेणं सोपं जातं आणि त्यामुळं मनाचं स्थैर्यही टिकून राहातं.

त्यांनी लक्षात आणून दिलेला दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रत्येकजण आपल्या स्वार्थाच्या - शरीराच्या हितासाठी - सुखासाठी एकमेकांना कामात आणीत असतो आणि तेच सर्वजण एकमेकांच्या बाबतीत करीत असतात. हा जगाचा स्वभाव आहे की, आपल्या हितासाठी लोकांना कामाला लावावं आणि लोकही त्यांच्या हितासाठी आपल्याला कामाला लावतात.

महाराज पुढं म्हणतात, हा व्यवहार एवढा तटस्थ आणि स्वार्थी आहे की, हे मना, हे लक्षात घे,

'तनूचे हिता लोक कामासी येती ।
परी त्या तनूला स्मशानीच नेती ।
तुझे आप्त आपुले हीत घेती ।
तुला रे जिवा काळ हातीच देती ।।'

आता ही जर जगातली वस्तुस्थिती असेल तर, ती आपल्याला जगरहाटीप्रमाणं स्वीकारावीच लागेल. पण त्याचा परिणाम अर्थातच स्वार्थ आणि तसे संबंध - यांमुळं जगात आपल्याला जगण्याला काही पर्यायच न उरण्यात होईल का, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तसं असेल तर आपली आयुष्यं ही पशुवत आणि तशी या अर्थानं साध्या भाषेत बाजारूच होतील.

म्हणून यावर स्पष्ट करताना, कृष्णदास महाराज म्हणतात की, जगात असा एकमेकांच्या स्वार्थांचा व्यवहार सुरूच राहील. पण

एकवेळ पशूंच्या जीवनाला तो लागू राहील तसं त्यांना जगावंही लागेल. मात्र मनुष्यजन्माचं वैशिष्ट्यच हे की, त्याला या स्वार्थाच्या व्यवहारांची, त्याच्यामुळं होणाऱ्या निकृष्ट जीवनाची ओळख होऊ शकते.

इतकंच काय, तो या स्वार्थाच्या विचारांच्या पलीकडे जाऊनही विचार करू शकतो. मनुष्यजन्माची जर ही कोणती पुण्याई असेल, श्रेष्ठत्व असेल तर, ते हे की, त्याला स्वार्थ ओलांडून विचार करता येतो, निःस्वार्थीपणे जगताही येतं. निसर्गतः त्याच्या मनात देहाच्या स्वार्थाविषयीच्या कल्पना या सहजपणे येत असल्या तरी, त्या ओलांडण्याचं सामर्थ्य त्याच्यात आहे.

स्वार्थी विचारांनी मनुष्यजीवनाला येणारी पशुजीवनाची कळा तो पालटू शकतो. निःस्वार्थी विचारातलं, तशा कृतीतलं आपलं हित तो ओळखू शकतो. स्वार्थाचे विचार हे सहज असले तरी ते तसेच केले पाहिजेत, तशाच स्वार्थी कल्पना करीत आपण जगलं पाहिजे, असं त्याच्यावर बंधन नाही.

उलट स्वार्थाच्या कल्पनांना तशा कृतींना आळा घालणारी विवेकी बुद्धी त्याच्या ठिकाणी विद्यमान आहे. ती जागृत करून देणं, तिला बळ देणं, तिनं आपलं कार्य करणं आणि माणसाला निःस्वार्थी जगण्यातलं आपलं हित जाणता येणं, हे मनुष्यजन्माचं मोठंच वैशिष्ट्य आहे.

माणसाच्या जीवनाला जेव्हा सगळ्यांकडूनच स्वार्थाच्या प्रेरणा मिळतात आणि तशा कृती प्रबळ होत राहातात, तेव्हा सगळीकडे क्षोभ, अशांती, भय, संघर्ष, अस्वास्थ्य - अशा जीवनाची निकृष्ट कळा येते. त्याचबरोबर उलट जर माणसाच्या ठिकाणचा हा निःस्वार्थीपणाचा, कर्तव्यांचा, विवेकाचा, सद्‌विचारांचा, सत्संगतीचा - असा विचार, अशा प्रेरणा जर प्रबळ होत जातील तर मनुष्यजीवन हे अर्थातच शांती आणि आनंद यांनीही उन्नत होईल, भरून जाईल, असंही घडू शकेल !

अशा प्रकारच्या प्रेरणा प्रबळ व्हाव्यात म्हणूनच संत आयुष्यभर धडपडत असतात. त्यांना त्यांचा जीवनाचा शांतिरूप भगवंताकडं नेणारा

पावनपथ सापडलेला असतो. तो चालून ते स्वतः आत्मानंदात असतातच. पण या मार्गाचा लाभ इतरांना व्हावा, अशा स्वार्थानं निकृष्ट झालेल्या मनुष्यजीवनाला उंची मिळावी, ते पालटावं आणि त्यांनाही हा भगवंताचा, निःस्वार्थी जीवनाचा विचार कळावा - यासाठी ते मोठ्या कळवळ्यानं उपदेश करतात, लेखन करतात, प्रत्यक्ष जगून दाखवतात.

अशा तऱ्हेचं जीवन जगायला मनुष्याला निःस्वार्थाचं, तशा कृतींचं, त्यामुळं जोडल्या जाणाऱ्या भगवंताचं, तशा कृतींनी भगवंताचं प्रेम लागून मिळणाऱ्या आनंदाचं - एक सततचं भान यावं लागतं. ते यावं, टिकावं यांसाठी भगवंताचं नाम सतत घेण्यासारखा सोपा मार्ग नाही, हे लक्षात आणून देताना, कृष्णदास महाराज म्हणतात,

'जिवा हीत तू जाण रे जाण आता ।
रघूनायकाला मनानेच गाता ।
स्वहीतासि तू जाण रामा भजावे ।
अखंडीत वाचे सदा त्वां जपावे !'

आता आपलं हित निःस्वार्थात, रामरायाचं मनानं, वाचेनं गुणगान करण्यातच कसं आहे, हे जाणून घेणं आणि जगणं आपलं कर्तव्यच आहे !

* *

## ७. ' म्हणोनि तुझा लोभ तेथेचि राहे !'

मनुष्यजन्माचं जे सर्वांत मोठं वैशिष्ट्य 'मनुष्यदेह' ते आपल्या लक्षात आलं. कृष्णदास महाराजांनी ते आपल्याला अधिक स्पष्ट करून सांगितलं की, 'मना, हे माणसाचं शरीर तुला मिळालं यासारखी पुण्यकारक गोष्ट नाही. इतर प्राण्यांच्या देहाकडं, त्यांच्या विचार, कल्पना, वासना, भय, आक्रमणं - अशा अनेक गोष्टी पाहिल्या की, या साऱ्याची सत्यता माणसाच्या नक्कीच लक्षात येते.'

माणसाचं हे वैशिष्ट्य आहे की, इतर देहांमध्ये पोटासाठी फिरणं, मोठ्या जिवांचं भय वाटणं, लहानसहान जिवांवर आक्रमण करणं, स्वतःचे वंश वाढवणं आणि कधीतरी कुणाच्या हाती किंवा निसर्गानं मरण पावणं एवढीच या साऱ्या पशुपक्ष्यांच्या आयुष्यांची व्याप्ती दिसते. हे सारं जीवन असं आहे, हे माणसालाच कळू शकतं. आपली जीवनं अशी आहेत, हे कळण्याची क्षमताही या पशूंच्या जीवनामध्ये नाही. एवढं लक्षात घेतलं तरी, माणसाला आपल्या पुण्याईची थोडीशी कल्पना येईल.

मनुष्याकडं या साऱ्या गोष्टी निसर्गानं आलेल्याही असतील. जर तो सावध नसेल तर, अशा तऱ्हेचं जीवन जगण्यातच त्याचंही आयुष्य जात असेल. विचार न करणाऱ्यांचं ते तसं जातानाही आपण बघतो. स्वतःच्या सुखाचे विषय असे इतर जिवांसारखे सतत चिंतीत राहाण्यानं, त्यासाठी धडपडत राहाण्यानं माणसांच्या जीवनालाही तशी सवय लागते.

परिणाम असा होतो की, मनुष्यजन्माची काही वैशिष्ट्यं ज्या काहींच्या लक्षात येतात, त्यांचा उपयोगसुद्धा अशा तऱ्हेचे विषयांचे, सुखाच्या साधनांचे उपभोग वाढवण्याकडे ते करीत सुटतात. याचं कारण काय असावं, हेही कृष्णदास महाराज आपल्या लक्षात आणून देतात.

ते असं म्हणतात की, 'ज्या गोष्टींच्या सहवासात मनुष्य सतत

राहातो त्यांची संगत त्याला लाभते, त्यांच्याविषयीच त्या व्यक्तीला आवड निर्माण होते,आपल्यात त्यापेक्षा वेगळं जगण्याचं सामर्थ्य असूनही मनुष्याला आपण असंच पशुसारखं जगू शकतो, असं नकळत वाटायला लागतं. लांडग्यांच्या कळपात चुकून आलेला सिंहाचा बछडा इतरांच्या संगतीनं स्वतःला साधा लांडग्यासारखा पशू समजायला लागावा,तशी अवस्था माणसाची अशा पशूंच्या जीवनाच्या संगतीमुळं होते.'

साधी डरकाळी फोडण्याचं सामर्थ्यसुद्धा एखादा छावा किंवा बछडा विसरून जावा आणि कुठल्या कोल्ह्यालांडग्यासारख्या पशूला लोभ वाटावा,तशा किरकोळ शिकारीचा लोभ त्याला पडावा,तशी अवस्था पशुजीवनाच्या अविचारी संगतीमुळं माणसांचीसुद्धा होऊ शकते.

माणसाच्या ठिकाणी, तो त्याचं सामर्थ्य ओळखील, पशुजीवनाच्या संगतीपासून दूर राहील, स्वतःच्या जीवनाचं सामर्थ्य ओळखील तर, दुर्जेय असलेल्या काळाच्यापुढंसुद्धा डरकाळी फोडण्याचं सामर्थ्य मनुष्यजीवनात आहे, काळाला जिंकण्याचं सामर्थ्य त्याच्या जीवनात आहे, इतकंच काय पण साक्षात निसर्ग निर्माण करणाऱ्या परमेश्वराची सृजनशक्ती, प्रतिभासुद्धा त्याच्यामध्ये आहे. मग असं असताना, जिभेच्या चोचल्यासाठी, शरीराच्या सुखांसाठी, सामान्य पशूंनी रमावं अशा मनोरंजनासाठी असल्या सर्कशींच्या आणि कृत्रिम मनोरंजनाच्या जगाचे लोभ त्याला का पडतात ?

त्यावर उत्तर देताना कृष्णदास महाराज म्हणतात, फार जन्म बेसावधपणानं पशूंच्या जीवनाच्या संगतीत घालवल्यामुळं, आपलं हे सारं सामर्थ्य माणूस विसरून गेला. त्यालाही त्यांच्या संगतीनं वाटू लागलं की, या चवीच्या खाण्यापिण्यात, मनोरंजनात आणि प्राण्यांच्या खेळांत जसं त्यांचं जीवन, त्यांचे आनंद आहेत तसंच आपलंही जीवन पशूंसारखंच जीवन आहे. आणि हेच खरं जीवन आहे.

असं व्हायचं कारण सांगताना कृष्णदास महाराज म्हणाले,

'बहू जन्म या वीषयी संग आहे ।
म्हणोनि तुझा लोभ तेथेचि राहे ।'

जे पशुजीवन बेसावधपणानं त्याच्यातच राहिल्यानं खरं वाटायला लागलं त्यावरचं उत्तर आणि उतारा त्याच कारणात आहे, हे उघड आहे. माणसाला सुदैवानं ज्ञानाची शक्ती आहे. तो असं जीवन कशामुळं खरं मानू लागला, असा जगभर पशूंसारखा का वागू लागला, हे समजून घेण्याचं ज्ञानाचं सामर्थ्य त्याच्याकडं आहे.

मात्र अडचण एक आहे की, हे त्याचं ज्ञानाचं सामर्थ्य त्याच्यात सुप्त आहे. त्याला या दोन जीवनांतला फरक कळू शकतो. पशुजीवनाच्या संगतीनं त्या जीवनाचा लोभ वाटू लागतो. तसं जगावंसं वाटू लागतं. हे सारं त्याला कळू शकतं. पण ते आपोआप कळत नाही. भूक लागावी. तहान लागावी, तसं त्याला हे ज्ञान इतक्या सहजपणे, आपोआप मिळवावंसं वाटत नाही. तसं अर्थातच तसं समजून घ्यावं, जगावं असंही वाटत नाही. म्हणून तर माणसं जगभर अनेक ठिकाणी अशी पशुपक्ष्यांचं जीवन जगताना दिसतात !

अर्थात यालाही श्री कृष्णदास महाराजांनी उपाय आणि उत्तर सांगून ठेवलं आहे. पशुजीवनाच्या बेसावध संगतीनं, अज्ञानानं मनुष्याचा लोभ तशा जीवनावर राहात असला, अनेक लोक तसं जगून मानवी जीवन निकृष्ट करीत असले तरी, माणसाला यातून बाहेर पडण्याचा मार्ग जरूर आहे, एवढं जरी त्याला कळलं तरी, त्याला कृष्ण महाराज लक्षात आणून देतात की, मनुष्याच्या आयुष्यात अशा दैवी ज्ञानाचा सूर्य जरूर उगवू शकतो. फक्त त्यासाठी आपण कुठल्यातरी ज्ञानी गुरुराजाला शरण जावं. मग आपल्या ठिकाणचा हा दैवी ज्ञानाचा सूर्य उगवेल, प्रकाशेल आणि हा सारा पशुजीवनाचा लोभ आणि अज्ञान तो नाहीसं करील.

महाराज म्हणतात, 'गुरूराजयोगे पहा ज्ञानभानू !' उगवेल आणि आपलं जीवन खऱ्या अर्थानं मनुष्यजीवन होईल !

* *

## ८. ' नसे भक्ति एका तनूनेचि होणे !'

माणसाच्या जीवनाचं काही वेगळं आणि उच्च ध्येय आहे. भाग्याच्या योगानं ते कुणाच्यातरी लक्षात येतं. कुणी ते कधी प्रसंगानं लक्षात आणून देतो. कुणाला सहज होणाऱ्या श्रवणातूनसुद्धा त्याची जाग येते. अर्थातच असं काही साध्य करायचं असलं की, ते करण्याच्या दिशेनं आपले आपल्या मनात विचार सुरू होतात. त्यासाठी काही कल्पना, काही कृती यांचाही विचार सुरू होतो.

हे एकदा सुरू झालं की, एक-दोन गोष्टी घडतात. त्या पाहाण्यासारख्या आहेत. एखाद्या आईला लहान मूल होतं. ते बाळ मोठं व्हावं, बसावं, त्यानं उठून चालायला-पळायला लागावं, खेळावं - असं तिला नकळत, सुप्तपणे रोज कुठंतरी वाटत असतं. पण उजाडलं की, ते बाळ दुपट्यावर दिसतं, त्याचीही हालचाल सुरू असते. ते दूध-पाणी पितं. ते सगळं स्वाभाविकच असतं.

आता आईला हेही दिसत असतं, पटत असतं. पण मनात कुठंतरी त्याच्याकडं रोज बघताना, त्याची त्यामानानं प्रगती होत नाही, असं कुठंतरी वाटत राहातं. कदाचित पंधरा दिवसांनी - महिन्यांनी कुणीतरी सहज म्हणून ते बाळ बघायला येतं. त्यानं ते खूप दिवसांनी पाहिलेलं असल्यामुळं त्याला ते बाळ एकदम कुशीवर वळताना दिसतं, सरकायचा प्रयत्न करताना दिसतं. हात लांब करून खेळणी ओढताना दिसतं. ते पाहिलं की, त्या आलेल्या माणसाची अगदी आनंदानं प्रतिक्रिया येते की, बाळाची प्रगती किती छान आहे !

आईला तर इकडं त्यात तसा फारसा फरक दिसत नाही. बाळात, त्याच्या हालचालींत पडलेला फरक खरंतर समोरच असतो. पण रोजच ते बाळ पहात असल्यामुळं त्याच्यातली वाढ, प्रगती - या गोष्टी आईच्या रोजच्या पाहाण्यात लक्षात येत नाहीत. अशा काही कारणानं अनेक दिवसांनी पाहाणाऱ्यांनी लक्षात आणून दिल्यावर मात्र असं वाटतं की, अरे, खरंच या बाळानं महिन्या-दोन महिन्यांत त्यामानानं खूपच प्रगती

केली. ते वाढलं, जसं मोठं व्हायला हवं तसं झालं व मोठं होतंही आहे.

याबाबतीत रोजच्या संगोपनाची, खाण्यापिण्याची, त्याला त्याच्या परीनं शिकवण्याची जेव्हा आपण काळजी घेतो तेव्हा हे सगळं खरं आपोआपच घडत असतं. निसर्ग साधारणतः कुणाच्या बाबतीत कधी प्रगतीत कुचराई करीत नाही, अन्याय करीत नाही. ठराविक दिवसांनी, ठराविक महिन्यांनी त्या त्या मुलाच्या ठिकाणी तशी तशी प्रगती झालेली दिसते.

फरक एवढाच असतो की, शरीराच्या या प्रगतीच्या वाढीचे टप्पे आहेत. त्यानुसार काही विशीला म्हणा, पंचविशीला म्हणा जिथंपर्यंत त्या शरीराची प्रगती निसर्गानं घडायची, जशी-जेवढी घडायची तेवढी ती सगळ्यांच्या बाबतीत घडतेही. पण पुढं मात्र एका टप्प्यानंतर इतर जगातल्या सजीवांची प्रगती जशी त्यांच्यात्यांच्या प्रकाराप्रमाणं विशिष्ट वयापर्यंत, विशिष्ट पद्धतीनं होते आणि एक प्रकारची पूर्णता आली की, ती थांबते, तसंच माणसाच्या शरीराच्या बाबतीतही अशी शारीरिक प्रगतीची एक मर्यादा आली, एक पंचविशीचा टप्पा आला की, निसर्ग सहजपणे प्रगती घडवून आणण्याचं आपलं काम थांबवतो.

आता इथून पुढं आजवर आपण मुद्दाम कष्ट घेतले असतील किंवा काही वेळेला आपल्याकडून आबाळही झाली असेल तरीसुद्धा, ते सारं सावरून घेऊन, निसर्ग माणसाच्या शरीराला त्या प्रगतीच्या टप्प्यापर्यंत आणून ठेवतोच. त्यावेळी तो आपल्याला दोष देत बसत नाही, दुर्लक्ष करीत नाही. त्याच्या परीनं जितकी अनुकूलता मिळेल तितकी प्रगती तो घडवून आणीत असतोच. पण आता यापुढं मात्र शारीरिक प्रगतीची गरज राहिलेली नसते आणि त्यामुळं हे काम आता शरीराच्या प्रगतीपर्यंत पुरं करून, निसर्गानं सोडून दिलेलं आहे. याबद्दल सावध होणारे लोक कमी. आजवरच्या सहजपणे निसर्गानं प्रगती करीत जाण्याच्या आणि त्यामुळं आपल्यावर त्याची कुठली फारशी जबाबदारी नसण्याच्या एका मोठ्या सवयीमुळं मनुष्याच्या ठिकाणी प्रगतीविषयी एक प्रकारची बेफिकीरी, बेसावधता येते.

त्याचे परिणाम दोन होतात की, एकतर आजवर झाली तशीच शरीराची प्रगती याहीपुढं, आपण काळजी घेवो न घेवो, नुसतं खाणंपिणं करीत राहिलं तरी, निसर्ग ती सांभाळणारच आहे, अशी भावना होऊन बसते. वास्तविक, परिस्थिती वेगळी असते. निसर्ग ज्या सहजतेनं, नकळतपणानं ही प्रगती इथंपर्यंत आणून सोडतो - ती मर्यादा एकदा आल्यानंतर मग ते शरीर तंदुरुस्त टिकवणं ही जबाबदारी आता ओळखून आपण घ्यायची असते. इतकंच नव्हे तर, जसा प्रगतीचा टप्पा निसर्गानं सहजपणे गाठून दिला तसाच, उलट आता तो त्याच शरीराचा काही काळानंतर, तितक्याच निसर्गक्रमानं विघटनाचा प्रवासही सुरू करतो. याची वेळीच कल्पना न आल्यामुळं, मनुष्य शरीराची तंदुरुस्ती गृहीत धरून बसतो. सुखसाधनांचे, उपाधी मिळवण्याचे, मोठमोठ्या गोष्टी करण्याचे बेत नकळत आखीत राहातो. निसर्ग मात्र दुसऱ्या बाजूला आता माणसाच्या हाताखाली आजवर सहजपणे वावरणाऱ्या हातापायांपासून ते मनापर्यंतच्या साऱ्या शक्ती कारणाकारणानं एक-एक करीत काढून घ्यायला सुरुवात करतो. त्यामुळं जी कामं आपण या शरीराच्या साहाय्यानं आजच्याएवढीच नव्हे तर, आणखी आणखी करू शकू, असे जे बेसावध बेत मनुष्य आखीत असतो, ते कुठं ना कुठं हळूहळू फसायला सुरुवात होते.

यामुळं हेही लक्षात येतं की, आपण शरीराच्या साहाय्यानं ज्या गोष्टी खूप साध्य करू, अशी कल्पना आहे, तीसुद्धा या एका शरीराच्या साहाय्यानं प्रत्यक्षात येणं शक्य नाही. त्याचबरोबर जर मी मनुष्यजन्माचं ईश्वरभक्तीचं सर्वांत मोठं ध्येय समोर ठेवलं असेल तर, त्यासाठी मला हे एक शरीर तरी पुरणार का, याबद्दल मनुष्य तात्काळ सावध होऊ शकतो. असा त्याला सावध करून श्री महाराज म्हणतात,

'नसे भक्ति एका तनूनेचि होणे ।
बहू जन्म घेऊनि आत्मत्व बाणे..!'

* *

## ९. 'नसे व्यर्थ चिंता मना या तनूची..!'

निसर्ग आपलं काम बिनबोभाटपणे, सर्वांसाठी आणि समानतेनं करीतच असतो. शरीरच्या वाढीच्या बाबतीत जसं आपण पाहिलं तसं मिळेल त्या अन्नपाण्यावर, दुधाताकावर - तो आपलं काम निभावून नेतो. शरीराची वाढ करून त्याला एक पूर्णत्व कसं आणतो ते आपण पाहिलं.

साधारणतः असं सगळीकडं घडताना दिसतं. त्याचबरोबर कधीकधी काही घरी अन्नपाण्याची किंवा परिस्थितीची, सांभाळणाऱ्या माणसांची काही कमी नसते, उणीव नसते. सारीजण आपापल्यापरीनं बाळाच्या वाढीसाठी कष्ट करीत असतात. मुलाची आई तर विशेषतः त्या बाळाच्या वाढीसाठी अगदी डोळ्यांत तेल घालूनसुद्धा त्याची जपणूक करीत असते.

असं सगळं असूनही काही वेळा असा अनुभव येतो की, बाळ काही बाळसं धरीत नाही. त्याच्या ठिकाणी वाढ, चपळता, बोलण्याचालण्यातली प्रगती - अशा अनेक गोष्टी इतर सामान्य मुलांसारख्या घडताना दिसत नाहीत. आईचं लक्ष स्वाभाविकपणे त्या बाळाच्या बरोबरीच्या मुलांकडं असतं. त्या मुलांत, त्यात्या वयाला जी प्रगती घडते, ती दिसून येत असते. तशी प्रगती या आपल्या बाळात दिसली नाही, ते मागं पडतं आहे, त्याची वाढ खुंटते आहे, ते इतर सामान्य मुलांसारखं वागत नाही - त्याची प्रगती होत नाही, असं लक्षात आलं तर, आईला नकळत एक उदासीनता येते.

आपण एवढी सगळी काळजी घेऊन, इतरांची सगळी मदत असून, त्या बाळाला त्यात्या वेळी काही कमी पडू न देऊनसुद्धा - असं होताना पाहून रोज त्या बाळाकडं लक्ष गेलं की, तिच्या मनात ही खंत पुन्हापुन्हा येत राहाते. मनाला उदासीनता येते. आपलं काही चुकतं आहे का, याची आपल्या मनाशीच उजळणी सुरू होते. कधी घरातली कुणी मोठी अनुभवी माणसं, कधी वैद्य-डॉक्टर, कधी आई-आजीसारखी

अनेक प्रसंगांतून गेलेली अनुभवी माणसं, बरोबरीच्या मैत्रिणी - अशा अनेकांकडं अशी उदासीन झालेली आई आपली ही खंत बोलूनही दाखवते.

त्यातून, त्या माणसांकडून आपल्या काही चुका लक्षात येतात का, ते पाहायचा प्रयत्न करते. कुणी काही खाण्यापिण्याच्या, पथ्याच्या, काळजी घेण्याच्या, वेळा पाळण्याच्या - अशा अनुभवी सूचना दिल्या तर त्यावरही ती विचार करते. तिलातिला पटलेल्या गोष्टींचे प्रयोग ती करून पाहाते. हेतू अर्थातच एवढाच असतो की, बाळाची प्रगती मागं पडल्यानं येणारी उदासीनता जावी. त्या बाळाची प्रगती व्हावी. ते इतर सर्वसामान्य लहान मुलांसारखं नव्हे, त्यांच्यापेक्षा चांगलं व्हावं.

हे सारं शरीराच्या प्रगतीच्या एका टप्प्यापर्यंत निसर्ग करतो. आपण साथ देतो आणि शरीराचं तेते पूर्णत्व गाठतो, ध्येय गाठतो. माणसाच्या जीवनाचं जर खरं वैशिष्ट्य आणि वैभव कशात असेल तर, हे सारं शरीराचं पूर्णत्व गाठण्यासाठी आपण प्रयत्न करणं, निसर्गानं त्याला साथ देणं - यात नाही !

त्या अर्थानं शरीराला पूर्णत्व येवो, पुढं त्याला निसर्गक्रमाप्रमाणं जीर्ण होत नष्ट व्हावं लागो - हे सारं काही त्याला टळत नाही. त्यालाच काय पण सजीव देह धारण केलेल्या पशुपक्ष्यांनाही टळत नाही. त्यांच्याही वाट्याला - अगदी वाघ, सिंह झाले तरी, ही वाढ-घट-जीर्णत्व आणि शरीराला मृत्यू - या गोष्टी लागूच आहेत. त्याला अपरिहार्यपणे सर्वांना समोरं जावं लागतं.

मनुष्यजन्माचीच खासियत ही की, शरीराचं जे आत्ता उल्लेख केलं ते पूर्णत्व, त्याला थोडंफार मिळूनही जातं पण मनुष्यजन्माची झेप घेऊ शकणारं, जे अंतरंग त्याला दिलं आहे, जो मनाचा विकास साधण्याचं विलक्षण सामर्थ्य त्याला दिलं आहे तो साधणं ही त्याची खासियत आहे. तिचंही पुन्हा वैशिष्ट्य असं आहे की, तो जागा झाला, प्रयत्न केले तर, मनुष्यजन्माची ही झेप, ही खासियत तो साध्य करू शकेल. परंतु जर का, याबाबतीत आपल्याकडं असलेल्या विलक्षण

क्षमतेच्या बाबतीत तो जागा झालाच नाही, तर मात्र काही वेगळं, सर्वोच्च साध्य करणं तर सोडाच, पण साध्या पशुपक्ष्यांच्या जीवनासारखा देह जीर्ण होऊन, तो एक दिवशी कधी मृत्युमुखी पडून जाईल, हे सांगताही येणार नाही.

म्हणून सत्पुरुषांचं खरं काम हे की, ते त्याला या शरीराची फार काळजी करू देत नाहीत. आपण आधी पाहिल्याप्रमाणं ती काळजी घेतली जाणारच आहे. कसंही जगलं तरी शेवटी देह काळाच्या स्वाधीन करावा लागणारच आहे. तो असाच अन्नपाणी खातपीत शेवटी अस्तंगत होणार आहे, याची त्यांना पूर्ण खात्री असते. म्हणून ते जाणवून देत असतात की, मनुष्याचं शरीर मिळाल्याचं भाग्य जरूर ओळख, पण ती तर भाग्याची फक्त बैठक आहे. त्या बैठकीवर उभं राहून करायची खरी प्रगती ही फक्त मनुष्य म्हणून तुझ्याच हातात आहे.

खाण्यापिण्यासाठी, वस्तूंसाठी, उपाधींसाठी, चांगुलपणासाठी, लोकसंग्रहासाठी - शरीराच्या भोवती एवढा पसारा तू गोळा करण्यात आपलं आयुष्य दवडतो आहेस, पण त्याचं अखेर काय होणार आणि त्यातून एखाद्या पशूच्या जन्मासारखं आपल्याला निघून जावं लागणार - याबद्दल सावध झालास तर, या संधीचा तुला खरा फायदा घेता येईल. शरीराची काळजी घेतलीस-न घेतलीस तरी, थोडंफार स्वास्थ्य सोडलं तर, तू ज्यासाठी खरा मनुष्यजन्माला आलास तो आत्मलाभ होणार नाही, हे नक्की लक्षात ठेव.

म्हणून कृष्णदास महाराज आपण करायच्या खऱ्या काळजीची गोष्ट लक्षात आणून देताना म्हणतात,

'नसे व्यर्थ चिंता मना या तनूची..!'

तेव्हा आता चिंता करण्याची खरी गोष्ट शरीर नसून भक्ती कशी साध्य होईल ही आहे, हे लक्षात ठेवून आपण आपला जीवनप्रवास करावा !

* *

## १०. 'नको रे मना तू उदासीन होऊ !'

निसर्गाच्या क्रमानं शरीराची वाढ होत नसली म्हणजे एखाद्या बाळाच्या आईला कशी चिंता लागते, ते आपण पाहिलं. एक प्रापंचिक ठेवण, मर्यादा म्हणून तसं वाटणं स्वाभाविकही आहे. त्यासाठीचे केले जाणारे उपायही आपण पाहिले. तेही स्वाभाविकच आहेत. अपयशानं येणारी उदासीनता, इतर माणसं त्याच मनाच्या ठेवणीची असल्यामुळं त्यांना अशा चिंता स्वाभाविक वाटतात.

त्यात पुन्हा आजूबाजूची माणसं ही बहुधा प्रापंचिक ठेवणीचीच असतात. त्यांना असल्या दूधपाण्याच्या, खाण्यापिण्याच्या, मुलांच्या रांगण्याच्या, चालण्याच्या, सणावारांच्या असल्या गोष्टींत अपरिमित हौस असते. रस असतो. ते सारं घडण्यासाठी या बाळांची प्रगतीही अर्थातच त्यात्या वेळी योग्य व्हावी लागते. ती झाली तर, त्यांना अशा हौसेमौजेच्या गोष्टी करता येतात.

अशी प्रगती होत नसली तर मग मात्र इतरांना अस्वस्थता येते. एखादं बाळ आजारी असल्यानं, त्याला काही रोगराई असल्यानं ती दूर व्हावी म्हणून अस्वस्थता येणं वेगळं. त्यासाठी मनुष्य औषधोपचारही करील, काळजीही घेईल. पण आजवर आपला जो अनुभव होता, इतर मुलांची जशी प्रगती झाली, तशी ती न झाल्याची अस्वस्थता येणं वेगळं. त्यापोटी कधीकधी तर अशी माणसं त्यात्या बाळाच्या आईच्या मनातसुद्धा नसलेली अस्वस्थता, चर्चा करून निर्माण करून देतात.

आई तर स्वाभाविकतः निसर्गानं, बेसावधपणानं आधीच मायेत अडकलेली असते. तिच्या लक्षात न आलेली अशी एखादी मागं पडणारी गोष्ट लक्षात आणून दिली गेली तर काय होतं, हे वेगळं सांगायला नकोच. ती घेत असलेली नेहमीची काळजीसुद्धा बाजूला पडून, उलट या वेगवेगळ्या सल्ल्यांनुसार वेगवेगळे प्रयोग करताना, या बाळाच्या आईची स्वतःचीच झोप उडून जाते.

तसं पाहिलं तर, अनेकदा यांतल्या गोष्टी प्रत्येकाच्या घरातल्या वातावरणानुसार, खाण्यापिण्याच्या ठेवणीनुसार, काही आनुवंशिक म्हणून - अशा स्वरूपानं चालत आलेल्या असतात. कमी-जास्त झालेल्या असतात. त्या कालांतरानं थोड्या मागं-पुढं होऊन भरूनही येतात. अनेकदा जसं आपल्याला आढळतं की, आज एखादी बातमी कानांवर पडली, एखादा निर्णय कळला तर, कळल्या क्षणापासून दिवस अस्वस्थ जातो, खूप चर्चा होते. माणसांची झोप उडते. चार-आठ दिवस त्या विषयात जातात. कधी त्यावरून एकमेकांच्यावर दोषारोप होतात. कुणाकुणाचे समज-गैरसमज होतात. पण असे वर्ष-सहा महिने गेले की, अनेकदा ती गोष्ट इतकी मागं पडते की, त्यावेळेला आपण एवढं उदासीन होण्यासारखं, एवढं अस्वस्थ होण्यासारखं, एवढी शक्ती आपण त्याच्यावर घालवण्यासारखं - त्यात काही होतं का, असं स्वतःचं स्वतःलासुद्धा वाटतं. हे कळूनही मनुष्य त्याबद्दल एकवेळ सावध होतो. तो ती गोष्ट विसरून गेलेलाही असतो. पण पुन्हा असं घडलं की, मात्र ही सावधानता खरंतर यायला हवी पण ती येत नाही. पुन्हा तो तसाच उदासीन, विषण्ण होतो. शक्ती खर्ची घालतो. मनुष्य स्वतःच्या प्रपंचाच्या अनुभवानंसुद्धा शहाणा होत नाही, तो असा.

वास्तविक त्याच्या उदासीन होण्याचा विषय हा, असल्या काही घटना, प्रसंग, निर्णय, कटू-अप्रिय गोष्टी किंवा आधी म्हटलं तसं शरीराच्या - तनूच्या वाढीतले चढउतार असल्या नसून, तो ज्यासाठी जन्माला आला आहे, त्यासाठी तो जे नियोजन करतो आहे, कामं करतो आहे, साधना-उपासना करतो आहे त्यात होणारे चढउतार, त्यातली प्रगती मागं पडणं - या गोष्टी खऱ्या काळजी करण्यासारख्या आणि उदासीन होण्यासारख्या आहेत.

कृष्णदास महाराज तर लक्षात आणून देतात की, मुळातच एकवेळ निसर्गाच्या क्रमाप्रमाणं आहे हे शरीर वाढेल, पूर्ण होईल, नष्ट होईल. परंतु तशाच क्रमानं आपल्या ठिकाणचं भगवंताचं प्रेम, आत्मत्व, भक्ती ही अशी कधी आपोआप वाढेल का, तिला पूर्णत्व येईल का,

भगवंताची कृपा होऊन आपल्याला अखंड समाधान मिळेल का, नाम अखंड टिकेल का ?

एका शरीराच्या साहाय्यानं एवढं साधणं हे खरोखर विचार केला तर, किती अवघड आहे, हे लक्षात येईल. एखाद्या आईला जशी बाळाच्या केलेल्या संगोपनानंतर वाढ झाली नाही तर, उदासीनता येते तशी परमेश्वराच्या भक्तीच्या बाबतीत आपल्या गुरूंनी आपल्याला सारी अनुकूलता, मार्गदर्शन, कृपा करूनही जर आपली भक्तीतली प्रगती होत नसेल तर, ती खरी आपण उदासीन होण्यासारखी गोष्ट आहे.

अर्थात याही गोष्टीमुळं, श्री कृष्ण महाराज म्हणतात, उदासीन होण्यापेक्षा आपण आपल्याला दिलेल्या नामाची कास सोडली नाही, साधनाचं सातत्य सोडलं नाही तर, शरीर पडलं तरी चालेल ते पुन्हा मिळेल पण अनेक शरीरं मिळून का होईना, आपण भगवंत गाठूच गाठू. या अर्थानं प्रगतीच्या बाबतीत, ती होत नसेल तर, उदासीन होऊ नये. उलट मुखातलं नाम अखंड कसं राहील, आपल्या अंगीचं ईश्वराचं प्रेम कसं वाढतं राहील - हे आपण लक्षात घेऊया.

म्हणून याबाबतीत कृष्णदास महाराजांचं म्हणणं आपण लक्षात ठेवू की,

'नसे भक्ति एका तनूनेचि होणे ।
बहू जन्म घेऊनि आत्मत्व बाणे ।
नको रे मना तू उदासीन होऊ ।
अखंडीत वाचे सिताराम गाऊ ।।'

आणि आपला भक्तीचा प्रवास रामप्राप्तीपर्यंत जन्मोजन्मी करण्याची तयारी ठेवू !

* *

## ११. 'सुटोनीच तू जाशि संसारतापा !'

अनेक माणसं असंख्य प्रकारचे प्रपंच रोज करताहेत. गरीबाला गरीबाचा आहे. मध्यमाला मध्यमाचा आहे. श्रीमंताला श्रीमंताचा आहे. सत्ताधीशांना सत्ताधीशांचे प्रपंच आहेत. प्रत्येकजण आपापल्या परीनं आपल्याआपल्या प्रपंचाची तड लावण्याचा प्रयत्न करतो आहे.

गरीबाला दोन खोल्या, पन्ह्यांचं छप्पर मिळालं तरी त्याच्या दृष्टीनं तड लागल्यासारखी होते. मध्यमवर्गीयाला कुठं घर-बंगला बांधला तरी कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं. तीच गोष्ट श्रीमंताची, अगदी सोन्याचा चमचा तोंडात घेऊन येणाऱ्या गर्भश्रीमंतांची आहे. त्यांना कदाचित हेच बंगले गावोगावी, राजवाड्यासारखे, देशात-विदेशात असे उभे केले म्हणजे आपापल्या प्रपंचाची अगदी तड लागली असं काहींना वाटतं.

आपल्या मागच्या दहा पिढ्यांत जे जमलं नाही, ते आपण केलं याचा एक प्रकारचा अभिमान, कौतुक वाटतं. पण या प्रत्येकाबरोबर त्याच्या त्याच्या प्रमाणात, ते घरदार गोळा करण्याच्या निमित्तानं असो, असे महाग राजवाडे बांधण्याच्या निमित्तानं असो - त्याच्या मागचं माणसांचं, वस्तूंचं, नव्यानव्या शास्त्रांनी उपलब्ध करून दिलेल्या साधनांचं गोळा करण्याचं प्रकरण काही थांबत नाही. साध्या गळक्या प्लॅस्टिकच्या तांब्या-बादलीपासून एखादी ॲल्युमिनिअम, स्टीलची तांब्या-बादली गोळा करण्यापर्यंत जितका ताप, त्रास, खर्च सामान्य मनुष्याला पडतो, तितकाच तो त्याच्यात्याच्या तुलनेनं इतरांनाही त्यात्या बाबतीत पडतो.

श्रीमंत माणूस गावच्या किंवा आपल्या राज्यातल्या खाणीतल्या मोलाच्या दगडावर संतुष्ट नसेल, तर कुठं आजूबाजूची दूरदूरच्या राज्यातली बांधकामं तो पाहून येईल, तिथं मिळणाऱ्या, कुणी विशेष न पाहिलेल्या तांबड्या-पांढऱ्या-संगमरवरी - अशा अनेक दगडांच्या खाणींच्या शोधात तो फिरत राहील. त्यात्या ठिकाणी जाऊन त्याचे

सौदे करणं, ती विकत घेणं, मोठ्या अवजड वाहतुकी करून आपल्या हव्या असलेल्या ठिकाणी, गावात बांधकामाला ते आणणं - हे जसं तो करतो, तसंच त्यासाठी घरात मांडायच्या असंख्य वस्तूसुद्धा त्यानं वेगवेगळ्या राज्यात, देशात पाहिलेल्या असतात. त्या आणण्यासाठी त्याची वणवण सुरू असते. प्रपंचाच्या या हौसेला मोल नाही, हे खरं असलं तरी, गरीबाचे जाणारे कष्ट, जाणारा वेळ, त्याच्या मानानं जाणारा पैसा, सगळं मनासारखं गोळा करण्यात होणारा ताप, अनेकदा या सगळ्या - दगडापासून ते वस्तूंपर्यंतच्या - वाहतुकी करताना होणारी तोडमोड, त्यातून नुकसान - हे त्याला जितकं सोसावं लागतं ते कदाचित काही हजारांत असेल, तर श्रीमंताला ते काही कोटींत असेल.

इतकं सारं करून, सारं गोळा करून झाल्यावर पुन्हा आता सारं काही पूर्ण झालं आहे म्हणून, फारतर एखाद-दुसरा दिवस झोपेत शांतपणे जात असेल. पण एवढ्या वर्ष-सहा महिने सोसलेल्या कष्टापासून-पैशापर्यंतच्या तापातून जरा बाहेर पडावं तोपर्यंत अर्थातच नवा दिवस उजाडतो. आणलेल्या वस्तू कधी तुटतात-फुटतात. कधी निरुपयोगी ठरतात. कधी अडगळीच्या होतात, पुन्हा नवीन लागतात. अशा तऱ्हेनं उजाडलेला दिवस पुन्हा एकदा सामान्यांपासून असामान्यांपर्यंत सर्व माणसांना पुन्हा एकदा हवेपणाच्या चुलीवर आपल्या शरीराची भांडी चढवायला लावतो. मनाला स्वस्थतेचा ताप व्हायला सुरुवात होते. पुन्हा तो शांत करण्यासाठी एक नवी धावपळ माणसाच्या मनात सुरू होते. जसजशी पैशाची, माणसांची, वस्तूंची अनुकूलता होत जाईल, तसतशी पुन्हा एकदा ही धावपळ सुरू होते.

कुठल्या एका विशिष्ट मुद्यावर, विशिष्ट वस्तूवर, विशिष्ट मिळकतीवर हा प्रवास थांबत नाही. ठरवलेलं मिळूनसुद्धा मनाला तिथं कुठं थांबावंसं वाटत नाही, आता आणखी काही करण्याची गरज नाही, जे मिळवलं त्यात झालेला-सोसलेला ताप आता पुरेसा आहे, आता असलेल्यात शांतपणे जगावं - अशी काही मनाची स्थिती होत नाही. यालाच संत 'न संपणारा संसार' म्हणतात. त्याचं वैशिष्ट्यच हे

की, तो कुठं थांबत नाही, आपल्याला थांबू देत नाही. आपल्या मनात आलं, अगदी ताप थांबवावा असं वाटलं, पळापळ थांबवावी असं वाटलं तरी, तो एकतर आहे त्या परिस्थितीत आपल्या मनाला क्लेश-ताप उत्पन्न करीत राहील, नाहीतर, सतत नव्या तापाला तरी सामोरं जायला लावीत राहील.

याचा अर्थ सामान्य माणसाला विचार केला तर, साहजिकच निराशाजनक वाटेल. कुणालाही असं सहजपणे वाटेल की, असं जर क्षितिजाकडं बघितल्यासारखं मला सारखं पुढंपुढंच बघत राहावं लागणार असेल, कष्ट करावे लागणार असतील आणि आयुष्यभर ते केल्यानंतरसुद्धा त्यात्या ठिकाणी पोचल्यावर तिथं साधी तहान भागवणारं पाणीसुद्धा मिळणार नसेल, टिकणार नसेल तर, मग आयुष्यात निराशाच उरेल ! म्हणून याचं उत्तर स्पष्ट करताना कृष्णदास महाराज म्हणतात की, आपलं लक्ष सारखं या सतत अपुऱ्या राहणाऱ्या आणि ताप देणाऱ्या गोष्टींच्याकडं लागल्यामुळं आपल्याला ताप अपरिहार्य वाटतो आहे खरा. त्या गोष्टी तशा असल्यामुळं आपलं लक्ष जोपर्यंत तिकडं आहे तोपर्यंत आपल्याला असाच ताप सहन करीत राहावं लागेल. पण एक लक्षात घ्या की, आपलं लक्ष तिथून काढून ज्या ठिकाणी असं अपूर्णत्व नाही, शांती आहे, समाधान आहे, त्यासाठी कुठं जावं लागत नाही, लौकिक अर्थानं काही द्यावं-घ्यावं लागत नाही - अशा ठिकाणी जर मनाची ही दृष्टी काढून वळवली, तिथं टिकवून धरायचा प्रयत्न केला तर, या संसारतापापासून मुक्त होणं आपल्याच हातात आहे. त्यासाठी कृष्णदास महाराजांचं म्हणणं लक्षात ठेवावं की,

'स्वरूपी मना दृष्टि जाताचि बापा ।
सुटोनीच तू जाशि संसारतापा !'

आणि ताप देणाऱ्या या संसाराकडची दृष्टी वळवून समाधान देणाऱ्या स्वरूपाकडं ती लावण्याचा अभ्यास आता आपणच करूया !

* *

## १२. 'मना रामदासा तुझी सर्व चिंता !'

माणसाला प्रपंचात कितीही अनुकूलता असो. मुलंबाळं असोत. पैसापाणी असो. भविष्याच्या तरतुदी असोत. घरंदारं असोत. अगदी चांगली, मनासारखी वागणारी मुलंबाळं असोत. एक गोष्ट जमणं त्याला मोठं कठीण जातं. ती म्हणजे, काळजी न करणं.

कुणालाही वरवर पाहाता असं वाटतं की, माझ्यामागं पैशाचं बळ नाही. मला उद्याची भ्रांत आहे. त्यामुळं माझ्या मागची काळजी कशी सुटणार ? कुणाला वाटतं माझ्या नोकरीची शाश्वती नाही, ती कायम होईल, टिकेल याची खात्री नाही, मी काळजी न करता कसा राहाणार ? ज्याच्यागाठी चार पैसे आहेत त्याला असं वाटतं, बाहेर ही महागाई अशी भडकते आहे, मुलांची उत्पन्नं म्हणावी तशी स्थिर नाहीत, वाढत नाहीत. किती झालं तरी हे साठलेलं तळं आहे. यावर ही किती काळ जगतील ?

आजच्या काळाच्या ओघाप्रमाणं पुन्हा काही नवीन नवीन प्रश्न समोर येत असतात. मुलांचे प्रवेश, त्यांची शिक्षणं, त्यासाठीचे खर्च - हा सामान्य माणसाच्या प्रपंचाचा एक साधा-सरळ भाग होता. तो त्याच्या नोकरीउद्योगातून जे मिळवीत होता त्यात ते सारं सहजपणे बसत होतं. एखाद्या शिक्षणाच्या प्रकाराप्रमाणं किंवा जादा पदवीसाठी शिक्षणाचे होणारे थोडेफार जादा खर्च सोडले तर, हा काही त्याच्यादृष्टीनं फार काळजीचा विषय नव्हता. परंतु आज मुलांच्या जन्मापासून शिक्षणाच्या खर्चाची नियोजनं करूनसुद्धा, ज्यावेळेला त्याला कुठलं शिक्षण घ्यायचं असेल, त्याला कुठल्या राज्यात-देशात जायचं असेल, त्याचे खर्च जरी मनात आले तरी आज घडीला साऱ्या आर्थिक तरतुदी करूनसुद्धा हे सारं पुरणार का, त्यांच्या अपेक्षा आपण पुऱ्या करू शकू का - अशा तऱ्हेच्या काळजीतून अशी तरतुदी करणारी माणसंसुद्धा सुटत नाहीत.

बरं नुसती काळजी करून हे प्रश्न सुटावेत, तर तसं कधी

नसतंच. काळजी एका बाजूनं माणसाला पोखरीत राहाते. त्याच्या मनाला सतत अस्वस्थता, अनिश्चिततेची व्याधी ठेवते. त्यातून खऱ्या अर्थानं काळजीला काही उपाय म्हणून मिळावा म्हटलं तर तो मिळत नाही. त्यापेक्षा काळजी न करता शांतपणे झोपी गेला, झोप अधिक चांगली होऊन ताजातवाना झाला तर, एकवेळ तो अजून तासभर जास्त कष्ट करू शकेल. त्यातून त्याची काळजी थोडी कमी करणारे चार पैसे त्याला जादा मिळवता येतील, साठवता येतील.

पण इतका विचार, इतका विवेक काळजी माणसाच्या ठिकाणी कधीच उरू देत नाही. ती त्याला अनिश्चित स्वरूपाची काळजी करीत राहण्याचं काम लावते. पण निश्चित स्वरूपाचं, वेळी काळजी कमी करू शकणारं काम मात्र करू देत नाही. त्यातून त्याची दोन्ही बाजूंनी हानी होते. एक मनाच्या अस्वस्थतेनं आणि दुसरी त्या अस्वास्थ्यामुळं दिवसभरात कमी होणाऱ्या कामामुळं-कार्यक्षमतेमुळं.

यात माणसाच्या मनाची गंमत अशी की, हे जसं त्याच्या वाट्याला आहे, तसंच ते इतर असंख्य लोकांच्या वाट्यालाही असतं. त्यांनाही मुलांच्या शिक्षणांचे, खर्चाचे, भविष्याचे प्रश्न पडलेले असतातच. त्यातच आजच्या काळानुसार आजारपणांचे आणि त्यामुळं होणाऱ्या अकल्पनीय खर्चाचे बोजे डोक्यावरचं काळजीचं ओझं वाढवीत असतात. हे सारं त्यालाही असतं आणि इतरांनाही असताना दिसतं.

काळजीचं वैशिष्ट्य मात्र हे की, आपल्या काळज्या या अनेकदा जितक्या प्रमाणात खऱ्या असतात, काल्पनिक असतात, फारसा विचार न करण्यासारख्या असतात तितक्याच त्या तशाच इतरांच्याही असतात. पण मन आपल्याला असा काही आभास निर्माण करून देत जातं की, माझ्या काळज्या म्हणजे जणू काही आपल्याला प्रत्यक्ष हल्ला करून रक्तबंबाळ करणारा वाघ आहे आणि इतरांच्या काळज्या मात्र कुठलातरी पेंढा भरलेला वाघ येऊन बसावा तशा काल्पनिक आहेत. त्यामुळं तो यात एवढं काळजी करण्यासारखं काय आहे, त्यात एवढं काळजी करण्यासारखं काय आहे - असे सल्ले जाताजाता देऊन त्या काळज्या

किरकोळीत काढू पहातो.

वास्तविक स्वतःच्या काय, इतरांच्या काय काळज्यांचे विषय, तीव्रता, अस्वस्थता - यांत तसा काही फरक नसतो. अर्थातच, त्या दूर करण्याच्या मार्गातही असाच काही फरक नसला पाहिजे. कारण काळजी करणारं मन तेच, विषय तेच, कल्पना त्याच, काळजी करण्याच्या पद्धतीही त्याच. तर, कुणा विशिष्ट माणसाचा काळजीचा प्रश्न सोडवण्यापेक्षा 'मूळ काळजी'चाच प्रश्न सोडवणं, त्याचे मार्ग पाहाणं हाच त्यावरचा खरा इलाज ठरू शकेल.

आपण एखाद्या प्रवासाला निघतो. वाहन ठरवतो. ते ठरवण्यापूर्वी आपण वाहन, त्याचा चालक, त्याला लागणारं इंधन, चालवणाऱ्याचं कौशल्य - अशा गोष्टींची एकदा काळजी करतो, त्यावर विचार करतो. पण ते एकदा ठरलं आणि चालक आपल्या जागेवर बसला की, आपण जिथं जायचं आहे त्या ठिकाणी जाण्यासाठी लागणाऱ्या वस्तू, सामान - अशा गोष्टी निश्चिंतपणे गाडीत ठेवून वाहनात शांतपणे बसून राहातो. गाडी सुरू झाल्यावर तर प्रत्येक क्षणी अडीअडचणी असतात, वेग कमीजास्त होत असतात. अपघात चुकवावे लागतात. अचानक येणाऱ्या गोष्टींना तोंड द्यावं लागतं. म्हटलं तर यांतली प्रत्येक गोष्ट आपल्याला काळजी करण्यासारखी ठरू शकते. पण एकदा त्या चालकाच्या हाती गाडी सोपवल्यावर आपल्याला एरवी प्रतिक्षणी काळजी वाटायला लावणाऱ्या कुठल्या गोष्टींचा आपण विचारही करीत नाही. उलट वाचन करतो, जप करतो, झोपी जातो.

कृष्णदास महाराज म्हणतात की, अकारण काळजी करणाऱ्या मनाला तू जर आपल्या जीवनाचा चालक असलेल्या रामदासांच्या - गुरूंच्या स्वाधीन करून देशील तर तुझ्या हे लक्षात येईल की, एकदा तू सोपवलंस तर, 'मना रामदासा तुझी सर्व चिंता !'

* *

## १३. 'विचारे पहा घोर संसार भासे !'

पशूपेक्षा माणसाला ज्या काही विलक्षण शक्ती दिल्या आहेत, त्यांची त्याला आयुष्यभरात तरी कल्पना येते की नाही, कुणास ठाऊक! पशूंपेक्षा आपल्या मिळालेल्या वेगळेपणाची, जादा शक्तींची कल्पना येणं - हेच मुळात कठीण आहे. अर्थात अनेकदा असंही होतं, आपल्याकडं एखादी गोष्ट जादा आहे, हे माहीत नसलं, तशी त्याची वेगळी कल्पना नसली तरी, तिचा वापर मात्र माणूस करू शकतो. तसा तर एखादा पशूही चार पायांवर पळतो, एखादा कीटक चार किंवा सहा पायांवर झरझरझर जातो. एखादा माणूसही दोन पायांनी विलक्षण वेगानं पळत जाऊ शकतो.

यात माणूस म्हणून पशू चार पायांनी किंवा कीटक सहा पायांनी पळतो आहे आणि त्याच वेळी आपण मात्र केवळ दोन पायांवर पळतो आहोत, वेळी त्याच्यापेक्षाही वेगानं पळू शकतो आहोत - यात आपल्याकडल्या दोन पायांतच एवढी विलक्षण पळण्याची किंवा उड्या घेण्याची किंवा झाडांवर चढून जाण्याची, पाण्यात पोहण्याची - अशा अनेक वेगळ्या शक्ती सगळ्या शरीराच्या ठेवणीत दिलेल्या आहेत - याची त्याला जाणीव असेलच असं नाही. पण ही जाणीव नसताना, आधी म्हटलं तसा मनुष्य त्याचा नकळत वापर मात्र करू शकतो.

विचार केला तर, अशा अनेक गोष्टी लक्षात येतील. पशुपक्ष्यांच्या जीवनात, त्यांच्या आजूबाजूला कळपात जे प्राणी-पशू वावरतात त्यांच्यात्यांच्या कळपातल्या त्या प्राण्यांची आठवण त्यांना असते. त्यांना जाग आलेली कळते, उजाडलेलं कळतं. ते तहानेला बरोबर तळ्यावर जातात, भुकेला शिकार करतात, भूक भागली की, रानात कुठंतरी मोठमोठ्या झाडांच्या सावल्यांखाली सुस्तावून झोपी जातात.

फारसा विचार केला नसला तर, प्राण्यांकडून आनुवंशिकतेनं मिळालेल्या या जाणिवा माणसाच्या ठिकाणीसुद्धा अशाच कार्यरत असताना दिसतील. वापरल्या जाताना दिसतील. विचार केला तर, हा

फरक लक्षात येईल की, काल भूक लागली तेव्हा माणसानं जे अन्न, फळफळावळ गोळा केलं असेल, काही शिजवून, पकवून ठेवलं असेल, त्यावर त्याची कालची भूकही भागली असेल. तो इतर प्राण्यांसारखा सुस्तावून झोपीही गेला असेल.

पण आज उठल्यावर त्याच्या लक्षात येतं की, अरे, कालचं आपलं शिजवलेलं अन्न, गोळा केलेली फळफळावळ अजून शिल्लक आहे. त्याच्यावर नुसती त्याची दृष्टी पडली तरी, त्याच्या मनाशी एक विचार येऊन जातो की, हे सारं - जे काही कष्टानं गोळा केलेलं होतं ते अजून शिल्लक आहे. आज मला, माझ्याबरोबरच्या या समूहानं राहाणाऱ्या माणसांना भूक लागली, ही गोष्ट खरी आहे. त्यासाठी इतर प्राण्यांसारखी आपल्याला आज धडपड करावी लागणार, हेही खरं आहे. पण हे कालचं राहिलेलं अन्न, फळं - अशा गोष्टी जर चांगल्या असतील, खाण्यासारख्या असतील तर त्या तशाच कुठंतरी टाकून जाण्याचं, विसरून जाण्याचं काहीच कारण नाही. आज दहा फळं लागणार असतील, दोन पातेली अन्न लागणार असेल आणि जर कालची पाच फळं माझ्याकडं असतील, एक पातेलंभर अन्न असेल - तर, उरलेली पाच फळं आणि एखादं पातेलंभर अन्न शिजवलं तरी, आज माझं आणि माझ्याबरोबरच्या माणसांचं भुकेचं काम भागू शकतं.

हे विचार करण्याचं त्याच्या मनात सामर्थ्य आहे. त्यामुळं अन्न, वेळ, सामग्री - अशा गोष्टी वाचवण्याचं सामर्थ्य आहे. त्या जपून पुरवण्याची शक्ती आहे. विचार आहे. हा विचार तो जाणीवपूर्वक करू शकतो, याचं कारण त्याला काल घडलेल्या गोष्टींचं भान आज आहे. उद्या घडणाऱ्या गोष्टींची जाणीव त्याला आज होऊ शकते. हे अशासाठी लक्षात घ्यायचं की, अशीच एखादी अन्न भागवण्यासाठी केलेली शिकार पोट भरल्यावर तिथंच खाऊन टाकून इतर प्राणी मात्र कुठंतरी जंगलात जाऊन, सुस्तावून झोपी जातील.

उद्या उजाडेल त्यावेळेला निसर्गाच्या क्रमानं त्यांना भूक लागेल. ते पुन्हा भक्ष्य शोधत हिंडतील. कुणावर हल्ला करतील. काही खाद्य

मिळवतील. ते एकमेकांत वाटून खातील. उरलेलं टाकून देतील.

यात ही विचाराची शक्ती, कालच्या आणि उद्याच्या काळाचं भान, त्यावर विचार करून काही निर्णय घेण्याची शक्ती - या साऱ्या नसल्यामुळं कालची अर्धवट पडलेली शिकार तिथंच राहील आणि आज नव्या भक्ष्याचा जीव जाईल आणि तेही पुन्हा तसंच अर्धवट पडेल. पशू कुठंतरी निघून जातील.

यासाठी मनुष्याला जागं होऊन हा विचार करावा लागेल की, काल आपण जादा राहिलेलं अन्न कुठं ठेवलं, ते आज आपण शोधून काढू शकू का, त्याचा आजच्या वापरासाठी उपयोग करण्याच्या काही कल्पना आपण करू शकतो का, तेते अन्न वापरून आपण आजची भूक भागवून या निसर्गातलं काही अन्न वाचवू शकतो का, ते कुणा दुसऱ्या गरजूला उपयोगी पडू शकेल का - इतके असंख्य विचार आणि कल्पना, काळ, दिशा - अशा विलक्षण क्षमता माणसाच्या ठिकाणी दिलेल्या आहेत. त्या जाणीवपूर्वक वापरल्या गेल्या नाहीत तर, कालचे विचार, उद्याच्या चिंता, आपलं पुढं कसं होईल, मृत्यूचं भय - अशा असंख्य चित्रविचित्र घोर कल्पना करण्यातही या विचारासारख्या शक्तींचा दुरुपयोग होऊ शकतो आणि त्यामुळं हा संसाराचा घोर रोज मनाला लागतो आणि आपला दिवस वाया जाऊ शकतो. पण तेच जर या शक्तींचा सदुपयोग आपण शिकलो तर, याच शक्तींचा आपल्या आयुष्याच्या सार्थकासाठीही आपण उपयोग करून घेऊ शकतो. म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात,

'विचारे पहा घोर संसार भासे !'

म्हणून अशा माणसाच्या ठिकाणच्या विलक्षण शक्तींचा सावध वापर करण्याचा मार्ग आपण शिकून घेऊ आणि आपलं मनुष्यजीवन निश्चितपणे सार्थकी लावू !

* *

## १४. 'तरी भोग तू या तनूचाचि मानी !'

मनुष्याच्या प्रत्येक कर्माला परिणाम आहे. तसा तर साऱ्या जगात कार्यकारण भाव भरून राहिलेला आहेच. आंब्याची कोय लावावी आणि आंब्याचं झाड यावं, त्याला आंबे लागावे. तसं साऱ्या कर्मांचं आणि त्याच्या परिणामांचं होत असतं. आंब्याची कोय लावून येणाऱ्या झाडाला जशी पपई किंवा फणस लागत नाहीत तसंच कळायला खरं तर हे सारं सोपं आहे.

आपल्याशी लोक जे वागतात, ते कधी आपल्याला कटू वाटतं, कधी प्रिय वाटतं, कधी हवंसं वाटतं, कधी नकोसं वाटतं. आपल्याला ते वेगवेगळ्या वेळी वेगवेगळंसुद्धा वाटतं. सकाळचाच गोड शब्द आपल्याला संध्याकाळी कडू वाटतो. एखाद्याशी चांगलं वागून तो विपरीत वागला, असं वाटतं. त्यामुळं आपल्या मनाचे सुखदुःखाचे चढउतार सतत सुरू राहतात.

खरंतर कार्यकारण भाव जर इतका स्पष्ट आणि निश्चित असेल तर, आपल्याला परिणाम कसेही वाटोत, झालेले परिणाम बरोबर असणार यात कुठलीच शंका असायचं कारण नाही. सुखदुःखाच्या, हवेनकोपणाच्या प्रतिक्रिया या केवळ माझ्या त्यात्या वेळच्या तात्कालिक प्रतिक्रिया असतात. मनाचे हेलकावे असतात.

मला वाटलं म्हणून बाहेर हवामान पावसाळी पडत नाही की, ढगाळ होत नाही की, सूर्यप्रकाशानं भरून जात नाही. निसर्गाच्या क्रमाच्याप्रमाणं, हवामानात घडणाऱ्या बदलाप्रमाणं तेते हवामान जसं तशातशा पद्धतीनं पडत राहातं, बदलत राहातं, तसंच खरंतर या कर्मांच्या परिणामांचं आहे.

आता आपल्या मनःस्थितीप्रमाणं एखाद्यानं आपल्या मनासारखं वागावं, आपल्याला भेटावं, आपल्याशी बोलावं किंवा वेळी आपल्याला भेटू नये, दिसू नये, आपल्यापासून दूर राहावं, आपल्याशी संपर्क ठेवू नये - अशा ज्या प्रतिक्रिया माणसाच्या मनात येत असतात, त्या तशा

वेळोवेळी, प्रसंगोपात सगळ्यांच्याच मनात येत असतात. त्या सगळ्यांच्याच मनात येतात म्हणून त्या बरोबर असतात किंवा त्या येणं स्वाभाविक आहे, असं समजण्याचं मुळीच कारण नाही.

मनाला अनुकूल वाटणाऱ्या गोष्टी सुखासारख्या हव्याशा वाटतात. ती माणसं, त्यांचं बोलणं, त्यांची भेट, त्यांच्या प्रतिक्रिया हव्याशा वाटतात. तेच मनाला प्रतिकूल वाटणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत उलट घडतं. त्यांचा संपर्क नको वाटतो. त्यांनी बोलू नये, भेटू नये, त्यांचा संपर्क येऊ नये - असं वाटत राहातं.

याचा शांतपणे विचार केला तर लक्षात येईल की, हे सारं आपल्या मनाच्या हवेनकोपणाचं प्रतिबिंब आहे. त्याचा कुठल्या निश्चित कार्यकारणभावाशी किंवा त्या अर्थानं जगाच्या व्यवस्थेशीही कसला संबंध नाही. त्याचं आणखी एक कारण असं की, नियमांना जो निश्चितपणा असतो तो मनाच्या असल्या हवेनकोपणाला आणि प्रतिक्रियांना कधी नसतो. त्याला क्षणात जे हवंसं वाटतं तेच दुसऱ्या क्षणी, दुसऱ्या दिवशी अगदी नकोसंही वाटू शकतं.

यावर आता अधिक विचार करण्याची वेळ आली आहे. जर कार्यकारणाच्या पद्धतीनं या जगातल्या घटना, प्रतिक्रिया, माणसांचे संबंध - येतजात असतील तर त्याला कारण माझ्या मनाच्या हवेनकोपणाचा काही संबंध नाही. तर, कर्म करणारं त्याचं जे शरीर, इतरांशी त्यामुळं आलेले संबंध, त्यात घडणारं चूक-बरोबर, त्याचे होणारे परिणाम - यांनुसार हे सारं घडत आलं असलं पाहिजे, चालत आलं असलं पाहिजे.

तापलेल्या तव्याला हात लागल्यावर जसा चटका बसावा आणि तेच झाडावर उमललेल्या एखाद्या गुलाबाच्या फुलाच्या पाकळीवरून हात फिरवल्यावर हाताला रेशमी स्पर्श व्हावा - यात मनाचा कुठला संबंध नसून, शरीरानं केलेल्या दोन कृतींचा संबंध आहे. एक चुकीची आहे म्हणून चटका देणारी ठरते तर, दुसरी विचारपूर्वक, हळूवार व योग्य केलेली आहे म्हणून शरीराला सुख देणारी ठरते. तसा हा सारा

सुखदुःखाच्या भोगांचा - परिणामांचा मामला आहे. हे ओळखून घेऊन, शरीराच्या वाट्याला येणारी सुखदुःख, त्याला हव्याशा वाटणाऱ्या, नकोशा वाटणाऱ्या, कधी त्रास-ताप देणाऱ्या, कधी सुख देणाऱ्या अशा ज्या अनेक घटना आणि प्रसंग माणसाच्या आयुष्यात घडोघडी सुरू आहेत त्यांचा मनाशी संबंध नाही, हे ओळखावं, यासाठी संत आपल्याला सावध करीत आहेत.

ते स्पष्ट करतात की, यात सुख आणि दुःख असेसुद्धा कुठले विभाग आपण करणं चुकीचं होईल. लाभ-हानी अशाही दृष्टीनं पाहाणं चुकीचं ठरेल. जी कर्मं शरीरानं योग्य केली, त्याची त्यात्या प्रकारची फळं - मग ती दुःखात्मक, यातनात्मक कशीही असोत - त्यांचा मनावर परिणाम होऊ न देता ते भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवावं आणि जे या साऱ्या शरीराच्या भोगांपासून आपल्याला अलिप्त ठेवून, भगवंताशी जोडून देऊन, आनंदाची प्राप्ती करून देऊ शकेल त्या सगुण रामरायाच्या ठिकाणीच मनानं अत्यंत प्रेम धरून, या साऱ्या भोगदुःखांपासून अलिप्त राहावं. ती सारी भोगदुःखं या शरीराचीच आहेत, हे ओळखावं आणि ते मानून, त्यावर स्थिर राहून, आपली सगुणाच्या आनंदाची स्थिती सोडू नये. म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात,

'मना पापसंचीत येता फिटाया ।
करी यातना ते पिडी सर्व काया ।
बहूतापरी होतसे सर्व हानी ।
तरि भोग तू या तनूचाचि मानी !'

एकदा भोग शरीराचेच, हे ठरलं की, आता मनानं, नामानं भगवंताच्या आनंदात राहायला अडचण कुठली ?

* *

## १५. 'म्हणोनी मना संग सोडोनि राहे !'

मनुष्याला दिलेली विचार करायची शक्ती ही खरोखरच अत्यंत दुर्लभ चिंतामणीसारखी विद्या आहे. चांगल्या इच्छा धरून, विवेकी विचार करून, असा मध्यावर उभा असलेला माणूस अविवेकी दानव होऊ शकतो तर, तोच सत्संगतीनं, सात्त्विक श्रवणानं-आचारानं देवही होऊ शकतो. त्या अर्थानं देव होण्यानं देहात बाह्यतः कुठला फरक होत नसला तरी, कृतींवर मात्र अक्षरशः देवांच्या थोरवीला मागं टाकील अशा सात्त्विक, हिताच्या दैवी कृती तो करू शकतो.

मनुष्याला विचाराच्या बाबतीत एक फार मोठं सामर्थ्य आहे. इतर प्राण्यांना जेव्हा तहानभूकेचं-ऊनपावसाचं, विजा कोसळल्याचं, दरडी ढासळल्याचं दुःख सहन करावं लागतं, झाडं उन्मळून अंगावर पडतात तेव्हा त्यांच्या शरीरांना अनेक प्रकारच्या इजा होतात. प्राणी रक्तबंबाळ होतात, त्यांना यातना सोसाव्या लागतात.

या यातनांच्या बाबतीत प्राण्यांचं वैशिष्ट्य हे की, त्या यातनांशी ते तादात्म्य असतात. त्यांच्या शरीराला लागलं, त्याला दुःख झालं, यातना झाल्या म्हणजे ते दुःख त्यांना स्वतःलाच झालं - यापलीकडं त्यांना विचार करता येत नाही. एखादा प्राणी लागलेल्या दगडानं रक्तबंबाळ झाला आहे तर, तो त्या दुःखाशी तादात्म्य होऊन एकतर त्याच्या शक्तीप्रमाणं प्रतिहल्ला करील किंवा तो दुर्बळ असेल तर, त्या दुःखानं जीव खाऊन पळत सुटेल. पण असा कुठला दगड त्याला लागला आहे, त्याच्या अंगातून रक्त येत आहे आणि हा या शरीराचा भोग आहे, त्यामुळं तिथं दुःख होतं आहे - ते तो पाहात बसला आहे, असं दृश्य आपल्याला आढळत नाही. आपापल्या तनूशी-देहाशी तादात्म्यानं विचार करणं एवढंच मर्यादित जीवन इतर प्राण्यांच्या वाट्याला आलं आहे, याची विचार केला तरच आपल्याला जाणीव होऊ शकेल.

त्या दुःखाशी, त्या शरीराशी, वेळी शरीराच्या सुखाशीसुद्धा तादात्म्य होण्याची सक्ती त्याच्यावर नाही, हे खरंतर एक फार विलक्षण

सत्य आहे. माणसाच्या ठिकाणी, असं शरीरापासून मनानं बाजूला होऊन तटस्थपणे विचार करणं, अशी शक्ती तर ठेवली आहेच. पण माणसाची झेप याहीपेक्षा विलक्षण आहे. त्याचे असंख्य अनुभव सामान्य माणसांपासून अलौकिक संतांपर्यंत आपल्याला सर्वत्र पहायला मिळतील.

अरुणाचलाचे थोर सत्पुरुष श्री रमण महर्षी यांच्या शरीराला काही कारणानं काही विकार होऊन, त्यातून गळू निर्माण झालं. त्या आजाराची गुंतागुंत वाढत गेली. स्वतः श्री रमणांना त्या अर्थानं शरीराची कुठली काळजी नव्हती. त्याच्या सुखदुःखाचीही फिकीर ते करीत नव्हते. असं हे सामर्थ्य फक्त मनुष्यजन्मात आणि देहाहून वेगळं वागण्याच्या शक्तीतच आहे.

पण आजूबाजूच्या मंडळींना त्या आजारामुळं श्री रमणांच्या शरीराला होणाऱ्या वेदना पाहावेनात. म्हणून त्यांनी आपापल्या परीनं वेगवेगळ्या औषधपद्धतींचे उपचार करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. नेहमीच्या झाडपाला-आयुर्वेद-होमिओपॅथी अशा उपचारांना जेव्हा हा आजार दाद देईना, तेव्हा मात्र जवळच्या इतर मंडळींनी ॲलोपॅथीच्या तज्ज्ञांना बोलावून त्यांचा सल्ला घ्यायचं ठरवलं. त्यात ते गळू काढावं एवढाच पर्याय उरला होता. रमणांना या साऱ्याच रोगात काय, किंवा बरं होण्यात काय, त्या अर्थानं कुठलाच रस नव्हता. तुम्हाला आवश्यक वाटेल ते उपचार तुम्ही करू शकता, असं त्यांनी सांगितलं.

आजार आणखी पसरू नये म्हणून जवळच्या मोठ्या शहरातली तज्ज्ञ मंडळी एकत्र येऊन, त्यांनी शस्त्रक्रिया करायची ठरवली. ही शस्त्रक्रिया अर्थातच तशी मोठी असल्यामुळं शरीराचा हा भाग काढून टाकताना, तो कापण्याच्या वेदना होणं स्वाभाविक होतं. इतर प्राणी आणि माणसाच्या ठिकाणची असलेली विचारानं स्वतःला वेगळं पाहू शकण्याची क्षमता - यांमधला खरा फरक इथंच आहे. त्या आजाराकडं ते स्वतःचा आजार, त्याचं दुःख, वेदना म्हणून पाहात नव्हते. तर, तो आजार शरीराचा आहे, दुःख शरीराचं आहे म्हणून पाहू शकत होते.

म्हणून ज्यावेळेला त्या आजाराची शस्त्रक्रिया करायची ठरली

तेव्हा डॉक्टरमंडळींनी नेहमीप्रमाणं सांगितलं की, या शस्त्रक्रियेत खूप वेदना होतात. त्यामुळं आम्ही शस्त्रक्रिया सुरू करण्यापूर्वी तुम्हाला कल्पना देऊ आणि वेदनांची जाणीव मनाला होऊ नये म्हणून आवश्यक तेवढी वेदनाशामकं आणि भूलही तुम्हाला देऊ. शस्त्रक्रियेनंतर काही काळानं या वेदना कमी होतील आणि भूलही उतरेल. म्हणजे तुम्हाला त्रास होणार नाही. त्यावर श्री रमण महर्षी म्हणाले, 'तुम्ही शरीरावर शस्त्रक्रिया करणार आहात ना ? गळू शरीराला झालं आहे ना ? वेदना या शरीराच्या आहेत. मला कुठली भूल न देता तुम्ही शस्त्रक्रिया करू शकता.' डॉक्टर्सनी आश्चर्यानं विचारलं की, 'मग तुम्ही या वेदना कशा सहन करणार ?' त्यावर श्री रमण म्हणाले, 'शरीराच्या वेदना मनाला-मेंदूला पोचवणारी जी जाणीव आहे, ती जाणीव त्या इजा झालेल्या भागातून, तुमचं हे काम चालेपर्यंत, मी काढून घेईन आणि उलट तुम्ही कशीकशी शस्त्रक्रिया करता, ते मी पाहीन, शिकून घेईन !' त्याप्रमाणं प्रत्यक्ष श्री महर्षींची शस्त्रक्रियाही झाली.

म्हणून श्री कृष्णदास महाराज म्हणतात ते आपण लक्षात ठेवावं की, आपण शरीरच आहोत, असं समजून चाललो तर, इतर प्राण्यांसारखीच शरीराची सुखदुःखं आपल्याला तादात्म्यानं अकारण भोगावी लागतील. पण माणसाच्या ठिकाणचं हे शरीराला वेगळं समजण्याचं आणि आपलं मन-आत्मस्वरूप वेगळं समजण्याचं सामर्थ्य वापरलं तर, अकारण अज्ञानानं निर्माण होणाऱ्या अभिमान, दुःख - यांना सामोरं जावं लागणार नाही. म्हणून शरीराचा संग मनानं सोडला आणि भगवंताचं प्रेमानं ध्यान धरलं तर, या जन्मातही सुखी होता येईल आणि पुढच्या जन्माचीही गरज लागणार नाही.

'मना तद्रुपानेचि तो जन्म लाहे.. ।
..म्हणोनी मना संग सोडोनि राहे ।।'

* *

## १६. 'तुला भक्ति वैराग्य - हे ज्ञान शोभे !'

मनाला वेगवेगळ्या मार्गानं समजावून देऊन संत बोध करीत असतात. उत्क्रांतीत प्राण्यांपासून सतत पशुपक्ष्यांच्या जीवनाचा सहवास झाल्यामुळं, माणसाच्या ठिकाणी भूक-तहान-आहार-भय अशाच प्रेरणांचा आढळ नकळत होत असतो.

आजचंही त्याचं जीवन बरंचसं तसंच जातं. विचार केला नाही तर, मनुष्य असाच जगत एक दिवशी काळाच्या ओघात नाहीसाही होऊन जाईल. पण त्यामुळं निसर्गानं एवढे कष्ट घेऊन निर्माण केलेली ही देवासारखी कलाकृती वाया जाईल. याची संतांना तळमळ वाटते. म्हणून ते असा बोध सारखा करीत असताना आणि माणसाला त्याचं वेगळेपण लक्षात आणून देताना दिसतात.

कुणी संत-गुरूकडं जाऊन शिकतात, कुणी बोधाचे ग्रंथ वाचून हे वेगळेपण जाणून घेतात. कुणी साधनेनं हे वेगळेपण प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहातात. कुणी इतर निसर्गाचं निरीक्षण करून त्याच्या मर्यादा, अविकसित विचार, शक्ती यांचा अभ्यास करून, ते समजून घेताना दिसतात. आपल्या ठिकाणची झेप ओळखताना दिसतात. काही वेळा असे संत साधनेनं हे वेगळेपण प्रत्यक्ष अमलात आणतात आणि नराचे नारायण होऊन जातात. मार्ग कुणाचा कुठलाही असला तरी, तो त्याच्यात्याच्या काळाप्रमाणं, मनाच्या ठेवणीप्रमाणं, सामर्थ्याच्या कुवतीप्रमाणं असतो. योगमार्गाची बैठक वेगळी, ध्यानाची बैठक वेगळी, आज्ञापालनाची बैठक वेगळी, विवेकाची बैठक वेगळी - पण प्रत्येकाच्या ठिकाणी एक वेगळेपण मात्र प्राणिवर्गापेक्षा आगळं आणि समान आहे.

आपल्या लक्षात येईल की, माणसाचं इतर प्राण्यांपेक्षा असलेलं वेगळेपण हे शारीरिक ठेवणीपासून मनाच्या ठेवणीपर्यंत कुठल्याही प्रकारचं असू दे, मनुष्याच्या ठिकाणी खरं वेगळेपण हे त्याच्या ज्ञानाच्या शक्तीत आहे. जाणण्याच्या शक्तीत आहे. पशुपक्ष्यांच्या, प्राण्यांच्या ठिकाणचं अज्ञान आणि माणसाच्या ठिकाणचं विलक्षण ज्ञान - यांतला

भेद खूप सूक्ष्मही आहे, जाणवणाराही आहे आणि खूप व्यापकही आहे.

या साऱ्यांत जर कुठल्या बाबतीत माणसाच्या ज्ञानाच्या वेगळेपणाची कसोटी लागत असेल तर, ती त्याच्या ठिकाणच्या भक्ती आणि वैराग्य - यांच्यामध्ये आहे. भक्तीनं मनुष्याचं मन पवित्र, शुद्ध आणि व्यापक होऊन, तशाच सच्चिदानंदमय असलेल्या भगवंताशी तादात्म्य होऊ शकतं. एवढ्याशा पाण्याच्या थेंबाचा समुद्रात मिसळल्यावर समुद्राएवढा आकार व्हावा, तसं भक्तीनं घडतं. समुद्राची विशालता, त्याचं सामर्थ्य, त्याचं वैभव, त्याची अथांगता - या साऱ्यांनी भक्तीनं व्यापक झालेला आणि भावानं भगवंताशी तादात्म्य झालेला एवढासा मनुष्यजीव इतका व्यापक होऊ शकतो.

यात वैराग्याचा संबंध आणि वैशिष्ट्य मोठं लक्षणीय आहे. भक्तीनं थेंब जसं स्वतःचं वेगळेपण, स्वतःची संकुचितता, वैशिष्ट्यं यांचा त्याग करून टाकतो आणि जसा काही समुद्र असेल तसा होऊन त्यात स्वतःला मिसळून टाकतो.

तसंच वैराग्यामध्ये मनुष्य स्वतःचे म्हणून वेगळे असलेले विचार, वेगळी असलेली वैशिष्ट्यं आपापल्या विचारांविषयी, आवडीनिवडींविषयी, हवेनकोपणाविषयी असलेलं प्रेम, त्याविषयी असलेली आसक्ती यांचे विचार विरक्तपणानं टाकून देतो. त्याचा त्याग करतो आणि जसा भगवंताचा विचार, भगवंताची इच्छा, भगवंताला उचित, योग्य वाटत असेल, तेच त्याच्या हिताचं आहे, माझं म्हणून स्वतंत्र काही अस्तित्व नाही - अशा विचाराला येतो. हे त्याच्या वैराग्याचं लक्षण आहे. या ठिकाणी एक मुद्दा लक्षणीय आहे की, भक्ती आणि वैराग्य यांचा संबंध मोठा विलक्षण आहे. खऱ्या भक्तीनं अंगी वैराग्य येतं आणि अंगभूत वैराग्यानं खरी भक्ती करता येते.

आपल्याला श्री अंबुराव महाराज हे थोर सत्पुरुष माहिती असतील. त्यांच्या ठिकाणी भक्ती आणि वैराग्य या दोन्हींचाही मोठा मनोज्ञ संगम होता. त्यांच्या गुरूंनी त्यांना मठ झाडून काढण्याचं काम दिलं होतं. रोज गुरू दर्शनाला मठात येत असत. श्री अंबुराव

महाराजांच्या ठिकाणी भक्तीचा इतका उत्कर्ष होता की, भक्ती म्हणजे गुरू म्हणतील ते निःसंशयपणे खरं वाटणं आणि करणं ! एके दिवशी त्यांच्या गुरूंना मठात दर्शनाला यायला इतर कामांमुळं थोडा उशीर झाला. त्यावेळी अंबुराव महाराज मठ झाडीत होते. त्यांना झाडताना पाहून गुरू एकदम रागावून म्हणाले, 'अरे, ही काय मठ झाडायची वेळ झाली ? लोक दर्शनाला यायच्या आधी मठ झाडायला नको का?' अंबुराव महाराज हातातली केरसुणी कोपऱ्यात ठेवून, होय महाराज, म्हणून हात जोडून उभे राहिले.

दर्शन घेऊन परत जाताना, अंबुराव महाराजांना हात जोडून उभे असलेले बघून, गुरू पुन्हा रागानं म्हणाले, 'अरे, हात जोडून काय उभा राहिलास ? मठ कोण झाडणार ?' अंबुराव महाराज क्षमा मागून म्हणाले, 'होय, झाडतो महाराज.' असं म्हणून त्यांनी मठ झाडायला सुरुवात केली. तसं पाहिलं तर, ज्याची भक्ती किंवा भक्तीचं ज्ञान पक्कं नाही त्याला, गुरूच्या बोलण्यात बोलणं नाही, असं वाटेल. तर, ज्याचं वैराग्य पक्कं नाही, त्याला अशा परस्परविरोधी गोष्टी गुरू सांगतात म्हणून करणं अवघड वाटेल. एक भक्तीला आड येईल, एक विरक्तीला आड येईल. पण माणसाच्याच ठिकाणी हे सामर्थ्य आहे की, तो वैराग्याच्या शक्तीनं कुठल्याही - अगदी स्वतःच्या मतांचाही - त्याग करून निरासक्तपणे वागू शकतो आणि खऱ्या भक्तीच्या ज्ञानानं, गुरू म्हणेल ती आज्ञा भगवंताचा शब्द वाटून तो अमलात आणू शकतो. भक्ती आणि वैराग्य या सहसा एकत्र न आढळणाऱ्या गोष्टी माणसाच्याच ठिकाणी आढळतात आणि त्याला खऱ्या अर्थानं आत्मज्ञानाची शोभा देतात. त्याचं सार्थक करतात. म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात,

'तुला भक्ति वैराग्य - हे ज्ञान शोभे !'

अशा मनुष्यजन्माला शोभा देणाऱ्या ज्ञानाची उपासना आपल्या हातून घडावी, अशी प्रार्थना करूया..!

* *

## १७. 'तरी देह मी, हे नसावेचि ओझे !'

माणूस जन्माला आल्यापासून आपल्याला सुख कसं मिळेल, याची चिंता करतोच आहे. त्यासाठी वेगवेगळ्या अनुभवी लोकांकडून तो शिकतो आहे. काय केल्यानं सुखाची प्राप्ती होईल, सुखाची साधनं कशी मिळतील, देहाला वेगवेगळे सुखाचे उपचार कसे मिळतील, साधनं कशी मिळतील - यासाठी तो घरातल्या मोठ्यांचा सल्ला घेतोच आहे. त्याचबरोबर पुढं मोठा झाल्यावर बाहेर मित्रमंडळी, नात्यागोत्यातली माणसं यांचा सल्लाही तो हे सुख मिळवण्यासाठी घेतो आहे.

ही त्याची जशी सुखासाठीची अविश्रांत धडपड चालू आहे, तसाच या धडपडीचा दुसरा भागही तो नकळत पण कटाक्षानं करतो आहे. तो म्हणजे जसं हे सुख मिळावं तसं दुसऱ्या बाजूला दुःख टळावं. ते दुःख भले दैन्यानं, पैसा-वस्तू कमी असल्यामुळं निर्माण होवो, माणसांची मदत नसल्यामुळं निर्माण होवो, बाहेर कुठली मान-सत्ता नसल्यामुळं निर्माण होवो - अशा गोष्टी नसल्यामुळं माणसाच्या शरीराला कसं दुःख भोगावं लागतं, मनाला किती ताप होतो, ते तो रोज पाहात असतो. त्यामुळं एका बाजूला सुख मिळावं यासाठी जितकी धडपड तो करतो तितकेच प्रयत्न आपल्या वाट्याला दुःख येऊ नये, म्हणून तो दुसऱ्या बाजूला करतो.

या दोन्ही बाजूंनी चाललेल्या प्रयत्नांत तो एक गोष्ट नकळत गृहीत धरीत असतो. अनेकांच्या ती आयुष्यभरात लक्षातही येत नाही. ती म्हणजे, त्याचं सर्व सुख आणि दुःख हे अशा तऱ्हेनं काही मिळवण्यानं आणि काही टाळण्यानं पूर्णपणे साधणारी गोष्ट आहे, अशी त्याची नकळत होत जात असलेली समजूत.

तिला समजूत अशासाठी म्हणायचं की, अशा तऱ्हेनं सुखाचे सतरा मार्ग आयुष्यभर चालूनसुद्धा काही सुखं ही माणसाच्या देहाच्या वाट्याला येत नाहीत, ती नाहीतच. एखाद्या आजारी माणसाला गावोगावी हिंडवून औषधपाणी करावं,उपचार करावे, पथ्यपाणी करावं आणि तरीही

तो बरा होऊ नये, त्याला आरोग्याचं सुख म्हणून काही ते मिळू नये - असं जसं एखाद्याच्या बाबतीत होतं, तसं या सुखाच्या बाबतीत होतं. किती ते प्रयत्न करूनही, एखादं आरोग्याचं-मुलाबाळांचं-पैसापाण्याचं-चांगुलपणाचं सुख एखाद्याला लागत नाही म्हणजे नाही.

तीच गोष्ट अशा दुःखाच्या बाबतीतही होत असते. असे दुःख टाळण्याचे प्रयत्न त्याच्याकडून अनेकांच्या सल्ल्यानं आयुष्यभर होत राहातात. पण इतकं करूनही, रोग टळावा, साधा काटा टोचू नये, कुणी दुःखाचा शब्द बोलू नये, कुणी कसलं पैशाचं नुकसान करू नये - अशा अनेक गोष्टींचं दुःख वाट्याला येऊ नये म्हणून किती ती काळजी घेऊनसुद्धा माणसाला कुठंतरी नुकसान होतं, अनपेक्षितपणे कुणी अपमान करतं, कटू शब्द ऐकून घ्यावे लागतात, अकारण कुठं पैसा जातो - अखेर दुःख टळत नाही ते नाहीच.

म्हणून श्री कृष्णदास महाराजांसारखे संत आपल्याला दुःखाकडं वेगळ्या पद्धतीनं बघायला शिकवतात. ते म्हणतात, तुझा आजचा जो सुखदुःखाचा विचार चालू आहे, तो मुख्यतः देहाला धरून चालला आहे, त्यापासून मनाला होणाऱ्या सुखदुःखाला धरून चालला आहे. देह तर चंचल आहे, नश्वर आहे, बदलता आहे. तो कधीच एका चांगल्या सुखाच्या स्थितीला काय किंवा दुःखाच्या स्थितीला काय, टिकणार नाही. आपण त्याच्यावर आपलं मन चिकटवून ठेवल्यामुळं सतत हालणाऱ्या पाण्यातल्या नावेला जसे हेलकावे बसणार आणि तसा आतला मनुष्य सतत हेलकावे खात राहाणार तसं या मनाला - देहाला चिकटवून ठेवल्यामुळं त्याला चंचल देहाबरोबर सुखदुःखाचे हेलकावे बसणार, हे लक्षात घे.

त्यासाठी उपाय सांगताना ते म्हणतात की, हा देह सुखात राहावा म्हणून जी एका बाजूनं तुझी धडपड चालू आहे आणि त्याचबरोबर तो दुःखात राहू नये म्हणून जी तुझी धडपड दुसऱ्या बाजूनं चालू आहे ती सारी धडपड एका चुकीच्या गृहीत धरलेल्या गोष्टीवर चालू आहे. ती गोष्ट म्हणजे तू स्वतःला तुझा देह समजत आहेस. त्यामुळं त्याच्या

सुखदुःखाची काळजी तुला रोज लागली आहे आणि अर्थातच सुख मिळवणं आणि दुःख टाळत राहाणं - हे व्याप नकळत तुझ्या मागं लागले आहेत.

कृष्णदास महाराज लक्षात आणून देतात की, तुझा जो हा विचार आहे की, मी देह आहे म्हणून मला सुख मिळावं - दुःख टळावं, तो विचार डोक्यात घेतल्यानंच तुला हे ओझं निर्माण झालं आहे. खरंतर तू हा देह नव्हेसच. तो धारण करून तुझी प्रारब्ध, कर्मं तुला करता यावी, यासाठी निसर्गानं करून दिलेली ती सोय आहे. तिच्यात अर्थातच अनेक कारणांनी सुखदुःखांची भर पडणारच. पण हे सारं लक्षात घेतलंस तर, डोक्यावरचं हे देहाचं ओझं तुला खाली ठेवता येणं शक्य आहे.

देह वापरणं वेगळं आणि देहाच्या सुखदुःखाची ओझी वाहाणं वेगळं. मनाला देहापासून वेगळं करून त्या मनाच्या साहाय्यानं आपलं भगवंताच्या प्राप्तीचं खरं हित साधून घेणं यासाठी खरंतर आपण जन्माला आलो आहोत आणि तसं करण्याचं स्वातंत्र्य आपल्याला आहे. जर मनुष्य असं देहाचं ओझं बाजूला ठेवील, मनाजवळ आपल्या कल्याणाचं हितगुज करील, ते मन सर्व भूतांच्या ठायी रामरूपानं वावरतं आहे, हे लक्षात घेईल तर, मनुष्य स्वतःचंच कल्याण करू शकेल. त्या अर्थानं, रामाचे खरे दास झालेल्या समर्थांना आपल्या उद्धाराची, आपल्या खऱ्या आनंदाची योग्य चिंता आहे आणि तो आनंद ते आपल्याला मिळवूनही देतील. त्यासाठी श्री कृष्णदास महाराज म्हणतात,

'मना तूजपाशी असे हीत माझे ।
तरी देह मी हे नसावेचि ओझे ।
असे सर्व भूती रघूनाथ दाता ।
मना रामदासा तुझी सर्व चिंता !'

* *

## १८. 'मना संशयो हाचि बांधोनि पाडी !'

माणसाच्या वाट्याला रोज जशा अनेक गोष्टी येत असतात. काळजी करूनही त्या टळत नाहीत. त्यात ही काळजीसारखी जशी एक गोष्ट आहे, तशीच मनाच्या दुसऱ्या एका स्वभावाची अडचणही त्याला कायम व्यग्र ठेवीत असते. तिच्यानं त्याच्याच मनाच्या शक्तीचा सारखा ऱ्हास होत असतो.

कोणत्याही सुशिक्षित, विचारी माणसाला हे कळत नाही, असं नाही. पण कळणं, त्यामुळं होणारं नुकसान कळणं - हे वेगळं आणि प्रत्यक्षात ती गोष्ट टाळता येणं, आचरण करणं - हे वेगळं. नकळत होणारं नुकसान एकवेळ माणसाच्या लक्षात येत नसल्यामुळं त्याला त्याचं फार नुकसान करीत नाही, केलं तरी ते त्याच्या लक्षात येत नाही. पण सारं कळूनसवरून होणारं जे नुकसान असतं ते मात्र माणसाला अधिक अस्वस्थ करणारं असतं.

अशी मनाच्या मागं लागलेली आणखी एक न टळणारी गोष्ट म्हणजे 'संशय' ही होय. साध्या व्यवहारात रस्ता रोजचा असला, जाण्याचं ठिकाण, नोकरीची जागा, उद्योगाची जागा तीच असली, जाण्याचं वाहन हातचं असलं, त्याला जायचा सराव असला तरीसुद्धा त्याला बाहेर पडला की, उगाचच गाडी सुरू करताना वाटतं की, आज अमका वार आहे, बाजाराचा दिवस आहे, वाटेत गर्दी तर नसेल, उशीर तर होणार नाही ना, अचानक कुणी काही गाडी चित्रविचित्रपणे चालवून आपल्याला अडचणीत तर आणणार नाही ना, अगदी ऑफिसच्या दारातून गाडी आत गेली तरी आतल्या पार्किंगमध्ये गाडी लावताना त्याला नीट जागा मिळेल का नाही, हा संशय सोडल्याशिवाय राहात नाही.

संध्याकाळी येताना साधा मंडईत गेला तरी, नेहमीचा कुणी भाजीवाला दिसला नाही, त्याच्याजागी दुसरं कुणी तीच भाजी घेऊन बसलं असलं तर, आधीच्या-नेहमीच्या माणसाचं काय झालं असेल,

तो आजारी पडला असेल का, गावाला गेला असेल का, हा नवा माणूस त्याचाच कुणीतरी दिसतो आहे खरा, पण तो त्याच्यासारख्या विश्वासानं आपल्याशी वागेल का, नेहमीच्या रास्त भावात तो आपल्याला भाजी देईल का, तो त्यात काही जुनीपानी मिसळून फसवणार तर नाही ना - असल्या साध्यासाध्या गोष्टींपासून मन हा संशयाचा पाठलाग माणसाच्या मागं दिवसभर लावून ठेवतं.

एकदा का अशा संशयानं मन बांधलं गेलं, अडकलं गेलं की, मग त्याला कुठले फाटे फुटतील, हे सांगणंसुद्धा कठीण आहे. आत्ता म्हटलं तसं, जरी त्या नव्या भाजीवाल्यानं सांगितलं की, नेहमीचा तुमचा माणूस आजारी पडला आहे, त्यामुळं तो येऊ शकला नाही, कोणाची गैरसोय होऊ नये म्हणून त्यानंच मला इथं बसवलं आहे, तुम्ही काळजी करू नका, तुमच्या नेहमीच्याच भावानं, नेहमीच्याच खात्रीनं मी तुमच्याशी व्यवहार करीन - तरीसुद्धा हा सांगतो आहे ते सगळं खरं सांगतो आहे की, आपल्या धंद्याचा जम बसवण्यासाठी आपल्यावर भुरळ पाडतो आहे, आपला विश्वास संपादन करतो आहे - अशा संशयाच्या पाली मनात चुकचुकत राहातात.

अनेकदा तर, सारे व्यवहार अगदी तो माणूस असल्यासारखे विश्वासानं, चोख, बरोबर होऊनसुद्धा यानं सांगितलेली कारणं खरी असतीलच असं मनाला आत कुठंतरी वाटत नाही. जाताजाता पुन्हा एकदा विचारावंसं वाटतं की, त्यांचं कसं आहे. ते कधीपासून येणार आहेत. नक्की येणार आहेत ना. वास्तविक, निदान एवढा व्यवहार व्यवस्थित पार पडल्यावर तरी, मनानं निःसंशय व्हायला काय हरकत आहे ? पण मन ते होऊ देत नाही, हे खरं.

म्हणून संतांचा या मनाच्या वेगवेगळ्या स्वभावांचा आणि त्यामुळं येणाऱ्या अडथळ्यांचा विचार करण्यावर फार भर आहे. हे जर साध्या रोजच्या जाण्यायेण्यात, भाजीपाला आणण्यात होत असेल तर, नोकरी-धंदा निवडण्यात, कुणाशी पैशाचे व्यवहार करण्यात, कुणाशी जमिनीची खरेदी - विक्री करण्यात, कुणाशी भागीदारी करण्यात,

लग्नकार्यासारखे निर्णय घेण्यात - हा मनाचा संशयाचा स्वभाव किती आड येत असेल, याची कल्पनाच केलेली बरी.कृष्णदास महाराज म्हणतात की, संशय हा मनाचा स्वभाव आहे, हे ओळखा. एखाद्या गोष्टीची दुसरी बाजू विचारात घेण्यासाठी एखादी गोष्ट गृहीत धरू नका, तिच्याविषयी शंका घेऊन दुसऱ्या बाजूचाही विचार करा. इतपत ठीक आहे. पण यापेक्षा जर मनाला आणि त्याच्या या संशयाच्या स्वभावाला निर्बंधपणे वाव दिलात तर, तोच संशय आपल्या स्वतःलाच बांधून टाकील आणि आपलं नुकसान केल्याशिवाय राहणार नाही.

खरंतर संशयाची उपयुक्तता आपल्याला माहिती आहे. पण त्याचबरोबर एकदा शंका घेऊन, संशय घेऊन खात्री केल्यानंतर मात्र संशयाची उपयुक्तता संपते. उलट त्याला पुढं वाव दिला तर तो आपल्या सात्त्विक संकल्पांच्या, निश्चयाच्या, ज्ञानाच्या आडच येतो. जी गोष्ट माणसाला निश्चयानं आणि ज्ञानानं करता येणं सहज शक्य आहे, त्या गोष्टीची गाठ हा विघातक संशय पडू देत नाही. उलट त्याला सतत अज्ञानात आणि अनिश्चिततेत ठेवतो. त्याची व्यावहारिक आणि पारमार्थिक प्रगती होऊ देत नाही. संशयाचा हा सारा प्रताप आपण वेळीच अभ्यासायला हवा.

म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात की, समाधान मिळवायचं असेल तर, मनानं निःसंशय होण्याची गरज आहे. संशय व्यवहारात थोडा उपयुक्त आहे हे खरं, पण त्यापेक्षा निःसंशय राहाण्यानं भगवंताचा लाभ नक्की अधिक होणार आहे. ते म्हणतात,

'मना संशयो हाचि बांधोनि पाडी ।
मना निश्चयो ज्ञान वैराग्य जोडी !'

म्हणून देव गाठायला असल्या संशयाच्या जाळ्यात फसून जाण्यापेक्षा निश्चयानं निःसंशय होऊन राहिलं तर भगवंत नक्की मिळेल!

* *

## १९. 'अशी ती तुला होतसे बंधकारी !'

माणसांचं आपण निरीक्षण केलं असेल तर, लक्षात येईल की, माणसांचा स्वभाव हा साधारणतः इतर लोक जे करतात तसं करण्याचा आहे. लोक जशी वेशभूषा करतात तशी करावी, आजूबाजूचे खातातपितात तसं खावंप्यावं, ऑफिसमधले इतर वागतात तसं वागावं, नातेवाईक जसे विचार करतात तसा करावा - अशा अनेक प्रकारांनी त्याचं एक प्रकाराचं वागणं नकळत सुरू असतं.

तो त्यात्या गोष्टी बरोबर आहेत की नाही, मला गरजेच्या आहेत की नाही, मी करणं योग्य आहे की नाही, मला ते परवडणारं आहे की नाही, मला दुसरं काही करता येणं शक्य आहे का - अशा स्वरूपाचे विचारसुद्धा करताना माणूस सहसा दिसत नाही.

तसं पाहिलं तर, सर्वसाधारण परिस्थिती जरी सारखी असली तरी, प्रत्येकाची शारीरिक कुवत, बौद्धिक क्षमता, वैचारिक शक्ती, कल्पनांची झेप, त्याच्या आयुष्यात त्याच्या आवडीनिवडीच्या गोष्टी - अशा अनेक गोष्टींत तशी माणसागणिक भिन्नता असते. त्यानुसार तो तसं थोडंफार वेगवेगळं आणि आपल्या परिस्थितीला अनुकूल असं वागला तर तेच त्याच्या अधिक हिताचं असतं, सोपं असतं.

पण अगदी लहानपणी जे हे अनुकरण सुरू होतं ते तो वयस्कर झाला तरी, नकळत सुरूच राहातं. या सगळ्यामागं साध्या कुटुंबातल्या छोट्या छोट्या सत्तेपासून जगातल्या मोठ्या सत्ताधीशांपर्यंत अनुकरणाचं हे प्रकरण सुरूच राहाताना दितसं. त्यातलं एक साधं म्हणजे हवेपण-वासना.

हवेपण बाळगणं हे त्याच्या लहानपणी तो शिकतो. त्याला वासनेचं स्वरूप आहे, हे त्याला त्यावेळी माहितीही नसेल. पण आपण वेगवेगळ्या गोष्टी सतत मागत राहिलं पाहिजे, लहान असू तर हट्ट केले पाहिजेत, सांगून सुखानं मिळत असतील तर, तशा घ्याव्यात. तशा न मिळाल्या तर भांडून-तंडून, हट्टानं घ्याव्यात. या वासनामय -

इच्छामय जगाच्या राहाटीची त्याला इतकी सवय होते की, त्यात काही आपण वेगळं करतो आहोत, असंही त्याला वाटत नाही.

आश्चर्य हे की, मोठेही असेच 'लहानाचे मोठे' झालेले असतात. त्यामुळं हे मूल इच्छेच्या-वासनेच्या तावडीत अशा तऱ्हेनं नकळत सापडत जातं आहे, याची जाणीव त्यांनाही होत नाही आणि जर कुणाला चुकून झालीच तर त्याला त्यात काही गैर वाटत नाही. हवेपण - वासना हे आपल्या आयुष्याचं स्वरूपच आहे, अशी ठाम कल्पना होणं किंबहुना त्याच्या पलीकडं जाऊन आपल्याला जगता येऊ शकतं, याची जाणीवसुद्धा न होणं, यासारखी मनुष्यजन्माची हानी नाही. हे केवळ संतच जाणवून देऊ शकतील.

या वेगवेगळ्या इच्छेच्या गोष्टी, वासनेच्या गोष्टी पुऱ्या करताना काय घडतं, या मनोव्यापाराचीसुद्धा खूप कमी लोकांना कल्पना येते. भुकेसाठी अन्न मागावं, मिळवावं. ते खावं, ती इच्छा पुरी होऊन जावी आणि पुन्हा ते खाण्यातल्या कल्पनेचं सुख जरा कुठं चार तास टिकतं आहे तोपर्यंत पुन्हा भुकेची इच्छा व्हावी - आणि खाण्याच्या वासनेपोटी पुन्हा उद्योगाला लागावं, यात थोडा शरीरधारणेचा विचार सोडला तर, उरलेला सारा कल्पनेच्या सुखाचा, वासनेच्या पूर्तीचा खेळ आहे - हा मनोव्यापार संतांच्याकडं गेलं तरच लक्षात येतो.

यात सारेच अशा इच्छांचे किंवा अनिवार वासनांचे आणि त्यांच्या पूर्तीचे प्रवासी असल्यामुळं यात काही वेगळं घडतं आहे, याची जाणीव कुणाला होत नाही. जर कुणी चुकून असा प्रश्न विचारला किंवा त्याला पडला तर उलट माणसं त्याच्याकडंच संशयानं बघायला लागतात. त्यांचा भाव असा असतो की, हे सगळं स्वाभाविकच आहे. कल्पना, इच्छा, वासना, सुखं - यांपेक्षा माणसानं आणखी काय वेगळं जगायचं असतं ?

पण कृष्णदास महाराज लक्षात आणून देतात की, हे मना, तुझ्या हे लक्षात आलं का की, हे अशा तऱ्हेनं पुरं करायला, जगरहाटीप्रमाणं रहायला काही हरकत नाही. पण याचा शेवट कुठं

आहे, याचा तू कधी विचार केला आहेस का, एक इच्छा पुरी करण्यात दुसऱ्या इच्छेचं बंधन निर्माण होतं. ती पुरी करण्यात तिसऱ्या इच्छेचं बंधन निर्माण होतं.

जन्मापासून मृत्यूपर्यंत एखाद्या साखळदंडात कडीत कडी पक्की अडकलेली असावी, ती शेवटपर्यंत संपू नये आणि शेवटी त्याच कडीनं आपल्याला एका दिवशी बांधून - बंधनात टाकून मृत्यूच्या हवाली करून टाकावं आणि एवढा सामर्थ्यवान मनुष्याचा देह पशूच्या देहाच्या मोलानं मृत्यूच्या दारात फेकून द्यावा, तशी आपली अवस्था होत असते, हे आपण कधी लक्षात घेणार ?

इच्छेनं, कल्पनेनं, कल्पनेच्या सुखानं, वासनेनं मनुष्य आयुष्यभर जगतो, हे तर खरंच पण पुन्हापुन्हा जन्माला येतो आणि पुन्हापुन्हा जातो - या न संपणाऱ्या चक्रात ही इच्छांची साखळी आपल्याला बांधून टाकीत असते. म्हणून तू ओळख की,

'सदा ते जनी राहटे हीच रीति ।'

कृष्णदास महाराज म्हणतात, या जनरहाटीचा विचार कर आणि यानंच तुला बांधून घातलं आहे आणि पुढंही बांधून घालणार, हे ओळख. आपल्याला जग बांधीत नाही. लोक बांधीत नाहीत. आपल्याच इच्छा, वासना, कल्पना बांधतात, हे लक्षात घे. आपण माणूस आहोत त्यामुळं हे बंध ओळखणं आणि तोडणं आपल्या हातात आहे.

यासाठी ते म्हणतात,

'मना वासने प्राणि जन्मासि येती ।
सदा ते जनी राहटे हीच रीति ।
पुढे कल्पनेने सुखाते निवारी ।
अशी ती तुला होतसे बंधकारी !'

अशा जगरहाटीच्या बंधकारी इच्छेतून सुटून, गुरूंना शरण जाऊन, आपण आपला मुक्तीचा मार्ग चालावा !

* *

## २०. 'सदा शांति देही न भीती भवाची !'

माणसानं सुखाचा पाठलाग कितीही प्रकारे केला तरी, कुठल्या ना कुठल्या रूपानं अचानकपणे त्याच्यासमोर दुःख उभं राहातंच. अनेक मोठे जमीनदार लोक असतात. पीकपाण्याची-पैशाची पिढ्यान्‌पिढ्या कधी चिंता नसते. आजचंही पीकपाणी उत्तम असतं. निसर्गाची, बाजारभावांची साथ असते. तोट्याचा तर कधी विचारही मनात येत नाही. माणूसबळ, पैशाचं बळ - कशाला कमी नसतं. जेवढं पेरू त्यापेक्षा उगवून येतं. पेवं धान्यानंच काय पैशानंही भरून जातात.

तीच परिस्थिती एखाद्या पिढीजात व्यापाऱ्याचीही असते. एखादा व्यापार परंपरेनं चालत येतो. गावात मालाला उठाव असतोच. पण जिथं म्हणून काही नवीन कळावं, नवा बाजार कळावा, त्या गावी जावं तर तिथंही नवा धंदा हात जोडून उभा असल्यासारखा यश देतो. व्यापाराला व्यापार जोडला जातो.

तीच परिस्थिती काहींची नोकरीतही होते. बरोबरीनं लागलेली माणसं एकमेकांच्या साहाय्यानं शिकतात, कष्ट करतात, अधिक वरच्यावरच्या पदांच्या परीक्षांना बसतात. सगळ्यांचे अभ्यास, प्रयत्न, कष्ट साधारण सारखेच असतात. बुद्धिमत्तेचा फरक असतो पण तो खूप थोडा असतो. पण सारेच एका परीक्षेला एका वेळी बसूनसुद्धा, तसे सारखेच पेपर सोडवूनसुद्धा कुणी पटकन यशाची रेषा ओलांडून पुढं जातो, तो मागं बघतच नाही. दुसरी ग्रेड, तिसरी ग्रेड, चौथी ग्रेड करीत नोकरीच्या जिन्यावरनं तो कुठं जाऊन पोचतो, त्याच्या बढतीच्या जागी कुठं बदल्या होतात, हेसुद्धा कळत नाही.

त्याच्याबरोबरीनं प्रयत्नाला लागलेले कधी पहिलीच बढती मिळताना घाईला येतात तर काही खूप वर्षं धडपड करून कसेतरी एखाददुसरी पायरी ओलांडतात.

हे सारं असं दिसत असलं तरी, याचबरोबर इतकं सुरळीत चाललेलं हे जमीनजुमल्याचं गाडं कुणाच्या तरी एखाद्या शब्दानं होणाऱ्या

गैरसमजानं, कुणाच्या तरी मालकीच्या भावनेनं, वेगळेपणाच्या कल्पनेनं, अचानक एका रात्रीत बदलून जातं. एवढं मोठं जमिनीचं क्षेत्र आता तुकड्यांची भाषा बोलू लागतं. तुझं-माझं करू लागतं. समजावून सांगूनही कुणी ऐकण्याच्या मनःस्थितीत नसतं. दुःख आणि शोक असे स्वप्नात उभे राहिल्यासारखे कधी समोर येऊन उभे ठाकतील, हे सांगता येत नाही. जिवाचे कान करून आपला शब्द झेलायला तत्पर असलेला भाऊ, आता त्या जमिनीच्या मुद्यावर ऐकणं तर सोडाच, पण आपल्याकडं पाहाण्याच्यासुद्धा मनःस्थितीत नाही, हे लक्षात येतं.

हीच परिस्थिती व्यापारातही होते. व्यापाराला व्यापार जोडला जातो. गावोगावं जोडली जातात. व्यापार उदीमात मोठा फायदा असतो. पण कुणा गावच्या प्रतिष्ठितांच्या, व्यापाऱ्यांच्या ते डोळ्यांवर येतं. वरवर मदतीची भाषा इतकी वर्षं करणारे लोक आता वेळीअवेळी भेटून आपल्याला व्यापारात कसं खाली आणता येईल, याचे बेत रचताना आपल्या कानांवर येतात. इतर ठिकाणची नुकसानं तर उभी राहातातच. पण आहे ते गावातले व्यापारही हळूहळू एकेक पाऊल मागं घ्यावे लागतात. दाणे संपल्यावर पक्षी उडून जावे तसे हे चांगुलपणाचे गावचे चार साथीदार आता जरा अंतरावर राहू लागतात. इतक्या वर्षांच्या वैभवाची सवय असलेल्या माणसाला प्रपंच आपला शोकाचा धक्का देण्याचा स्वभाव, काळाच्या भीतीचा दरारा कल्पनेत नसतानाही एकदम दाखवून देऊ शकतो.

नोकरीतही असा दुःखाची जाणीवही न होता प्रगतीची नवनवी शिखरं गाठत जाणारा, त्याच नादात जगात कुठं दुःख, शोक नाहीत, कुठं भविष्याची त्या अर्थानं भवाची भीती नाही, देवधर्माचा कुठं प्रश्न नाही, संतसंगाची तर जाणीवच नाही - अशा कर्तृत्वाच्या पायऱ्या चढत जाताना बेसावध असतो आणि एखाद्या त्याला स्वतःला रास्त वाटणाऱ्या, पण एका रात्रीत नोकरीतल्या राजकारणानं फिरलेल्या बढतीत, त्याला सपशेल नकार मिळतो. उलट एखादा अपात्र मनुष्य त्याच्यासमोर त्याच्याही वरच्या जागेवर जाऊन बसतो आणि मग या

भवभयाची, प्रपंचाच्या मर्यादांची, दुःखाची, शोकाची भयाण कल्पना त्याच्यासमोर वस्तुस्थिती म्हणून उभी राहाते. तिला पर्याय नसतो.

अशा वेळीच संतांच्या सांगण्याची, त्याच्या सत्यत्वाची, त्यांनी आयुष्याला द्यायला सांगितलेल्या दिशेची कल्पना माणसाला येऊ शकते. श्री कृष्णदास महाराज म्हणतात, आजवर या प्रपंचाचा भरवसा धरून त्याच्यात कधी दुःखशोक किंवा भवभय येणार नाही, आपण असेच जिंकत सुखात राहू - अशा भ्रमांत तू राहिलास तो आता तरी सावध हो. या प्रपंचात इतका जीव लावण्यासारखं, इतकी खात्री बाळगण्यासारखं खरोखरच काही नाही. जर तुझ्या अंगी खरोखरच काही भाव असेल, काही शक्ती असेल तर तिच्या साहाय्यानं जरूर तो प्रपंच अवश्य कर पण लक्षात ठेव की, प्रपंच आपला दुःखाचा स्वभाव दाखवल्याशिवाय राहणार नाही.

तुला जर शाश्वत आणि खऱ्या सुखाचा अनुभव हवा असेल तर, काहीही कर पण हा भाव प्रपंचापेक्षा रामाच्या पायी ठेव. त्या ठिकाणीच प्रपंचाच्या कसल्याही परिस्थितीत मनाची शांतता टिकवण्याचं अलौकिक, दैवी सामर्थ्य आहे. मग तुला या अशाश्वत शोक, भीतीला सामोरं जावं लागणार नाही. या रामाच्या पायी भाव टिकवायचा असेल तर, त्यासाठी सत्संगासारखा दुसरा मार्ग नाही. कुठल्यातरी संतांच्या संगतीत कटाक्षानं राहा. राम तुला खऱ्या, शाश्वत शांतीचा अनुभव देईल. म्हणून ते म्हणतात,

'मना संतसंगे लुटी राघवाची ।
सदा शांति देही न भीती भवाची ।
जरि राम पायी सदा भाव राही ।
अणूमात्र तो दुःख शोकान्त नाही !'

* *

## २१. 'जयाला क्रियेवीण संतोष आहे !'

माणसाला सतत सवय झाली आहे ती काहीतरी करीत राहाण्याची. श्वासोच्छ्वास करणं अपरिहार्य आहे, हे खरं. ते जगायला आवश्यकही आहे. तशाच शरीरातल्या रक्ताच्या अभिसरणापासून, पचनापासून साऱ्या क्रियाही होत राहाणं गरजेचं आहे. त्या तशा आपोआप होतही असतात. विचार केला तर, लक्षात येतं की, त्यात आपण मुद्दाम म्हणून काही क्रिया करतो, असंही नाही.

फक्त परिणाम असा आहे की, या सतत चाललेल्या क्रियांमुळं काहीतरी केल्याशिवाय आपल्याला स्वस्थ बसवत नाही. वास्तविक मनुष्य रोज कर्मं करून करून कंटाळतो. आठवडाभर कर्मं केल्यावर त्याला काही न करण्यासाठी सुटीसुद्धा हवीशी वाटते. पाच दिवस जादा काम करील तर दोन-दोन दिवस काही करू नये, असा थकवा कर्मांनी त्याला येतो. म्हणून हे पाच दिवसांचे आठवडेही सुरू झाले, हे आपण पाहातो.

पण पाच किंवा सहा दिवसांच्या या कर्मांनी कंटाळलेला मनुष्य सातव्या दिवशी आता काही कर्मं करण्याची गरज नाही, असं म्हणत नाही. पोटासाठी त्याला काही काम करावं लागणं, हे यात गृहीत धरलं आहे. ते त्यानं करावंही. पण त्या पोटपाण्याच्या कर्माव्यतिरिक्त तो अजून कितीतरी कर्मं करायला पुन्हा उत्सुक होतो.

याचं कारण त्याला सतत काहीतरी करण्याचा एक आनंद मिळतो आणि नकळत एक सवय होऊन जाते. वस्तू संपली तर दुकानात जाऊन ती आणणं, हे सरळ कर्म आहे. ते सोपंही आहे आणि कमी वेळात होणारंही आहे. ते आणण्याची दुकानं, दर हेही साधारण ठरलेले आहेत. तरीही त्याला असं वाटतं की, हे जरी खरं असलं तरी आपण अजून चार-पाच दुकानं हिंडावं, चौकशी करावी, पदार्थांची-दरांची माहिती देणाऱ्या माणसांची तुलना करावी.

हे तो करतोही. पुन्हा होतं काय की, पहिल्या दुकानात जे

घ्यायचं ठरलेलं असतं. तेच पुन्हा त्याला बरोबर वाटतं. तो ती वस्तू तिथं घेतो आणि परत येतो. आल्यावर तास-दोन तास फिरल्यामुळं तो हुश्श होतो. वास्तविक त्या अर्ध्या तासाच्या क्रियेपेक्षा उरलेल्या दीड-दोन तासांच्या क्रियांनीच त्याला खरं दमायला झालेलं असतं. त्या न केल्या तरी चालण्यासारख्या असतात.

तरी, त्या दीड-दोन तासाच्या जादा क्रियांनी त्याला नकळत की काय कोणास ठाऊक, आपण काहीतरी केल्याचा संतोष होतो, समाधान मिळतं. अर्थात, मूळ कामाच्या दृष्टीनं पाहिलं तर, जादा गेलेला वेळ, झालेली फिराफीर, अकारण केलेल्या चौकशा-बोलणं - या साऱ्यांनी त्याच्या शक्तींचा ऱ्हासच झालेला असतो. ते सारं निरुपयोगीच असतं, तरीसुद्धा त्या क्रिया टाळाव्यात असं अनुभवानंसुद्धा त्याला वाटत नाही !

आपण आता मूळ क्रियांचा विचार करू. माणसाला मुळात ज्या क्रिया कराव्या लागतात त्या बऱ्याचशा शरीरानं कराव्या लागतात. मनाची त्याला थोडीफार साथ असली, विचाराची जोड असली तर, बस होतं. त्यासुद्धा क्रिया अशासाठी घडतात की, हा शरीराचा व्यापार जसा श्वासोच्छ्वास, पचन-भूक अशा क्रियांनी चालू आहे, तसाच त्या शरीराला बाहेरून ज्या पूरक वस्तू, क्रिया आवश्यक आहेत, त्या व्हाव्या.

त्यामुळं तसा विचार केला तर, जसं आपण काही नाही केलं तरी, तहानभूक लागत राहाते. पचन होत राहातं. तशा या क्रियासुद्धा निकडीप्रमाणं, शरीराच्या गरजांप्रमाणं चालू राहातील. त्या केल्यानं आपल्याला वेगळं संतोष, समाधान मिळण्याचा तसा काही संबंध नाही. एकदा जर आपला जीव चालण्याची जबाबदारी आपण शिवाशी-रामाशी ऐक्य करून सोपवली आहे तर, श्वासोच्छ्वास चालवण्याइतकं त्याला या बाहेरच्या क्रियाही चालवणं भाग पडणार आहे.

त्याचा सरळ अर्थ असा की, क्रियांसाठी जो वेगळा आटापिटा आपण करतो आहोत, तो आपल्याला वेगळा करण्याची गरज नाही. जन्माला घातलेल्या जिवानं जर शिवाशी ऐक्य साधून, तो राहिला आहे

आणि त्यात त्याचा संतोष कमीजास्त मिळण्यानं, मनासारखं होण्यानं - न होण्यानं बिघडत नाही. तर, भगवंत जी जी क्रिया करील किंवा त्याच्याकडून करून घेईल, त्यात त्याला त्या क्रियेशिवायच सदैव संतोष आहे.

आज आपल्याला ज्या आनंदाची, सुखाची, संतोषाची कल्पना आहे, ती काहीतरी आपण करण्यात सामावलेली आहे. म्हणजे हा संतोष क्रियेमुळं आलेला आहे. पण भगवंत किंवा त्या अर्थानं राम खरा कर्ता झाल्यानंतर मात्र, तो जे करील त्या क्रियेत आता आपल्याला संतोष आहे. आपल्या एरवीच्या क्रियांत मनाप्रमाणं-मनाविरुद्ध, हवं-नको - असे संतोष-असंतोष देणारे अनेक प्रकार आहेत. त्यानुसार मन खालीवरही होत असतं. पण राम कर्ता झाल्यावर त्यात कुठं असे प्रकारच नाहीत. राम करील-न करील. दोन्हींतही क्रियासुद्धा घडो किंवा न घडो आपल्याला सदैव संतोषच आहे.

म्हणून श्री कृष्णदास महाराज म्हणतात,

'जयाला क्रियेवीण संतोष आहे ।
सदा अंतरी जीवशीवैक्य पाहे ।
वसे निग्रही अर्पि बुद्धी तयाला ।
असे दास तो प्रीय या राघवाला !'

असं रामाच्या इच्छेशी एकरूप होऊन जो जाईल त्याला जन्मभर कुठल्याही क्रिया घडल्या तरी, त्याचा संतोष सदैव अबाधित राहील. त्याला रामाचं सान्निध्य सदैव राहील. मात्र त्यासाठी निग्रहानं आपली संकुचित मानवी बुद्धीमात्र रामाच्या पायी अर्पण करावी लागेल. मग कृष्णदास महाराजांच्या भाषेत, तो रामाचा खरा दास होईल !

* *

## २२. ' नसे आस बाह्यांतरी शुद्ध आहे !'

इतर प्राण्यांपेक्षा माणसाच्या ठिकाणी एक वैशिष्ट्यपूर्ण बाह्यांग आहे. पाण्यातल्या माशांपासून ते चार पायांवर जबरदस्त झेप घेणाऱ्या वाघ-सिंहांपर्यंत निसर्गाच्या क्रमातले प्रवास आपल्याला ठाऊक आहेत. शरीरानं प्राणी अधिकाधिक प्रगत व्हावा म्हणून एकाच वेळी पाण्यात, जमिनीवर, आकाशात अशी वावरू शकणारी शरीरं असलेले प्राणीही निसर्गानं वेगवेगळ्या काळी प्रयोग करून निर्माण केले आहेत.

त्यांतल्या त्यात सर्वांत मोठी झेप त्यानं घेतली ती आकाशात विहरणाऱ्या पक्ष्यांच्या रूपानं. त्यांना चार पायांवरून दोन पायांवर आणून दोन हातांचे पंख्र करून, त्यांच्या बाह्यांगात त्यानं मोठाच क्रांतिकारक बदल केला. आकाशातल्या वाहत्या हवेवर स्वार होण्याचं, वेळी धोकादायक समुद्रावरूनसुद्धा विहार करण्यासाठी उरलेल्या दोन हातांचे त्यानं विलक्षण पंख्र तयार केले. त्याचा वापर करून, एवढासा जीव असलेल्या चिमणीपासून गरुड-ससाण्यापर्यंत असंख्य प्रकारचे पक्ष्यांचे प्रयोग त्यानं केले.

पण या साऱ्यांत निसर्गाच्या हे लक्षात येत होतं की, त्याच्या परीनं हे प्रयोग फार ताकतीचे, मोठी झेप घेणारे असले तरी, ते पुन्हा बाह्यांगाचेच आहेत. प्राण्यांच्या ठिकाणची आहार-निद्रा-भयाची मूलभूत भावना हे बदल फारशी ओलांडू शकलेली नाहीत. पक्षी चिमणीएवढा असो, छोट्याशा माशाएवढा असो किंवा बलाढ्य वाघाएवढा असो - त्याच्या ठिकाणी असलेली आहारानं जगण्याची ओढ, इतर बलाढ्य किंवा बरोबरीच्या प्राण्यांची भीती - असल्या अनेक अंतरंगातल्या गोष्टी निसर्गाच्या या प्रयोगात बदलू शकल्या नाहीत.

प्राण्यांच्या अंतरंगात त्यांच्या आहाराची, खाण्यापिण्याची, दिवसाची, आग-वीज-इतर हिंस्र प्राणी यांच्या भयाची कल्पना त्यात्या क्षणापुरती, दिवसापुरती तशीच मर्यादित राहिली. कालच्या आहारावर तो आज निश्चिंत राहू शकला नाही तर, आजच्या निर्भयतेवर तो उद्या

भयमुक्त होऊ शकत नाही.

या साऱ्यावरून निसर्गाला हे स्पष्ट झालं आहे की, बाह्यांगाचे इतके प्रयोग केले तरी, शेवटी खरा विकास व्हायचा तर, आपल्याला अंतरंगातच आणि तेही विलक्षण काम करूनच करावा लागेल. म्हणून त्यानं जो माणसाचा प्रयोग केला, त्यात आधीच्या प्रयोगाप्रमाणं माणसाला दोन पायांवर आणि विकसित मणक्याच्या साहाय्यानं उभा करून संतुलित केलाच पण त्याचबरोबर त्याच्या उत्तमांगावर म्हणजे- मेंदूवर - त्यातल्या आतल्या रचनेवर त्यानं कल्पनातीत काम केलं.

त्याच्या लक्षात आलं की, हा शेवटी प्राण्याचा माणूस झालेला आहे. आहार-निद्रा-भयासारख्या भावना त्याच्या अंतरंगात प्राण्यासारख्या मूळ धरून राहणारच. काही प्रमाणात त्या कमीजास्त होऊ शकतील. पण त्याच्या ठिकाणी आणखीही खूप काम करावं लागेल तर, त्याला जी निसर्गाची, निर्मात्याची, भगवंताची, रामाची ओळख होण्याची गरज आहे, ती घडण्याची शक्यता आहे.

आज जर तो प्राण्यांसारखा अंतरंगात राहील तर तोही वेगवेगळ्या इच्छा, वासनांच्या ताब्यात राहील. काळाचं भान विसरून त्यात्यावेळी सुखाच्या वाटणाऱ्या कृती करीत राहील. त्याला हव्या असणाऱ्या, देहाला-मनाला सुखाच्या वाटणाऱ्या अशा काम्य कर्मांच्या मागं लागेल. त्यासाठी त्याला काम्य आणि निष्काम अशा कर्मांतला फरक कळेल, असं अंतरंग प्रदान करावं लागेल.

त्याला या काळाचं भान देण्यासाठी सतत सावधानतेची शक्ती, प्रसंगावधानीपणाची शक्ती अंतरंगी द्यावी लागेल. एरवीचे प्राणी त्यांच्यात्यांच्या काम्य कर्मांत गुंतून पडतात. पण माणसाला मात्र एकतर विवेकानं काम्य कर्म त्यागण्याची शक्ती द्यावी लागेल. त्याचबरोबर कर्मं करतानाही त्यापासून अलिप्त राहून, उदासीन राहून ती कशी करावी - याचीही शक्ती त्याच्या अंतरंगाला द्यावी लागेल.

अशा प्रकारच्या विशाल अंतरंगात इतक्या गोष्टी येतात की, त्याचा माणसानंच खरोखर विचार करावा आणि उपयोग करून

घ्यावा, असं लक्षात येईल. इतर प्राणी कर्म करताना जे कर्म करायचं त्याविषयी, त्याच्या फळाविषयी त्यांच्या मनात एक प्रकारची आसक्ती असते. किंबहुना कुठली आसक्ती असल्याशिवाय प्राणी कर्मं करायला प्रवृत्तच होत नाहीत.

पण माणसाला निसर्गानं इतकं विशाल बनवलं आहे की, कर्मं करण्यासाठी त्याला कुठल्याही प्रकारची इच्छा, आस बाळगणं त्यानं सक्तीचं ठेवलं नाही. म्हणूनच माणूस ही झेप घेऊ शकतो की, हा निसर्ग निर्माण करणाऱ्या या शक्तीची - रामाची इच्छा बाळगण्यापलीकडं वेगळ्या कुठल्या कर्माची आस बाळगण्याची मला इच्छा नाही ! राम ठरवील ते कर्म माझ्याकडून होईल आणि ते बरोबरच असेल ! ते कर्म करावं अशी जर रामाची इच्छा असेल तर, ते कर्म कसंही असो, ते कर्म करून मी रामाला प्रियच होईन.

आपण कल्पना करू शकतो की, बाह्यांग स्वच्छ, शुद्ध ठेवणं हे एकवेळ सोपं आहे. पण अंतरंगात अशा तऱ्हेची कुठली आस, कुठलं काम्य कर्म न ठेवता सतत सावधान राहून, कर्म करतानाही, उदासीन राहाणं यासाठी अंतरंग किती शुद्ध लागेल ?

श्री कृष्णदास महाराज म्हणतात,

'नसे आस बाह्यांतरी शुद्ध आहे ।
प्रसंगावधानी उदासीन राहे ।
नसे ठाउके काम्य हे कर्म ज्याला ।
असे दास तो प्रीय या राघवाला !'

अशा अंतरंगानं शुद्ध राहून, उदासीन राहून कर्म करून आपण राघवाला प्रिय व्हावं, हे आदर्श ठरेल !

* *

## २३. 'नसे लोकभीती जयाला कधीही !'

माणसांच्या वागण्याच्या मागं त्यांच्या इच्छा, विचार, कल्पना कारणीभूत असतात. तसा विचार केला तर लक्षात येईल की, या सगळ्याच्या मागं त्यांच्या बऱ्याच वागण्याच्या बाबतीत आणखी एक मोठी प्रेरणा कारणीभूत असते. ती म्हणजे त्यांना कळत-नकळत वाटणारं भय. अनेक माणसं, लोक व्यवहार पाळताना दिसतात. नीतिनियमानं वागताना दिसतात. कायदेकानू पाळतात. गुन्हे करणं टाळतात. पापभीरू असतात. जगाच्या व्यवहारात प्रामाणिकपणे राहताना दिसतात. हे सगळं असं असलं तरी, त्याच्यामागं त्यांना ते पूर्ण पटलेलं असतं आणि कुठंलही नुकसान झालं तरी, ते तसेच चांगले वागणार असतात, नियमानं वागणार असतात - असं मात्र नसतं.

साधे वाहतुकीचे नियमसुद्धा आज रस्त्यावरची हजारो माणसं पाळताना दिसतात. ती डावीकडून जातात, सिग्नल पाळतात, वेगांच्या मर्यादा पाळतात. प्रवेश निषिद्ध असलेल्या क्षेत्रातून गाड्या नेत नाहीत. पुढं जाणाऱ्यांना त्यांच्यात्यांच्या वेगानं पुढं जाण्यासाठी परवानगी देतात. कुठल्या कारणासाठी यंत्रणेकडून काही काळासाठी वाहतूक अडवली गेली असेल, तर ते त्याप्रमाणं वागतात. आपापली वाहनं थांबवतात.

या साऱ्या अनुभवांचा अर्थ असा होतो की, त्यांना हे सगळे नियम सर्वांच्या हिताचे आहेत, ते पटलेले आहेत आणि त्यामुळं ते नियम ते कधीही असेच पाळणार आहेत.पण आपल्या लक्षात येईल की, रस्त्यावर नियंत्रण करायला कुणी नियंत्रक पोलीस नसतील, सिग्नलच्या यंत्रणा निकामी झाल्या असतील, वेगावर नियंत्रण नसल्यास किंवा यांतला कुठला नियम मोडल्यास दंड करणारी यंत्रणा नसेल तर, यांतली किती माणसं आपणहोऊन नियम पाळतील ?

यावरून आपल्या लक्षात येईल की, नीतिनियम पाळले जातात, कायदेकानूंना धरून मनुष्य वागतो. तो वाईट किंवा चुकीचं वागत नाही, निषिद्ध गोष्टी करीत नाही, याचं कारण अनेकदा त्याला स्वतःला

ते तसं पटलेलं आहे, हे नसून तसं न वागल्यास होणारी शिक्षा, दंड, त्यापासून होणारा त्रास किंवा वेळी लोकांकडून होणारी निंदा, वेळी शिक्षा - अशा गोष्टींमुळं तो अनेकदा नियमानं, नीतीनं वागताना दिसतो.

मुळात एखादी गोष्ट बरोबर आहे, ती पटलेली आहे म्हणून विवेकानं तसं वागणं हे खरंतर अभिप्रेत आहे आणि माणसाला ते शक्यही आहे. पण विवेक एवढा परिपक्व नसल्यामुळं त्याच्याकडून आपणहोऊन असं खरं चांगलं वागणं, वेळी त्यामुळं त्रास झाला तरीसुद्धा नियमानं वागणं, हे घडताना दिसत नाही. त्यामुळं अशी भीतीची प्रेरणाच त्याला जास्त नियम पाळायला लावते. अर्थातच हे आदर्श नाही. कारण जर कुणी अशी दंड, शिक्षा करायला नसेल तर तो बेकायदेशीर वागायला तयार होईल. आपल्या स्वार्थाचं असेल, ते करून मोकळा होईल.

माणसाच्या या वागण्यांचा आणि आपलं आदर्श वागणं कोणतं असावं - याचा संत विचार करतात, ते यासाठी. त्यांना असं वाटतं की, दंडा उगारला, शिक्षा केली तर रस्त्यानं जनावरंसुद्धा नियमाप्रमाणं जातील. यात माणसाच्या जन्माचं वैशिष्ट्य काय राहिलं ? अशा तऱ्हेची कुठली शिक्षा, दंड नसताना जो विवेकानं, निर्भयपणे सरळ वागू शकतो, तो त्यांच्या दृष्टीनं खरा माणूस आहे,त्या अर्थानं खरा भक्तिमान आहे.

त्यांनी याच मुद्याचा दुसऱ्या बाजूनंही विचार केला आहे. आपल्या घरी लहान मुलं असतात. त्यांना आपण चांगलं वागण्याचे नियम शिकवतो. त्यांच्या अज्ञानामुळं त्यांना बरेवाईट परिणाम माहीत नसल्यामुळं, त्यांना आपल्याला थोडा दंड, शिक्षेचा धाक दाखवावा लागतो. तेव्हा त्यांना चांगल्या वागण्याचं महत्त्व कळतं. मग त्यांना एकदा ते पटल्यावर ती आदर्श वागू शकतात.

हीच परिस्थिती बाहेर कुठं नोकरी, उद्योगातही असते. नोकरीतसुद्धा खरंतर आपण काय वागायचं, किती काम करायचं, ते किती वेळ करायचं, कसं करायचं - याचे अनेक लिखित, तोंडी नियम असतात. आपण नोकरीला लागताना ते आपल्याला मान्यही असतं. पण जोपर्यंत मनुष्य त्या नोकरीत कायम होत नाही, तोपर्यंत नोकरी

जाण्याच्या भीतीनं त्याच्याकडून आदर्श वर्तन होतं. पण एकदा तो कायम झाला की, त्याला मनापासून, प्रामाणिकपणे, नियमाप्रमाणं कामाला न्याय देणारं, त्यानं कबूल केलेलं काम तो किती करतो ?

जसं आधी पाहिलं तसं खरंतर कुणाच्या भीतीनं आपण चांगलं वागावं यासाठी मनुष्यजन्म नाही. मलाच ते पटलेलं आहे, मी तेवढा विचार करू शकतो. ते करणं-वागणं योग्य आहे म्हणून मी तसं वागणं हे खरं मनुष्यानं निर्भयपणानं करणं आवश्यक आहे. याच गोष्टीची दुसरी बाजू म्हणजे आपल्याला ज्या कुणाचं भय वाटतं, मग तो कायदा असो, शासनयंत्रणा असो, कुणी शिक्षा देणारे न्यायाधीश असोत - ते असले की, त्यांचा धाक वाटून नियमाप्रमाणं, चांगलं वागणं हेही माणसाच्या जन्माला अपेक्षित नाही, शोभा देणारं नाही. तो असताना जशी माणसं चांगली वागतील तशीच ती तो नसतानाही, तितकीच चांगली वागतील. तर ती खऱ्या अर्थानं भक्तिमान आहेत आणि अर्थातच त्यामुळं भगवंताला प्रिय आहेत.

आपण कुणाचं भय वाटून चांगलं वागलो काय किंवा आपल्या हातात दंडशिक्षेची सत्ता आहे, म्हणून दुसरा एखादा चांगला वागला काय, असल्या प्रेरणा या आदर्श नक्कीच नाहीत. त्या दोन्हींही प्रेरणांनी माणसाच्या मनात नेहमी भय, काळजी, दुःख नांदत असतं. आपण जर या भीतीच्या कचाट्यातून सुटलो तर, आपोआपच काळजी-दुःख यांच्या तावडीतूनही नक्की सुटू. मग जे जीवन जगू ते खरं सरळ, नियमानं चालणारं, सर्वांच्या हिताचं आणि अर्थातच देवाला आवडणारं जीवन ठरेल ! म्हणून महाराज म्हणतात ते आपण लक्षात घेऊ,

'नसे लोकभीती जयाला कधीही ।
जयाचेनि योगे जना धाक नाही ।
नसे काळजी, दुःख, आनंद ज्याला ।
असे दास तो प्रीय या राघवाला !'

असं व्हायचा प्रयत्न करूया !

* *

## २४. 'जया द्वेष आनंद होऊ शकेना !'

मनुष्याचं सगळं वागणं पाहिलं तर, ते वेगवेगळ्या भेदांवर, विरोधी जोड्यांवर आधारलेलं आहे, असं लक्षात येईल. म्हणजे त्याला एखाद्या गोष्टीत मान मिळणार असेल, तर त्यासाठी तो कितीही कष्ट सोसायला तयार होईल, प्रवास करील, पैसा खर्च करील, खेपा घालील, बोलेल. पण हेच जर त्याचा एखाद्या गोष्टीत अपमान होणार असं वाटत असेल तर मात्र आता तो त्यासाठी काही करायला आपणहोऊन तर तयार होणार नाहीच, पण कुणी सांगूनही तयार होणार नाही.

या अर्थानं त्याचं वागणं वरवर पाहाता, असं कुणासाठी तरी चाललेलं दिसलं, त्यासाठी त्याला कष्ट पडताना दिसले, त्यासाठी तो पदरमोड करताना दिसला, राबताना दिसला, शब्द टाकताना दिसला, कुणाशी संबंध ठेवताना दिसला - तरी त्या वागण्याचं स्वरूप इतकं साधं-सरळ नसून त्याला पुढं या मानापमानाच्या द्वंद्वातलं जे मानाचं स्थान मिळणार आहे, त्यासाठी तो असं सगळं वागतो आहे, हे आपल्या लक्षात येईल.

हीच गोष्ट त्याच्या इतर व्यवहारांतही दिसून येईल. एखाद्याला त्याच्या कर्तृत्वामुळं, कुणी केलेल्या मदतीमुळं, भले अगदी त्याच्या नशिबामुळं एखादी गोष्ट मिळाली तर, खरंतर ती गोष्ट चांगली असेल तर, तो विषय तिथंच संपतो. फारतर हा माणूस त्याबद्दल त्याचं अभिनंदन करील. आनंद व्यक्त करील.

पण आपल्या व्यवहारात असं सहसा आढळत नाही. दुसऱ्याला कुणालातरी काही मिळालं आहे, ही गोष्ट तशी साधी-सरळ आहे. पण माणसाचं मन ती तशी घेत नाही. त्याची योग्यता नसताना, त्याला ते मिळालं. त्याच्या ओळखीच्या लोकांनी काही मदत केली असेल, त्याच्यामागं कुणी उभं असेल, इतकंच काय त्यानं काही योग्य-अयोग्य व्यवहार करून ती गोष्ट पदरात पाडून घेतली असेल, असल्या शंका मन त्याला घ्यायला लावतं.

त्यात पुन्हा आपल्याला ते जर मिळालेलं नसेल तर, मग मन आणखीच कारभार करतं. ते नुसतं असले अंदाज बांधून थांबत नाही तर, आपल्याला अशी गोष्ट मिळणं योग्य असून, ती आपल्याला मिळाली नाही आणि त्याला मात्र मिळाली, याची सारखी तुलना मनात आणून देतं. इतकंच नव्हे तर, अशी गोष्ट मिळायला आपण कसे खरे लायक होतो, आपल्याला मात्र डावललं गेलं - असल्या विचारांना मन सुरुवात करतं. मनात हळूहळू द्वेषाचं बीज माणसाला अस्वस्थ ठेवतं.

आपल्याला न मिळालेल्या गोष्टीमुळं असा कुणाबद्दल द्वेष, मत्सर वाटणं, हे नकारात्मक असलं तरी, दुसऱ्या बाजूला आणखीही काही असतं. आपल्याला अनपेक्षितपणे एखादं यश मिळालं, एखादी वस्तू मिळाली, एखादी घटना घडली तर, लगेच मनाला त्याचा आनंदही होतो. असा आनंद होताना, हा आनंद दुसऱ्याला मिळू शकला नाही, असे विचार अर्थातच मनात येत नाहीत. आपण एकटेच त्या आनंदाला पात्र होतो म्हणून तो आपल्याला मिळाला, अशा हवेत मनुष्य वावरतो.

माणसाचा समाजात वावरताना, असाच इतरांशीही वेगवेगळ्या प्रकारे संबंध येतो. काही कारणानं, आवडीनिवडींमुळं काही लोक त्याचे सहजपणे मित्र होऊन जातात. त्यांच्या मित्रत्वाच्या संगतीत तो स्वतःला विसरून जातो. पण याउलट अनेकदा त्याचं म्हणणं न पटणारे, त्याच्या स्वभावाशी न जमणारे असेही अनेक लोक समाजात त्याच वेळी वावरत असतात. त्यांचा आणि त्याचाही कारणाकारणानं संबंध येतच असतो. अशावेळी त्यांच्याबद्दल त्याच्या मनात शत्रुत्वाची, वैराची - नकारात्मक भावना वावरते. मित्रांचं चांगलं व्हावं, असं वाटता वाटता. शत्रूंचं वाईट व्हावं, असं सहजपणे त्याच्या मनात येऊन जातं.

अगदी सुरुवातीला जे म्हटलं की, मनुष्याचे व्यवहार बरेचसे भेदावर अवलंबून असतात, ते असे. मान-अपमान असो, द्वेष-आनंद असो, शत्रुत्व-मित्रत्व असो - कशावरतरी अवलंबून तो नकळत वागतो, ही वस्तुस्थिती परमार्थ करू इच्छिणाऱ्यांनी लक्षात घेण्यासारखी आहे.

कृष्णदास महाराज म्हणतात की, आपल्या या वागण्यातलं

भगवंताला-रामाला किती आणि कुठलं आवडत असेल ? त्यासाठी आपण नुसतं रामाचं चरित्र आठवलं तरी, आपल्या लक्षात येईल की, त्याच्या आयुष्यात त्याला मिळू शकणाऱ्या, त्याच्या असलेल्या अनेक गोष्टी कधी कुणा सावत्र आईनं, कधी शत्रूंनी, कधी इतर कुणी हिरावून घेतल्या आहेत. त्याचा मान-अपमान करायला मागं-पुढं पाहिलं नाही. त्याच्या अंगच्या धैर्याचा-शौर्याचा-कर्तृत्वाचा द्वेष तर रावणासारखा महाबलाढ्य, अजेय योद्धासुद्धा किती करीत होता, ते आपल्याला माहीत आहे. सर्व ठरलेलं असताना, एका रात्रीत काही विधिलिखितांमुळं एका शब्दाच्या फटकाऱ्याबरोबर सिंहासनावर बसण्यासाठी पुढं टाकलेलं पाऊल, वल्कलं नेसून वनात एकाकी जाण्यासाठी टाकणं त्याला भाग पडलं. ते ज्यांच्यामुळं घडलं ती सारी माणसं त्याला माहीत होती, त्याच्या जवळचीच होती. पण त्याला ना राज्य मिळाल्याचा आनंद झाला होता, ना ते काढून घेतलेल्यांबद्दल त्याच्या मनात द्वेष होता. त्याचं एवढं शत्रुत्व करणाऱ्या रावणाबद्दलही त्याच्या मनात व्यक्तिशः कुठलंही शत्रुत्व नव्हतं. प्रश्न होता तो फक्त नियमांचा होता. चुकांना दंड किंवा शिक्षा करण्याचा होता. त्याच अर्थानं पाहायचं झालं तर, त्याचं बिभीषणावर जेवढं प्रेम होतं, तेवढंच ते रावणावरही होतं. जेवढं मित्रत्व करू इच्छिणाऱ्या सुग्रीवावर होतं, तेवढंच ते शत्रू म्हणून पुढं आलेल्या वालीवरही होतं - अंगदावरही होतं.

म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात की, रामासारखे जर आपण झालो, या भेदांच्या पलीकडं गेलो, सर्वांशी सारखंच वागू शकलो तर, खऱ्या अर्थानं आपण भक्ती करू शकू आणि रामाला प्रिय होऊ शकू !

'जया द्वेष आनंद होऊ शकेना ।
सदा सारिखा भक्त मानापमाना ।
नसे शत्रु मित्रत्व हा भेद ज्याला ।
असे दास तो प्रीय या राघवाला !'

* *

## २५. 'असे भक्त निंदा स्तुती वेगळा तो !'

माणसाच्या जीवनात सहसा न आढळणाऱ्या ज्या काही गोष्टी आहेत, त्यांतच त्याला कुणाची निंदा-स्तुती सहन करावी लागली नाही, ही गोष्टही आहे. अगदी संन्यास घेऊन एकांतात राहिला किंवा दहा माणसांचा प्रपंच केला तरी, कसल्या ना कसल्या कारणानं त्याच्या वाट्याला निंदाही येते आणि स्तुतीही येते.

तसं पाहिलं तर, कोणताही माणूस झाला तरी, दुसऱ्या कुणाच्या मनासारखं किंवा अपेक्षेप्रमाणं काही नेहमी वागू शकणार नाही. त्याच्याबरोबर वागताना त्याच्या स्वतःच्या घरातली माणसं, त्याच्या बरोबरीचे भाऊ-बहीण, मोठा असेल तर त्याची मुलं-बाळं-सुना अशी अनेक प्रकारची माणसं त्याच्या संबंधात असतात. त्यात पुन्हा जवळ-लांब राहाणारे नातेवाईक, जुने सहकारी, शेजारी-पाजारी, मित्रमंडळी अशा अनेक व्यक्तींना त्याला जोडून राहावं लागतं.

ही सारी माणसं काही एका विचाराची नसतात. एका संस्कारात वाढलेली नसतात. प्रपंच एवढं एखादं सामान्य ध्येय सारखं असलं तरी, प्रत्येकाच्या परिस्थितीनुसार, त्याच्या आवडीनुसार त्यांच्यात्यांच्या प्रपंचाची ठेवणही वेगळी असते. त्यात एकमेकांचे संबंध गुंतलेले असल्यामुळं त्यांच्या एकमेकांच्याकडून अपेक्षाही तशा राहातात.

त्या अपेक्षा या प्रपंचांच्या ठेवणीनुसार वेगवेगळ्या असल्यामुळं त्या अपेक्षांमध्ये फरक पडतो. प्रत्येकालाच आपल्या अपेक्षेप्रमाणं त्यानं वागावं, असं वाटतं. व्यवहारानं ते काही शक्य नसतं. मग कधी कुणाच्या मनाप्रमाणं वागलं जातं, तर कधी दुसऱ्या कुणाच्या. ज्याच्या मनाप्रमाणं होतं, तो कौतुक करतो, स्तुती करतो, चांगुलपणा देतो. पण त्याचवेळी ज्याच्या मनाप्रमाणं हे होत नाही, तो मात्र त्याला नावं ठेवतो, निंदा करतो, त्याला दूषण देतो. असा प्रपंच करीत करीतच माणसाचं आयुष्य निघून जातं.

तीच गोष्ट मनुष्य ज्या गोष्टी आयुष्यात मिळवण्यासाठी

धडपडत असतो, त्याबाबतीतही होते. ज्या गोष्टी मिळवायच्या, त्याच्यासाठी तो त्याच्या परीनं धडपड करतो. प्रयत्न करतो. सारं काही त्या प्रयत्नांवर अवलंबून असतं, असं नाही. व्यापार उदीम जसा अगदी साररखं भांडवल घालून दोन माणसांनी केला तरीसुद्धा, परिस्थिती सारखी असली तरी, त्यात होणारं नफा-नुकसान यात फरक पडतोच.

तसंच या व्यवहारातही होतं. खूप कष्ट करून, कधी कमी फळ तर, कधी सहज, जाताजाता कष्ट करून अपेक्षेपेक्षा जास्त फळ त्याला मिळताना दिसतं. सामान्य माणसाच्या बाबतीत अर्थातच जास्त फळ मिळालं, लाभ मिळाला म्हणजे तो अत्यंत आनंदात असतो. तेच खूप कष्ट करून, पीक आलं नाही, अवकाळी पावसापाण्यामुळं ते वाया गेलं की, तो उदास होतो. हे सामान्य मनुष्याचं मन म्हणून ठीक आहे. ते बरोबर वाटतं.

पण आपल्याला विचार करायचा आहे, तो या नुसत्या सामान्य व्यवहाराचा नव्हे. आपला विचार मनाला उमज पडावी, हा चालू आहे. त्याला भक्तीची ओळख व्हावी, हा चालू आहे. त्यामुळं अशा प्रसंगात मला काय वाटलं, इतरांना काय वाटलं, ते कसं बरोबर होतं - एवढ्यापुरता विचार करून अर्थातच भक्तिमार्ग चालता येणार नाही.

आत्ता जे काही घडतं आहे, ते जर माझ्या रामाच्या बाबतीत घडलं असतं तर, त्याच्या या बाबतीत प्रतिक्रिया काय झाल्या असत्या? त्यांचा विचार करणं, म्हणजे भक्तीचा विचार करणं. असा विचार करायला लागलं की लक्षात येतं की, रामाच्या चरित्रातसुद्धा त्याला सगळ्या माणसांचं समाधान होईल, असं वागणं व्यवहारातसुद्धा अवघड होतं. एकाच वेळी दशरथाचं मन सांभाळणं, कौसल्येचं मत सांभाळणं आणि कैकयीचा आई म्हणून असलेला आग्रहसुद्धा ध्यानात घेणं - या सगळ्याचा मान त्याला ठेवावाच लागला. त्यात पुन्हा बरोबरीच्या लक्ष्मणाची, सीतेची नंतर आलेल्या भरताची - या भूमिकासुद्धा त्यांच्यात्यांच्या दृष्टीनं रास्तच होत्या.

हे उघडच आहे की, या प्रत्येकाच्या भूमिकेप्रमाणं वागणं,

एका व्यक्तीला व्यवहारात तर काही शक्य नाही. अशावेळी रामानं काय निवडलं, हे लक्षात घेणं म्हणजे भक्ती शिकणं आहे. सर्वसामान्य माणूस अशावेळेला त्याला स्वतःला ज्या गोष्टी कमी त्रासाच्या किंवा आवडत्या असतील, त्या निवडतो. तो म्हणतो, नाहीतरी इतरांना मला नाराज करावं लागणारच आहे, सगळ्यांच्या मनाप्रमाणं काही मी वागू शकणार नाही, त्यांची निंदा मला सहन करावी लागेलच. मग निदान आपल्याला जे आवडतं ते तरी करू.

पण राम हा आदर्श आहे, त्या अर्थानं देव आहे, त्या अर्थानं उपास्य दैवत आहे - ते या त्याच्या वेगळेपणासाठीच. त्यानं अशा धर्मसंकटाच्या प्रसंगी स्वतःला सुखाचं असलेलं - अगदी प्रजेनं स्वीकारलेलं, राजानं देऊ केलेलं, अनेकजण आतुरतेनं वाट पाहात असलेलं राज्यपद एका क्षणात बाजूला ठेवलं. त्यानं स्वतःला आवडणाऱ्या गोष्टीला प्राधान्य दिलं नाही तर, स्वतः कष्टाचं जीवन पत्करून इतर प्रत्येकानं दिलेला शब्द त्यानं पाळायचा स्वधर्म त्याच्याकडून कसा पाळला जाईल, ते पाहाणारा निर्णय घेतला.

यावेळी राम वेगळा होतो, आदर्श होतो, देव ठरतो - तो या साऱ्यामुळं. त्यानं वेळी आपल्या वैयक्तिक सुखाला, भावनांना आवर घातला. तो शांत राहिला. वावगा शब्द न बोलता काही प्रसंगी मौन राहिला आणि त्यामुळंच एवढ्या मोठ्या सार्वत्रिक संघर्षाच्या प्रसंगातसुद्धा भक्तीचा तो एक आदर्श निर्माण करू शकला. याचा अर्थ असा की, आपणही जर रामाला प्रिय होऊ इच्छीत असू तर, आपल्यालाही प्रसंगात असं संतुलित, आदर्श वागावं लागेल. म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात,

'असे भक्त निंदा स्तुती वेगळा तो ।
यथा लाभ तैसाचि संतुष्ट होतो ।
पुढे उन्मनी भोगिता मौन झाला ।
असे दास तो प्रीय या राघवाला !'

* *

## २६. 'मना प्राक्तने अंतरी वृत्ति आली !'

अनेकदा आपल्याला लहान मुलांकडं पाहिलं की, लक्षात येतं की, ती मुलं नेहमी अस्वस्थ असतात. साध्या भाषेत काही मुलं कडकडी असतात. काहीतरी हवं म्हणून त्यांची सतत किरकिर चालू असते. बरं त्यांच्या मनाप्रमाणं काही करावं तर, ती त्यानं शांत होत नाहीत. त्यावेळेपुरती ती वस्तू मिळाली की, थोडा वेळ गप्प बसतात. पण लगेच परत नवी किरकिर सुरू होते.

हे लहान मुलं असल्यामुळं लगेच लक्षात येतं. मुलांच्या आया किंवा त्यांचे वडील यांच्यात एकमेकांच्यात याच्यावर तक्रारीही सुरू असतात की, काही आणा हे मूल काही शांत बसत नाही. बरं मूल म्हणून मुलाचं काही एका जागी बसून राहाणं किंवा तासन्‌तास शांत राहाणं - असा स्वभाव नसतो, हे सगळे पालक जाणतातच. तरीसुद्धा एखाद्या वस्तूसाठी हट्ट धरणं, हे कुणीही समजून घेऊ शकतं.

अशी मुलं एखाद्या वस्तूचा हट्ट धरतात. पण ती मिळाली की, ती खूप काळ त्याच्याशी खेळतात. काहीकाहींची खेळणी तर महिनोमहिने त्यांना पुरतात. अशी मुलं ही अशा या मुलांच्या ग्रुपमध्ये असतातच. पण त्यातसुद्धा काही मुलं ही वेगळी दिसतातच. त्यांना आणलेली वस्तू, खेळणं दिवसभर काय तासभरसुद्धा पुरत नाही. मोडून, तोडून, रडारड करून अशी मुलं मोकळी होतात. पुन्हा नवीन काहीतरी त्यांना हवंच असतं.

हे मुलांच्यातलं आहे म्हणून सहज दिसतं. त्यावर मोठी माणसं, आईवडील प्रतिक्रिया व्यक्त करू शकतात. मूलच किरकिरं आहे, असंतुष्ट आहे - असं म्हणू शकतात. पण अनेकदा असं आढळतं की, लहान मुलंच नव्हे, अनेक मोठी माणसंही अशीच किरकिरी असतात, कडकडी असतात. त्यांच्या मनासारखं काहीही करा, त्यांचं समाधान होत नाही. खाणंपिणं करा, फिरायला जा, खरेदी करा, गावाला जा, तेवढ्यातेवढ्यापुरती ती माणसं तो दिवस शांत राहातात. पुन्हा परत

घरी आली की, त्यांची किरकिर सुरू होते.

यावरून एक लक्षात येईल की, याचा शोध घेण्याची गरज आहे, एवढं नक्की. जन्मतः असा एखादा स्वभाव असणं, इतक्या वर्षांचं अंतर मध्ये जाऊनसुद्धा तो स्वभाव तसाच राहाणं आणि अनेकांच्या बाबतीत तर तसंच कटकट करीत शेवटपर्यंत राहाणं, हे आपल्याला विचार करायला लावणारं आहे. संतांनी याचा विचार जरूर केला आहे. तो अशासाठी केला की, कधी नव्हे तो हा माणसाचा एवढा दुर्लभ देह लाभलेला आहे, अनेक लोक त्याचं चीज करताहेत आणि ही काही दुर्दैवी मंडळी मात्र हाच जन्म स्वतः किरकिर करण्यात आणि इतरांना त्रास देण्यात, असंतुष्ट राहाण्यात घालवतात, हे पाहून त्यांना वाईट वाटतं. त्यांचं हे नुकसान टळावं, त्यांना अशा वृत्तीची कारणं, त्याचा अर्थ - कळावा, असं त्यांना वाटतं. तो अर्थ कळला, हे कशामुळं घडतं हे कळलं तर, त्यावर संतमंडळी आपल्या अनुभवानं, तपश्चर्येनं प्रकाश टाकू शकतात. यात कुणी असा जिज्ञासू, जन्माचं चीज करायला तयार झालेला आढळला तर, त्याला विधायक मार्ग देऊ शकतात.

श्री कृष्णदास महाराज म्हणतात की, माणसाची ही जी कडकड, अस्वस्थता लहानपणापासून दिसते, तिचं कारण त्याच्या आधीच्या जन्मात आहे. मनुष्याला त्याचा जीव जगवण्यासाठी तहान-भूक दिलीच आहे. ती भागवण्यासाठी कष्ट करण्याची शक्तीही दिली आहे. त्याप्रमाणं अनेक माणसं ते करीतही असतात. त्यातून त्यांच्या गरजा तृप्त होऊन, ती माणसं शांत होतात. मग उरलेल्या वेळात मनाला शांत करणारे ग्रंथ ती माणसं ऐकतात, उपदेश श्रवण करतात, नाम घेतात, चित्ताला शांत करणारं ध्यान करतात. तशा वातावरणात राहायचा प्रयत्न करतात.

या साऱ्यांमुळं गरजेपुरती त्यांची वृत्ती अशांत असली, त्यापोटी ते धडपडही करीत असले तरी, त्यांना तेवढं केल्यावर कुठं थांबायचं, हे कळतं. ते कळलं तर, कृष्णदास महाराज म्हणतात तसं, एकदा हे पोटापाण्याचं काम झाल्यावर, मन शांत होण्यासाठी, वृत्ती शांत होण्यासाठी ते, 'म्हणोनीच अध्यात्म ते आयकावे । सदा त्वां

सिताराम चंद्रा पाहावे ।' त्यांचं म्हणणं असं की, मनात जी वृत्तींची आधी म्हटली तशी खळबळ सतत माजलेली दिसते, तिचं कारण आपण जरूर असलेल्या वेळापेक्षा जास्त राहिलेला वेळ, चित्त अस्वस्थ करणाऱ्या गोष्टींसाठी देतो. एखादा माणूस जर फार मोठ्या प्रमाणात एखादा मोठा टेप किंवा डॉल्बीसारखी यंत्रणा रस्त्यावरून जाताना अकारण ऐकत राहील तर, मिरवणूक पाच मिनिटांत पुढं जाईल पण झोपेतसुद्धा त्याच्या कानांत मिरवणुकीचे, आवाजांचे, त्या धबडग्याचे आवाज, जणू काही आत्ता चालल्यासारखे, उमटत राहातील. त्याचं झोपेतलं स्वास्थ्य जाईल. हीच अवस्था आपण बेसावध राहिल्यामुळं आपल्या मनाची झाली आहे. म्हणून कृष्ण महाराज लक्षात आणून देतात की,

'मना जे पाहावे सदा आयकावे । तयाचेचि हो अंतरी ध्यान मावे ।'

आपल्याकडं जसं म्हटलं जातं, ज्याचं ध्यान मनुष्य सतत करीत राहातो, ज्याचं चिंतन तो सतत मनात करीत राहातो, तसा तो होतो. तसं या चंचल मनाच्या बाबतीत झालेलं असतं. जन्मतः त्या मुलांच्यात जी अस्वस्थता आढळते, त्यावरून त्यांनी आधीचा जन्म कसा घालवला असेल, ते कळून येतं.

आज खरंतर लहानपणी असं होत असेल तर त्याला एकवेळ इलाज नाही. काही काळ प्रयत्न केल्यानंतर ते मन शांत, स्थिर होऊ शकेल. पण जी अशी मोठी माणसं किंवा वृद्ध माणसं अशा तऱ्हेनं मुलांसारखी किरकिर, चिडचिड, अस्वस्थपणा करताना दिसतात, त्याचा अर्थ त्यांना मिळालेल्या लहानपणापासूनच्या या संधीचासुद्धा त्यांनी चांगला लाभ घेतला नाही, हे उघड आहे. हे जाणून आता आपण पुढचा मार्ग पाहू.

* *

## २७. 'तरि या रिती ब्रह्म होशी स्वभावे !'

वास्तविक, अशा तऱ्हेनं शांत होण्याच्या ध्यानमंदिरासारख्या नदीकाठासारख्या, सत्संगासारख्या, भजनासारख्या, निरूपणासारख्या कितीतरी जागा आणि संधी उपलब्ध असतात. पण त्यांचं महत्त्व या मंडळींच्या लक्षात न आल्यामुळं, त्याचा लाभ त्यांना घेता येत नाही. ते अशा जागी नुसते जाऊन बसले तरी, निदान तास-दोन तास का होईना, त्यांचं चित्त शांत राहील. पुढं त्याचा सराव होऊन, आवड लागून, चित्ताचीही हळूहळू किरकिर करण्याची सवय कमी होईल.

त्यातसुद्धा अशा मंडळींना सगुणाच्या उपासनेचा मोठाच आधार आहे. मोठी मदत होऊ शकते. एखादं निरूपण, भजन ऐकताना, मनात सवयीमुळं विचार येऊन ते भिरभिरत राहील. पण समोर जर आपलं आवडतं देवाचं सगुणरूप असेल - कृष्ण असेल, राम असेल, पांडुरंग असेल - तर त्याच्यावर दृष्टी अनायासे एकाग्र होईल. त्या दृष्टीला लागून असलेलं मन एकाग्र होईल.

ही एकाग्रता साधताना, हळूहळू त्यात्या उपास्य दैवताचे गुण आठवतील. रामाच्या चित्ताचं स्थैर्य आठवेल. कर्तव्यांचं प्रेम आठवेल. कसल्याही परिस्थितीत अविचल राहाण्याची वृत्ती आठवेल. तसंच पांडुरंगाकडं पाहिलं तरी, त्याची सर्वांना समान पाहाणारी, सर्वांवर समान प्रेम करणारी, प्रेमळ नजर आपल्यावर पडेल. आजूबाजूच्या या संसारसागरात गटांगळ्या खाणाऱ्यांच्याकडं पाहूनसुद्धा अस्वस्थ न होता, तशातही कसं शांत राहावं, हे दर्शवणारी त्याची कमरेवर हात ठेवलेली मुद्रा मनावर परिणाम करून जाईल.

म्हणून कृष्णदास महाराज म्हणत,

'मना राधना रे सगुणी करावी ।<br>
उपास्यत्व ते निर्गुणी हेच ठेवी ।<br>
मना निर्गुणी त्वां अनन्ये असावे ।<br>
तया मुक्ति सायुज्य हे नाम पावे !'

अशी सगुणाची उपासना जर साधता आली तर, तिचा अंतरंगाच्या वृत्तीवर आपोआप परिणाम होतो. आपल्यासमोर शांत-सगुण मूर्ती असल्यावर आपोआपच या किरकिरणाऱ्या, सतत उड्या मारणाऱ्या मनाला काही क्षण का होईना, जाग्यावर बसावंच लागतं. स्थिर राहावंच लागतं. अजून त्याला सगुणाची खरी गोडी लागायची असतेच. पण ती जर एकदा लागली तर मात्र मग ते त्या ठिकाणाहून उठून जायला तयार होणार नाही.

श्री कृष्णदास महाराज लहानपणच्या या चंचलवृत्तीबद्दल सांगताना म्हणतात की, मुलांच्या ठिकाणी अशी चंचलता, किरकिर, अस्वस्थता का आली असेल ते आता स्पष्ट होईल. ते म्हणतात,

'मना प्राक्तने अंतरी वृत्ति आली ।
जयाचेमुळे ती सदा शांत झाली ।'

अशा तऱ्हेनं आपल्याच अस्वस्थपणाच्या कर्मांमुळं, शांत न बसण्याच्या स्वभावामुळं, वृत्तीला चंचलपणा येतो. ती शांत करायला आपणच संतांच्याकडून हा शांतीचा मार्ग शिकून घ्यावा लागतो.

जसं अग्नीच्या बाबतीत आपण पेटतं लाकूड चुलीतून हळूहळू मागं ओढतो. शांत करायचा प्रयत्न करतो. वेळी पाणी मारतो. त्यातली ज्वाळा, आग जसजशी कमी होत जाते, तसं ते थंड पडत जातं. शांत होतं. अकारण जळत जाणारं लाकूडही वाचतं. तशीच अवस्था मनाची आहे. श्री कृष्णदास महाराजांनी लक्षात आणून दिलं आहे की, मनाच्या बाबतीत शम आणि दम हे असेच काम करतात. मनाला थोडं शमवणं, शांत करणं, थोडा दम धरायला लावणं आणि त्या मार्गानं धीर धरायला लावणं - यांमुळं हा अस्वस्थतेचा आणि अस्थैर्याचा मनाचा मोह शांत होत जातो, नष्ट होतो आणि त्या व्यक्तीच्या मनालाही विसावा मिळतो.

बाहेरच्या वातावरणाचा आज विचार केला तर, माणसाला, त्याच्या मनाला ज्या शांततेची खरी जरूर आहे, ज्यामुळं त्याला विसावा मिळतो, त्याची कार्यक्षमता वाढते - ते सारं देण्याऐवजी त्याला आज अस्वस्थ ठेवील, नवनव्या पदार्थांची, वस्तूंची, साधनांची सतत तहान

लागेल, भूक लागेल - अशा गोष्टी वाढवण्याकडं दुर्दैवानं कल दिसतो. स्वाभाविकच इतक्या सुखसोयी लाभूनसुद्धा मनुष्य हळूहळू शांत न होता, अधिकाधिक अस्वस्थ होत चाललेला दिसतो. अनुभवानं, वयानं जसा मनुष्य हळूहळू शांत होत जायचा, तसं न होता उलट तो या आगीत आणखीआणखी पेटणारी लाकडं टाकावीत आणि ती आग भडकत जावी असा अधिकाधिक अशांत होत जाताना दिसतो.

त्यासाठी कृष्णदास महाराज म्हणतात, शमदमाचा लाभ लक्षात घ्यावा. ते श्लोकात म्हणतात,

'शमाने असा हा मना लाभ केला ।
दमाचे धिरे मोह तो नष्ट झाला ।'

अस्वस्थ चित्ताची कारणं श्री कृष्णदास महाराजांनी शोधून आपल्यासमोर ठेवली आहेत. आपल्याच कुटुंबाच्या, समाजाच्या स्वास्थ्यासाठी आपण त्याचा विचार करावा. स्वास्थ्य टिकवणाऱ्या गोष्टींसाठी अगत्यानं वेळ ठेवावा. निदान थोडा वेळ तरी शांत बसण्याची या प्रपंचातून दहा मिनिटं तरी अलिप्त, शांत राहाण्याची, ध्यानाची, सगुणाच्या उपासनेची, गुरूंना मनानं शरण जाण्याची, आपल्याला आवडत असेल, शक्य असेल तर, पूजा करण्याची - अशी कुठली ना कुठली कृती, वृत्ती शांत व्हावी म्हणून अगत्य करावी. ज्या व्यक्तींना स्वतःला असा अस्वास्थ्याचा अनुभव असेल त्यांनी तर याचा प्रयोग मनापासून अवश्य करून पाहावा. तो करताना, एरवी आपल्याला अस्वस्थ ठेवणारं मन किती शांत होतं, संकुचित मन किती विशाल होतं - याचा प्रत्यक्ष अनुभवच पाहावा. म्हणून कृष्णदास महाराज म्हणतात,

'मना आत्मनीवेदने मुक्त व्हावे ।
तरि या रिती ब्रह्म होशी स्वभावे !'

हे साधून विशालतेचा, शांतीचा आणि ब्रह्माचा अनुभव घ्यावा!

* *

## २८. 'डहाळीनं आपल्याला धरलेलं नाही !'

दिवसभरात ज्याला कसल्या ना कसल्या कारणानं अस्वस्थता येऊन गेली नाही, असा माणूस शोधावा लागेल. कित्येक माणसांना लौकिकदृष्ट्या पैसापाण्याची अनुकूलता असते. मुलं चांगली शिकलेली असतात. अनेकांची मुलं व्यवस्थित स्थिरस्थावर होऊन, देशात-विदेशात चांगली नोकरी करत असतात. यांची स्वतःची नोकरीतली पुढच्या टप्प्यातली प्रगती उत्तम असते. घरात पत्नीची साथ असते.

तरी रात्री घरी परतल्यावर दोघांच्यात रोज त्या मुलांच्या लग्नांचा विषय निघतो. अनेक प्रकारे त्याच्यावर खल होतो. मुलाला बोलायला जावं तर तो त्यावर फारसं काही बोलत नाही. कधी आई-मुलाचा संवाद असतो. त्यावेळी वडिलांना वाटतं, हिला नक्की काहीतरी माहिती असेल. हिची काही चर्चा झाली असेल. आपल्याला ती नीट सांगत नसेल.

हे सारं कोळ्यानं जाळं विणत जावं, तसं असतं. आपणच विणलेल्या जाळ्याला लटकत लटकत कोळी इकडून तिकडं जावा, तशी अशा व्यक्तींची मनं या विचारावरून त्या विचारावर जात राहातात. नुसती जात राहातात, असं नाही तर, बरोबर सतत काळजी घेऊन जात राहातात. काय व्हावं, कसं होईल, त्यातून पुढं काय निष्पन्न होईल, असे असंख्य काळजीचे विचार मनात गर्दी करीत असतात.

दुसऱ्या एखाद्या घरी वडिलांचा कुठला व्यापार असतो. दुकान चांगलं चालतं. घरी स्थैर्य असतं. परिस्थितीची अनुकूलता आहे म्हणून ते मुलाला वेगवेगळ्या कोर्सेसचं शिक्षण देत जातात. आपल्या व्यवसायाशी ते शिक्षण जमणारं असतंच असं नाही. दुकान तर याच पिढीला काय पुढच्या पिढीलाही पुरेल, असं वाटतं. पण मुलाचं वाढत चाललेलं शिक्षण पाहाता, त्याला परगावी ठेवावा लागतो. त्याचं या दुकान चालवण्याशी कितपत जमेल अशी शंका येते. परगावी त्याला असलेल्या संगतीविषयी योग्य ती खबरदारी घेऊन, मुलगा जबाबदार

असूनसुद्धा रोज मनात विचार येत राहातात.

तिथंही पुन्हा रात्री दुकान बंद करून परतल्यावर जेवणाच्या वेळी मुलाचा, त्याच्या भवितव्याचा, त्याच्या दुकानाचा विषय पुन्हा पुन्हा निघत राहातो. दोघांचेही नुसतेच अंदाज आणि आडाखे सुरू असतात. एकाला वाटतं, त्यानं हेच पुढं चालवावं. तो पुढं हेच चालवील. बाकी सगळं इथं मांडलेलं आहे, त्याचा त्याला उपयोग होईल.

दुसऱ्याला वाटतं, मागच्या पिढीला त्या धंद्यानं साथ दिली. दुकानाची स्थिती उत्तम होती. आपलं दुकान, त्याचं गिऱ्हाईक, मालाची मागणी - ही आपल्या पिढीची. बाहेरचं वातावरण एवढं बदलतं आहे. त्यात आता पुढच्या पिढीला अडकवण्यात काही अर्थ नाही. त्यांच्या शिक्षणानुसार, त्यांच्या विचारांनुसार त्यांनी त्यांची भवितव्यं घडवावीत.

असं एखादं चित्र तिसरीचकडंही असतं. एखादा कुणी साधुसंन्यासी, एखाद्या ओवरीत, देवळाच्या धर्मशाळेत विसाव्याला राहातो, साधना करतो, लोकांनाही त्याच्या येण्यानं बरं वाटतं. भेटण्यानं सात्त्विकतेचा आनंद होतो. त्याच्या वास्तव्यामुळं ते मंदिर हळूहळू ऊर्जितावस्थेला येतं. सतत उत्सव, कीर्तनं, प्रवचनं सुरू होतात. गावोगावाहून लोक येतात, जातात. शेवटी कुठंतरी वयाच्या दगदगीनं एकदम साधूही थकतो. देवळातली वर्दळ, कार्यक्रम - सारं उत्साहानं सुरू असतं. पण रात्री देवळात एकटाच आजारी अवस्थेत पडलेला असताना, साधूच्या मनातही असा कोळी जाळं विणत इकडून तिकडे जाऊ शकतो. इतका व्याप वाढला, देवाचं वैभव वाढलं, रात्रंदिवस सारं सुरू आहे, म्हटलं तर आपला एका रात्रीचा भरवसा नाही, अशावेळी एखाद्या रात्री अचानक काही झालं, आपल्याला देवाचं बोलावणं आलं तर काय होईल, इतक्या लोकांचा इतका व्याप, देवाचे इतके उत्सव, समारंभ, कार्यक्रम, लोकांची सणावारांची, पूजेअर्चेची घेतलेली जबाबदारी, अनेकांनी टाकलेले पैशाचे विश्वास, अनेकांना दिलेले शब्द - साऱ्याचं काय होईल, असा विचार करीत रात्र निघून जाते.

असं तर सगळ्या क्षेत्रांत लहानांपासून थोरांपर्यंत सगळ्या

कुटुंबांतून, घरांतून, अगदी वाड्यावस्तीतून, महालराजवाड्यांतून - सगळीकडं घडत असतं. अस्वस्थतेनं मन इकडून तिकडं नुसतंच हेलकावे खात असतं. तसं खरं पाहिलं तर, दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणं उजाडतं. बाहेरच्या वातावरणात जवळजवळ एक टक्कासुद्धा काही फरक पडत नाही. लक्षात घेण्यासारखी तशी एकच गोष्ट घडलेली असते. ती म्हणजे मनानं केलेल्या कल्पना, चर्चेत गेलेला वेळ, विचारात आणि काळजीत गेलेले तासन्‌तास - यांतलं मात्र काहीही आता परत येण्यासारखं नसतं.

पुन्हा आपण असंच करणार असू तर, माणसाच्या आयुष्यात सोन्याच्या मोलाचे असलेले असे तासन्‌तास रोजही जाऊ शकतात आणि कितीही वेळेचा कितीही काळ अपव्यय होऊ शकतो. त्यात ठरवूनही पुन्हा मागं काही आणता येणार नसतं. गेलेले तास एकदाच आणि कायमचे गेलेले असतात.

म्हणून श्री कृष्णदास महाराज हे मुद्दाम लक्षात आणून देतात की, जरा संतांच्या सांगण्याकडं लक्ष द्या. त्या मुलाचं, धंद्याचं, लग्नाचं, देवळाचं काय व्हायचं ते करायला देव समर्थ आहे. आपण कल्पना करून, उगाचच काळजीत आपला सोन्याच्या मोलाचा वेळ घालवतो आहोत. आपल्याला वाटतं आहे की, आपण काळजी करून हे होणार पण ते तसं नाही, हे सांगण्यासाठी महाराज म्हणतात, ही काळजी आपण अकारण धरून ठेवली आहे. काळजीनं आपल्याला धरलेलं नाही. ते म्हणतात, या काळजीच्या डहाळीला धरून आपणच झोके खात आहोत. डहाळीनं आपल्याला धरलेलं नाही. ते हे लक्षात आणून देतात की, प्रपंचात अनेकदा अशा अनेक काळज्या आपल्या स्वतःच्या आहेत, असं आपल्याला वाटतं. पण त्या आपण डहाळीला धरावं तशा आहेत. धरून बसलो तर काळजीचे झोके खावे लागतील. सोडून दिलं तर निश्चिंतपणे तोच वेळ सत्कारणी लावता येईल !

* *

## २९. 'विधीला तुझे नाम मोठे कळेना !'

मनुष्याला कर्म करण्याला पर्याय नाही, हे तर उघडच आहे. त्याच्या हातात मग एवढंच उरतं की, प्रारब्धानं वाट्याला येणारी काही कर्मं सोडली तर, त्याला स्वतंत्रपणे करता येण्यासारखी जी काही कर्मं आहेत, त्या कर्मांतली निवड तो करू शकतो. चांगल्या कर्मांच्या निवडीनं कर्मफळाच्या सिद्धांताप्रमाणं तो निदान हितकारक किंवा चांगली फळं येतील, याची काळजी घेऊ शकतो. अगदी साध्या भाषेत श्री तुकोबारायांनी सांगितल्याप्रमाणं फार मोठं शास्त्र त्याला कळेल-न कळेल तो निदान 'पुण्य परउपकार । पाप ते परपीडा' एवढं लक्षात घेऊन कर्मांची निवड करताना, दुसऱ्याला त्रास होणार नाही, अशी कर्मं निवडून किंवा दुसऱ्याला उपयोगी होतील, अशी कर्मं निवडून तो या कर्मांच्या बाबतीतला मार्ग काढू शकतो.

कर्म करताना जशी निवड तशी कर्म करण्याची साधनं, कर्म करतानाची मनोवृत्ती, केल्यानंतरची मनःस्थिती, कर्माच्या फळापासून अलिप्त राहाण्याची मनाची स्थिती - अशी या कर्मांच्या बाबतीतली कितीतरी प्रकारची चर्चा या कर्ममार्गामध्ये केलेली दिसेल. या सगळ्यात पुन्हा कर्म अटळ असल्यामुळं ती कुठल्याही भूमिकेनं करा, त्यांचा विचारही अटळ आहे, असं नकळत वाटतंच.

त्यातल्या त्यात ज्यांनी कर्मांचा सखोल अभ्यास केला, कर्ममार्ग घालून दिले, विशेषतः स्वधर्माची कर्मं ओळखायला शिकवली, परधर्मापासून दूर राहायला शिकवलं - अशा साऱ्यांनी मिळून कर्मयोगाचं एक मोठं शास्त्रही तयार केलं. ते पूर्वीपासून आजअखेर माणसाच्या उपयोगी पडत आलं आहे.

त्यातल्या त्यात कर्मांची निवड, ती योग्य-अयोग्य ठरवणं, त्याचे परिणाम - असल्या अनेक बाबतींत निश्चित स्वरूपाचे निकाल ठरवणं हे अनेक महान बुद्धिमंतांनाही कठीण गेल्यामुळं भक्तिमार्गी लोकांनी सर्वांना लागू असलेला, कर्म ईश्वराला अर्पण करण्याचा एक

मोठा सोपा पण परिणामकारक मार्ग शोधला, तोही पुरातन आहे.

त्यात पुन्हा कर्म करण्यापूर्वी ईश्वराचं स्मरण, करताना त्याच्या इच्छेचं स्मरण आणि कर्म झाल्यानंतर ते त्याला अर्पण - असा कर्माचा त्रिवेणी संगम घडवणारा मार्गही संतमंडळींनी शोधला, चालला आणि आपल्यासाठी विवरून ठेवला आहे.

हे सारं करताना, खरंतर कर्ममार्गाचं एक शास्त्र मुळात सांगितलं गेलं. या सृष्टीची निर्मिती करताना, सर्व मनुष्यमात्राला कर्ममार्गाचा बोध व्हावा म्हणून, ब्रह्मदेवानं स्वतः आणि विविध ऋषींच्या मुखांनी कर्मं जास्तीत जास्त आदर्श आणि चांगली कशी होतील, यासाठी वेदवेदांगांपासून सर्व मार्ग सांगून ठेवले. पण या जगाच्या रचनेचंच वैशिष्ट्य असं की, तिला कार्यकारण, कालमान, दिशा - अशी वेगवेगळी बंधनं आपोआप आली.

त्यामुळं कर्म, त्याचे परिणाम हे सारे दिक्कालात आपोआपच बांधले गेले. कर्मांची जी एकदा न थांबणारी चक्रं सुरू झाली, ती अक्षरशः जगाला व्यापून लाखो वर्षं फिरत आहेत आणि ती तशीच फिरत राहाणार हेही दिसतं आहे. निदान त्यात्या व्यक्तीपुरती त्यात्या कर्मांची आणि परिणामांची शिस्त लावावी, त्यातून त्या व्यक्तीला पुण्यकर्माचा मार्ग मिळावा, एवढा आग्रह तरी, या साऱ्या कर्मयोगाच्या रचनेत ब्रह्मदेवानं कटाक्षानं पाळण्याचा प्रयत्न केला.

पण करणाऱ्यांचे हेतू, कर्मात राहाणारे दोष, कर्मांना वळण देणारी परिस्थिती, कर्मांच्या होणाऱ्या प्रतिक्रिया आणि पडसाद - हे सारं इतकं गुंतागुंतीचं होत गेलं की, प्रत्यक्ष कर्म आणि त्यातून देवाची गाठ किंवा जिवाची मुक्ती या गोष्टी इतक्या सरळ राहिल्या नाहीत. इतकंच नव्हे तर, जन्मोजन्म जाऊनसुद्धा ही गाठ पडण्याचं लक्षण तेव्हाही दिसेना आणि आजही दिसेना. याला खरा मार्ग शोधला तो संतांनीच. त्यांनी ओळखलं की, कर्म कितीही काटेकोरपणे करायचा प्रयत्न केला तरी, ते यथासांग घडत नाही. त्यातून ईश्वराचीही गाठ पडत नाही आणि कर्मातूनही मुक्ती मिळत नाही. कर्म, त्याची फळं

भोगणं, पुन्हा जन्माला येणं, पुन्हा कर्म, पुन्हा फलभोग - असा हा न संपणारा प्रवास या कर्ममार्गामध्ये घडतो आहे.

संतांच्या मागं प्रत्यक्ष भगवंताचा अनुभव असल्यामुळं त्यांनी त्या थेट अनुभवातलं संकेत असलेलं भगवंताचं नाम उचललं. सिद्ध केलं आणि सामान्य माणसाच्या हाती अक्षरशः लुटवलं. कर्म करून पुण्यमार्गानं भगवंताची भेट घेणं - हा ब्रह्माचा कर्ममार्ग त्यांनी इतका सोपा केला की, नाम घेताघेता आपलं कर्म करीत राहिलं तर, कर्माचा लेप न लागता, साक्षात भगवंत असलेलं नामच शेवटी शिल्लक राहातं, हे त्यांनी प्रत्ययाला आणून दिलं. स्वधर्मानं वाट्याला जे कर्म आलं, ते करताकरता जर मनुष्य नाम घेईल तर, कर्म कुठलंही असलं तरी, ते कर्म अखेर नाहीसं होईल. आणि नाम, भगवंताचं अनुसंधान आणि प्रत्यक्ष भगवंतच शिल्लक राहील. मग कर्ममार्गानं वेगळं जाण्याची आणि कुठल्या संभ्रमात पडण्याची गरजच उरणार नाही.

अनेक संतचरित्रांतून हे आढळून येईल की, कर्मयोगाच्या मार्गानं कर्मात तरतम भाव केला, ती लहान-मोठी ठरवली, पाप-पुण्य ठरवली, योग्य-निषिद्ध ठरवली. त्यामुळं सामान्य माणसांचाच काय, मोठमोठ्या ऋषींचाही कर्माच्या निवडीचा निकाल देताना, गोंधळ उडायला लागला.

याउलट प्रत्यक्षात भगवंताच्या कृपेनं संत इतक्या वेगवेगळ्या परिस्थितीत जन्माला आले की, तिच्यात अशा तऱ्हेची शास्त्रानं ठरवलेली, मर्यादा घातलेली पुण्यकर्म करणं मुळातच अवघड होऊन बसलं. पण संतांनी ज्याज्या ठिकाणी जन्म घेतला, त्यात्या परिस्थितीत लागू असलेली कर्मं करताना, त्यांनी जो नामघोष लावून धरला त्यानं कर्मं तर करून संपवलीच, पण त्यात्या कर्मांच्या अंती त्यांना प्रत्यक्ष भगवंत भेटला. म्हणून कृष्णदास महाराज स्पष्ट म्हणतात,

'विधीला तुझे नाम मोठे कळेना । म्हणोनि मुखे बोलिला कर्म नाना ।
तुझीयाचि नामे महा पुण्य होते । तुझी भेट प्रत्यक्ष नाशी भ्रमाते !'

* *

## ३०. 'धरा आस तुम्ही स्वये व्हाल राम !'

एखाद्या लहान मुलाला जसं काही वेळा कळत नाही की, त्याला नक्की काय हवं आहे. ते रडतं, ओरडतं, वस्तू फेकून देतं. पण आई जाणती असते, त्यावेळेला तिच्या लक्षात येतं, या मुलाला भूक लागली आहे. मूल तर त्यावेळेला अशा अवस्थेत असतं की, त्याला दूध-पाणी दिलं तरी ते दूर लोटेल. पण आई ते ओळखते आणि भुकेपुढं त्याला आत्ता काही सुचेनासं झालं आहे, हे आईला कळू शकतं. म्हणून दामटून का होईना, त्याला दूध प्यायला लावते. अर्धं भांडं दूध गेलं की, ते मूल काही न बोलता शांत होतं आणि उरलेलं दूध पिऊन टाकतं. मग दूध पिऊन होत आल्यावर, त्याला हळूहळू हसू यायला लागतं.

संत हे अशा आईसारखे असतात. सामान्य जिवांना काय हवं आहे, ते त्या जिवांना नक्की कळत नाही, हे त्यांच्या लक्षात येतं. ती सारी मुलं पैसे माग, घर माग, माणसं माग, वस्तू फेक - असं करताना त्यांना दिसतात. पण त्यांना काहीतरी हवं आहे, हे नक्की. पण त्यांना नक्की कशाची तहान लागली आहे, भूक लागली आहे - हे जाणण्याइतपत आईचं अंतःकरण त्यांच्याकडं असतं. त्यांना माहीत असतं की, ही माणसं जरी सुखसाधनं, वस्तू-घरंदारं मागत असली तरी, या लहान मुलांच्या खेळण्यांसारखंच त्यांचं होणार आहे, ती घेतील आणि थोड्या वेळानं फेकून देतील. ती मुलं अज्ञानी असल्यामुळं त्यांना खरी तहान कशाची लागली आहे, हे त्यांना कळत नाहीये. त्यासाठी काय करावं, हे कळत नाहीये, हे ते जाणतात. ते हे ओळखतात की, वरवर जरी सारं जग या गोष्टी मागत असलं, मिळवीत असलं, टाकून देत असलं तरी, त्या जगाला, जिवाला खरी तहान लागली आहे ती - समाधानाची !

ती कळत नाही, हेच त्याच्या अज्ञानाचं आणि लहानपणाचं लक्षण आहे. एकदा त्याला जर समाधान लाभेल, थोडंसं का होईना लाभेल, तर ते या इतर वस्तू कधीच टाकून देईल आणि दुधाचं भांडं न

सोडावं तसं समाधानाची कास सोडणार नाही. फक्त त्याला ते आज कळतही नाही, मिळवताही येत नाही आणि देणाराही भेटत नाही. या साऱ्यावरच संतभेट आणि त्यांची कृपा हाच एकमेव मार्ग आहे.

आता हे समाधानच मुळात हवं आहे, हे न कळल्यामुळं ते कसं मिळवावं, हे न कळणं स्वाभाविकच आहे. संतांना तेही माहिती असतं. मुलांना अनेकदा वाटतं की, तसलं खेळणं माझ्याकडं नाही, म्हणून मी रडतो आहे. त्याला बाहेर फिरायला मिळालं, मला बाहेर फिरायला मिळालं नाही, म्हणून मी रडतो आहे. तरी, ते सारं खरं नाही. ते खरं असतं तर, या गोष्टी मिळाल्यावर, ते समाधानी झालं असतं. त्यानं त्या गोष्टी टाकल्या नसत्या, दुसऱ्या शोधल्या नसत्या. शरीरधर्म हे गरजेचे आहेत, पुरे करावे लागतील. पण त्यानं, जीव खऱ्या अर्थानं समाधानी होणार नाही, हे संत ओळखून असतात. प्रारब्धानं जसा देह आला असेल, जसे परिणाम आले असतील तसा देह त्याप्रमाणं चालेल, हे खरं. तो चालवावाही लागेल. पण त्यानं कुणी कायमचा समाधानी होऊ शकणार नाही, याची संतांना स्वानुभवानं खात्री झालेली असते.

त्यासाठी त्यांना हे माहिती असतं की, या जिवाला जेव्हा भक्तीची ओढ लागेल, त्यासाठी तो मनापासून नाम घेईल - तेव्हाच त्याला हव्या असलेल्या या समाधानाच्या खुलभर दुधाचा लाभ त्याला होईल. खोलीत पसरलेल्या अंधारात बल्ब असला, वायरिंग असलं, बटण असलं, कनेक्शन असलं तरीसुद्धा जोपर्यंत जिथून वीज येते तिथं ते कनेक्शन किंवा तो संपर्क जोडला जात नाही, तोपर्यंत खोलीत अंधार तसाच असतो. अंधारामुळं होणारी तगमग, गोंधळ, चिडचिडही तशीच असते. पण त्याच कनेक्शनच्या वायरचा एकदा संबंध या विजेशी प्रस्थापित झाला आणि बल्ब लागला, खोलीभर प्रकाश पडला की, सगळी कलकल एकदम थांबते. शांतता होते. कामं सुचायला लागतात. तशीच काहीशी अवस्था संत देतात त्या नामाची असते. जीव जसा अज्ञानामुळं गोंधळलेला, दुःखी, त्रस्त असतो, तसाच तो नामामुळं होणाऱ्या आणि ज्ञानामुळं येणाऱ्या प्रकाशानं शांत होतो, स्वस्थ होतो.

त्याच्या लक्षात येतं की, आता गोंधळण्यासारखं, त्रस्त होण्यासारखं काही नाही. देह तर प्रारब्ध आणि निसर्गाचा - कर्मांचा क्रम यांनुसार चालेल. पण आपण मात्र नामाच्या प्रकाशात रामाच्या कृपेखाली शांतपणे, आनंदानं, तटस्थपणे सारं पाहू शकू. विजेच्या बाबतीत जसं आपल्याकडची एखादी तार प्रकाश आणण्यासाठी प्रकाशाच्या ठिकाणी नेऊन जोडावी लागते, तसंच संतांना दुसराही मार्ग माहिती असतो की, मनुष्य तर स्वतः रामाचा-भगवंताचा अंश आहे. त्याच्या स्वतःच्या ठिकाणीच राम आहे - प्रकाश आहे.

आज त्याला अज्ञानामुळं त्याची कल्पना नाही. शंकेनं, गोंधळानं, त्याचा हा अंतर्यामीचा प्रकाश झाकला गेला आहे. म्हणून तो अंधारात चाचपडतो आहे. त्यासाठी आज त्याला अशा तऱ्हेची तार जोडून बाहेरच्या प्रकाशित रामाची सांगड घालून द्यावी लागते आहे. एकदा त्याला ते कळलं की, तो स्वतःच राम आहे, हा प्रकाशित आत्माराम त्याच्याच अंतर्यामी आहे तर, तो आयुष्यात कधीच अंधारात चाचपडणार नाही. आज त्यानं संतांच्या मदतीनं, नामाच्या साहाय्यानं हा समाधानाचा प्रकाश आपल्या देहात, आपल्या खोलीत आणला. पण एकदा त्या समाधानाची गोडी त्याला कळली, तो मिळवण्याची त्यानं पक्की इच्छा धरली तर, त्याच्यात स्वतःच हा समाधानाचा प्रकाशित राम होण्याची क्षमता आहे. या अर्थानं श्री कृष्णदास महाराज म्हणतात ते वचन लक्षात ठेवू,

'जरि आजि तुम्हा न भेटेल राम ।
धरा आस तुम्ही स्वये व्हाल राम !'

कृष्ण महाराजांच्या स्वतः राम होण्याच्या, स्वानुभवाच्या या पावनपथावर श्रद्धेनं आणि निश्चयानं वाटचाल करून, आपल्यालाही हा शाश्वत समाधानाचा राम गाठता यावा, अशी आपण त्यांच्या चरणी प्रार्थना करूया..!

* *

## परिशिष्ट : कृष्णधाम व श्री कृष्ण महाराज यांचा संक्षिप्त परिचय

● कृष्णधामविषयी थोडक्यात माहिती -

संतछाया हॉलमध्ये ज्या अनेक संतांच्या प्रतिमा उपासनेसाठी लावलेल्या आहेत आणि संतनमनमाला म्हणून त्यांचं नित्य स्मरण केलं जातं, त्यांत श्री कृष्णदास महाराजांची तैलचित्रातली प्रतिमा आहेच. कृष्णधामशी किंवा या उपासनेशी परिचित असणाऱ्यांना कृष्णदास महाराजांचे अभंग, त्यांचा उपदेश, जीवनचरित्र - यांची पूर्वकल्पना असेलच. पण इथून प्रसिद्ध होणाऱ्या इतर अनेक प्रकाशनांच्या निमित्तानं संतछायेशी, संतनगरीशी परिचित झालेल्या जिज्ञासू मंडळींना श्री कृष्णदास महाराजांची अशी माहिती कदाचित पोचलेली नसेल. एक संदर्भ म्हणून त्यांना उपासनेसाठी याचा उपयोग व्हावा, म्हणून उपदेशाच्या विवरणाच्या या पुस्तकाच्या परिशिष्टात श्री कृष्ण महाराजांची चरित्रात्मक माहिती थोडक्यात देण्याचा प्रयत्न करीत आहे. अधिक माहितीसाठी साधकमंडळींनी श्री गुरुबंधू मंडळाचं 'श्री गुरुबोध' हे प्रकाशन कृपया पाहावं.

कृष्णधाम हे समाधिस्थान सातारा-रहिमतपूर रोडवर नव्या सातारा एमआयडीसीच्या कॅनॉलच्या स्टॉपपासून आत जाणाऱ्या चार चाकी गाड्यांच्या सुमारे सव्वा कि.मी. च्या रस्त्यावर कृष्णेच्या काठी वसलेलं आहे. समाधिस्थानी पूर्वकल्पना दिल्यास साधकांची उपासनेची व प्रसादाची सोय होऊ शकते.

त्याविषयीची माहिती घेण्यासाठी त्यांनी कृष्णधामला सेवेसाठी वास्तव्य करणारे श्री. शामराव नाळे (९४२३० ३४९३३) तसंच गुरुबंधू मंडळाचे अध्यक्ष, सातारा शहरात वास्तव्यास असलेले श्री. बाळासाहेब चावरे (९८५०० ३८३३३) यांच्याशी अवश्य संपर्क साधावा.

***

● जिज्ञासूंसाठी श्री कृष्णदास महाराजांविषयी परिचय -

(गुरुबोधातून संक्षिप्तपणे उद्धृत माहिती)

श्री कृष्णदास महाराज तथा गुरुदेव हे संतपदी पोचलेले गुरुभक्त. रत्नागिरी जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील त्र्यंबक हे गुरुदेवांचं जन्मस्थान. तिथलं आपटे घराणं हे त्यांचं आजोळ. जवळच चिंदर म्हणून गाव आहे, ते यांचं गोगटे घराण्याचं गाव. आजोळी आषाढ वद्य ५ शके १८०३, तारीख १५-७-१८८१ रोजी त्यांचा सकाळी १० च्या सुमारास जन्म झाला. त्यांचं नाव कृष्ण, असं ठेवलं. संपूर्ण नाव कृष्णाजी दत्तात्रेय गोगटे. गुरुदेवांचं बालपण व मराठी शिक्षण त्र्यंबक व चिंदर येथे झालं. त्यांची मराठी व मोडी दोन्ही अक्षरं सुंदर होती. तसंच गणित विषय उत्तम होता.

जवळच्या एका गावच्या शाळेतील शिक्षक रजेवर गेले असता, गुरुदेव बदली म्हणून काही दिवसांकरता त्यांच्या जागी गेले होते. ते पुन्हा घरी परतलेच नाहीत. अध्यापनाच्या ओढीनं ते प्रथम बाहेर पडले. ते कोकणातून सुमारे १९०० साली सांगलीला आले. सांगलीत त्यांनी मंगलमूर्ती विद्यालय सुरू केलं. त्याच काळात आपल्या शिक्षणक्षेत्रातल्या अध्ययन-अध्यापनाच्या ओढीबरोबरच त्यांच्या ठिकाणी पूर्वसुकृतानं उत्तम वैराग्य आणि ईश्वरभक्ती प्रफुल्लित झाली होती. त्यावेळचा त्यांचा दिनक्रम पाहिला तरी, याची कल्पना येऊ शकते.

अनेकांची कल्पना भक्तिमार्गाची वाटचाल ही गुरुभेटीनंतर किंवा काही नामस्मरण, वाचन अशा लौकिक साधनेनं सुरू होते. पण भक्तिमार्गाच्या वाटचालीत याबरोबरच आचरणाचे आणि वृत्त्यंतराचे अनेक गुण, पैलू असतात. ते ज्यांच्या आचरणात कटाक्षानं आधीच येतात, त्यांची अनेकदा भक्तिमार्गाची खरी आचरणाची वाटचाल नकळत आधीच होते. अशा उच्चकोटीच्या भक्तांमधले गुरुदेव हे एक श्रेष्ठ भक्त होते.

सांगलीत आल्यावर त्यांनी सुरू केलेली मंगलमूर्ती विद्यालय

ही शाळा सांगलीच्या सराफकट्ट्याच्या कोपऱ्यावरच्या गोरे वकिलांच्या वाड्यात सुरू केली होती. त्या जागेतच ते पंचा, धोतर व उपरणं पांघरून राहात. पहाटे चारला उठून गणपती मंदिराच्या मागच्या माईसाहेबांच्या घाटावर ते स्नानाला जात. तिथून पहाटे पाचच्या सुमाराला तांब्याची घागर भरून ती खांद्यावरून वाहून आणीत आणि त्यावेळी हातात एक पाण्याचा तांब्याही भरलेला असे. ते येताना ओल्या पंचाने मुक्कामी येत. शाळेत आल्यावर धूतवस्त्र नेसून, उपरणं पांघरून भूपाळ्या म्हणत असत. भूपाळ्या झाल्यानंतर मनाचे श्लोक आणि दासबोधाचं वाचन करीत. त्याकाळीही त्या शाळेत साठ विद्यार्थी होते. त्यांना चार आणे फी असे. त्याचे जे पंधरा रुपये जमत त्यातून ते जागेचं भाडं देऊन उरलेल्या पैशातून साऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या गरजा भागवीत. स्वतःजवळ या फीमधला एक पैसाही ठेवीत नसत. त्याअर्थानं ते निर्धन रहात. ही सारी गुरुप्राप्तीसाठीची साधनाच होय.

त्यांची निःस्पृहता आणि वैराग्य असं असे की, ते मधुकरीही मागत नसत तर, सांगलीला जी वेदपाठशाळा होती त्या पाठशाळेला सांगलीकरांच्या सरकारी वाड्यातून अन्न दिले जात असे. ते वाहून न्यायचं काम मजुरीनं होत असे. हे अन्नाचे हारे नेण्याचं काम त्यांनी मिळवलं होतं. त्यावेळच्या कामाची मजुरी म्हणून काही अन्न मिळे. ते मजुरीचं अन्न घेऊन ते जुन्या मुरलीधर मंदिरात जात आणि जरूर तेवढं अन्न खाऊन, उरलेलं तिथंच रोज दान करून टाकीत. पराान्न न घेण्याचा त्यांचा नियम असे.

त्यांच्या ओळखीची आणि स्नेहातली अनेक मंडळी गावात निर्माण झाली असली तरी, त्यांच्या कार्यप्रस्थाला ते जात पण कुठं जेवण घेत नसत. त्याकाळी ते सातत्यानं गणपतीची उपासना करीत. सुस्वर गळ्यानं गणपतीची भजनं म्हणत. गजाननाचा जप करीत. नित्यनेमानं सांगलीच्या जवळ असलेल्या हरिपूर वाटेवरच्या गणपतीच्या दर्शनाला ते रोज न चुकता जात. गणपतीच्या निष्ठेच्या उपासनेबरोबरच ते अत्यंत निष्ठेचे समर्थभक्त होते.

विद्यार्थी व शिक्षण या क्षेत्रांसाठी ते स्वतः विद्येची देवता असलेल्या गणपतीची उपासना करीत आणि मुलांकडूनही ती करून घेत. त्यासाठी दर संकष्टीला शाळेतल्या सर्व मुलांना हरिपूरच्या या बागेतल्या गणपतीच्या दर्शनासाठी घेऊन जात.

गुरूंची कृपा व्हायला पूर्वपुण्याईबरोबरच त्यांनी निःस्पृह आचरण, निरपेक्ष विद्यादान, आचारशुद्धी, श्री गणपतीची उपासना, श्री समर्थांची वाङ्मयभक्ती, निरंतर अध्यात्म अभ्यास - हे जे कार्य अक्षरशः भगीरथाच्या निष्ठेनं आणि चिकाटीनं केलं त्यापोटी त्यांना सांगलीतच गुरुप्राप्ती झाली. त्यांनी 'गुरुकृपा भागीरथी' या अभंगामध्ये जो स्वानुभव दिला आहे, त्यातून याला प्रमाणभूत पुष्टी मिळते.

प्रत्येक जिज्ञासू आणि मुमुक्षू जिवाची भगवंताशी गाठ घालून देण्यासाठी, त्याला त्या प्रयत्नांत अनुग्रह, नाम, सत्संग - या मार्गांनी मदत करण्यासाठी, भगवंताच्याच योजनेनं गुरुकृपेची ही गंगा अनादि काळापासून अविरत वाहाते आणि पुढंही वाहात राहील. भौगोलिक दृष्ट्या किंवा जिवाच्या प्रारब्धानुसार या एकाच गंगेपासून निघालेला कुठला प्रवाह त्या जिवापर्यंत पोचावा आणि तो केव्हा पोचावा, याचीसुद्धा ईश्वरी यंत्रणा फार विशाल आहे. या प्रवाहांना अनेकदा माणसं संप्रदायाचं स्वरूप देत असली तरी, तो केवळ या व्यवहारासाठी जसा नामरूपाचा भेद असावा, तितकाच बाह्य भेद समजावा लागतो. अंतरंगातलं भगवंताकडून आलेलं आणि साधकाला पावन करून भगवंतापर्यंत परत पोचवणारं भागीरथीचं पवित्र पाणी कुठल्याही प्रवाहात तेच असतं.

श्री गुरुदेवांच्या या आधी वर्णन केलेल्या पूर्व तयारीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याकडं ही गुरुपदाची जी भागीरथी प्रवाहित होऊन पोचली ती श्री निंबरगी महाराजांकडून आलेल्या चिमड संप्रदायातली. निंबरगी महाराजांनी श्री रघुनाथप्रिय साधुबुवा महाराज यांना, तसंच श्री रामभाऊ यरगट्टीकर महाराजांना अनुग्रह आणि अनुग्रहाचा अधिकार दिला होता. त्यावेळी बाबासाहेब मुजुमदार म्हणून सांगलीतले अध्यात्मातले एक अधिकारी होते. ते मुधोळ संस्थानात कोर्टात मुन्सफ

होते. ते चिमडला सत्संगासाठी जात असत. सांगलीहून आपल्या कामाच्या गावी मुधोळला जाता-येता वाटेत चिमडला त्यांचं जाणं-येणं सुरू झालं. त्यांना श्री रामभाऊ महाराजांची आणि परमार्थाची हळूहळू इतकी ओढ लागली की, त्यांनी रामभाऊ महाराजांकडून अनुग्रह घेतला. श्री. मुजुमदार यांची अध्यात्मातली प्रगती पाहून, श्री. मुजुमदार यांना त्यांच्या गुरूंनी नाम देण्याचा अधिकार दिला. कालांतरानं मुजुमदार साधनेसाठी नोकरीचा त्याग करून आपल्या गावी सांगलीत स्थिर झाले. चिमडला जाणाऱ्या ज्या मंडळींची श्री. मुजुमदार यांच्याशी जवळीक होती व त्यांच्यावर श्रद्धा होती आणि विशेषतः जे सांगलीच्या परिसरात राहात होते, अशी श्री रामभाऊ महाराजांची मंडळीही मुजुमदार यांच्याकडं नित्यनेमानं उपासनेला, सत्संगाला जाऊ लागली. अशा मंडळींची सोय व्हावी म्हणून मुजुमदार यांनी आपल्या सांगलीतल्या घराजवळच एक मोठं घरही भाड्यानं घेतलं होतं. ते जेव्हा चिमडला जात, त्यावेळी प्रथम त्यांचा या श्री राजाराम महाराज तथा बापू यांच्याशी संबंध आला. राजाराम महाराज हे पूर्वायुष्यात म्हणजे त्याकाळी रेल्वेत स्टेशन मास्तरच्या हुद्दयावर होते. कुडची किंवा रायबाग अशा स्टेशनांचे ते स्टेशन मास्तर असल्यामुळं तिथून चिमड जवळ होतं. अनेक सुशिक्षित, विद्वान माणसं त्यामार्गे चिमडला जात, हे त्यांनी पाहिलं.

रेल्वेच्या नोकरीत असताना, त्यांना श्री साधुबुवा व रामभाऊ महाराजांच्या आलेल्या संपर्कामुळं देवमार्गाची गोडी लागली. त्यांची तयारी पाहून, श्री रामभाऊ महाराज यांनी श्री राजाराम महाराज यांना अनुग्रह व अनुग्रहाचा अधिकार दिला. श्री राजाराम महाराज यांनी आपल्या नोकरीतून आणि प्रपंचापासून मुक्त होऊन साधनेला वाहून घेण्याचा निर्णय घेतला.श्री. मुजुमदार यांच्याबरोबर जी मंडळी सांगलीला आली, त्यांच्याचबरोबर श्री राजाराम महाराज कर्नाटकातून साधनेसाठी सांगलीला येऊन राहिले. मुजुमदार यांनी घेतलेल्या या भाड्याच्या जागेमध्ये राहून, जवळच असलेल्या कृष्णा नदीचं स्नान आणि दिवसभर त्या जागेत उग्र तपश्चर्या करून, त्यांनी साधनेत अधिकार प्राप्त केला.

मुजुमदारांच्यामुळं त्यांना रोज गुरुसहवास मिळे तसंच या साऱ्या संप्रदायात श्री समर्थांचा दासबोध हा ग्रंथ प्रमाण मानला गेला असल्यामुळं विशेषतः त्यावरील निरूपण, चर्चा - यांचा लाभ होई.

निंबरगी महाराजांपासूनचा संप्रदाय मुळात कर्नाटकात प्रचलित असला आणि त्यातली बरीचशी मंडळी कन्नड भाषिक असली तरी, त्यांचे प्रमाणभूत ग्रंथ मराठीतला दासबोध आणि समर्थ वाङ्मय हेच होते. समर्थभक्तीचा, रामभक्तीचा हा भागीरथीचा प्रवाह असा निंबरगीमार्गे श्री राजाराम महाराज यांच्यापर्यंत येऊन पोचला. श्री राजाराम महाराज यांना त्या काळी श्री बापू म्हणत. या बापूंवर श्री मुजुमदार महाराज यांचं फार लक्ष होतं व साधनेमुळं त्यांच्यावर विशेष प्रेमही होतं. अखेर त्यांची परीक्षा घेऊन खात्री झाल्यावर त्यांनी श्री राजाराम महाराजांना म्हणजे बापूंना नाम देण्याची अनुज्ञा दिली.

श्री मुजुमदार यांच्या प्रवचनाला गावातील जी इतर साधनी मंडळी जात, त्यांत श्री. गोपाळराव करंदीकर आणि श्री. श्रीपादराव कानेटकर हेही जात असत. त्यांनीही मुजुमदार साहेबांना अनुग्रहाची विनंती केली. त्यावेळी त्यांनी या उभयतांना श्री राजाराम महाराजांकडे अनुग्रहासाठी सोपवून दिलं. यावरून श्री राजाराम महाराजांवर त्यांच्या गुरूंची कृपा किती होती आणि राजाराम महाराजांची ही भक्तिपरंपरा चालवण्याची तयारी किती झाली होती, याची कल्पना येते. श्री. करंदीकर व श्री. कानेटकर यांची परीक्षा घेऊन, त्यांचा साधनेतला अधिकार पाहून श्री राजाराम महाराज यांनी त्यांना अनुग्रह दिला.

याच काळात या श्री. गोपाळराव करंदीकर यांचा श्रीमंगलमूर्ती विद्यालय चालवण्याच्या निमित्तानं सांगलीत वास्तव्य करून असलेल्या श्री कृष्णदास महाराज अर्थात त्या काळात श्री. कृष्णाजी दत्तात्रय गोगटे म्हणून प्रसिद्ध असलेल्या या गोगटेमास्तरांशी संपर्क आला. त्यांच्या विद्यालयात १९०३ मध्ये श्री. करंदीकरांनी आपल्या श्री. अनंत या मुलालाही शिक्षणासाठी दाखल केलं. श्री. गोगटे यांच्याशी संपर्क जास्त येत गेला. त्यातून या गोगटेमास्तरांचं वैराग्य, त्यांची गणपतीची व

समर्थांची उपासना, ईश्वरभक्ती, निःस्पृह वागणूक, विद्यार्थ्यांसंबंधीची तळमळ, वैयक्तिक साधना - या साऱ्यांचा प्रभाव श्री. करंदीकर यांना फार प्रकर्षानं जाणवला. उभयतांचा स्नेहसंबंध दृढ झाला.

श्री. करंदीकर आपले गुरू श्री राजाराम महाराज यांच्याकडं नित्यनेमानं जात असल्यामुळं, त्यांचाही विषय या संबंधात चर्चिला गेला. त्यातून एक दिवशी श्री. करंदीकर श्री. गोगटेमास्तरांना आपल्याबरोबर श्री राजाराम महाराजांच्याकडं घेऊन गेले. श्री राजाराम महाराज आणि श्री. गोगटेमास्तर म्हणजेच कृष्णदास महाराज यांची ही पहिली भेट.

श्री. गोगटेमास्तरांना पाहाताच, श्री राजाराम महाराजांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. त्यांचा कंठ भरून आला. ते श्री. करंदीकरांना आपणहोऊन म्हणाले, 'गोपाळराव, ही मूर्ती कोण ? मला त्यांची ओढ का वाटावी ? रामरायानं त्यांना माझ्याकडं पाठवून दिलं आहे, असं दिसतं !' श्री. करंदीकरांनाही याचा आनंद झाला आणि त्यांनी श्री. गोगटेमास्तर यांना आपण नाम द्यावं, अशी विनंती केली. त्यानंतरच्या गुरुवारी श्री. करंदीकर यांच्या घरी श्री. गोगटेमास्तर तथा श्री कृष्णदास महाराज यांना श्री राजाराम महाराज यांनी नाम दिलं. पूर्वपुण्याई, मधलं निःस्पृह कार्य आणि त्या काळातली स्वतः केलेली तीव्र उपासना - यांमुळं निंबरगीहून आलेली, ही 'गुरुकृपेची भागीरथी' श्री राजाराम महाराज यांच्यामार्फत श्री कृष्ण महाराज यांच्या भेटीला आली, ती अशी. हेच गोगटेमास्तर 'कृष्णा रामदासी' झाले !

पहिल्या भेटीतच एकदम नाम द्यायला तयार झालेले राजाराम महाराज त्यांना 'मूर्ती' म्हणतात, यावरून कृष्णदास महाराजांच्या पूर्वतयारीची कल्पना तर येतेच, पण त्याचबरोबर राजाराम महाराज पुढं नाम देण्यावरून म्हणाले की, 'यांची तयारी पाहाता, नामाच्या या बीजमंत्राचा वृक्ष व्हायला वेळ लागणार नाही !'

आधीच्या साधनेच्या पार्श्वभूमीवर श्री. गोगटेमास्तरांना शिक्षणाचं, विद्यार्थ्यांचं महत्त्व आणि प्रेम राहिलं तरी, राजाराम

महाराजांच्या कृपेनंतर लौकिक प्रपंचाचा राहिलेला थोडासा पसाराही आवरता घ्यावा, असं त्यांना वाटू लागलं. त्यांची साधना तीव्र झाली. त्या काळात त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी - त्यांची गोगटेमास्तर म्हणून ओळख आणि त्यांनी दिलेले संस्कार - आयुष्यभर विसरले नाहीत, याच्या अनेक घटना आहेत. परंतु श्री राजाराम महाराजांच्या अनुग्रहानंतर, गोगटेमास्तरांचा सारा दिनक्रम आणि ध्येय मात्र श्री गणपती, श्री समर्थ, श्री रामराय यांच्या दिशेनं पूर्ण वळले. श्री समर्थांची आणि रामरायाचीही त्यांच्या जीवनाला शिक्षणाकडून पूर्ण परमार्थाकडं वळवण्याची एक इच्छा होती, असं दिसून आलं.

त्यामुळं सांगलीच्या विद्यालयात काम सुरू असतानाच, त्यांना समर्थांचा दृष्टांत झाला आणि त्यावर्षी सज्जनगडावर पाण्याची तीव्र टंचाई पडली. ती दूर करण्यासाठी, गडावर पाणी वाहून आणण्याची, त्यांना समर्थांची आज्ञा झाली. सांगलीतला व्याप तसाच टाकून, समर्थांच्या आज्ञेप्रमाणं ते सज्जनगडावर आले. कावडीनं पाणी वाहून, पुढचा पाऊसकाळ येऊन, ही टंचाई निवळेपर्यंत ते गडावर राहिले. ते प्रसिद्धिपराङ्मुख असल्यामुळं त्यांनी स्वतःची माहिती कुणाला होऊ दिली नाही. त्यामुळं लोक त्यांना 'पाणकेबुवा' म्हणून त्या काळात ओळखत. समर्थसेवेनं त्यांचं हे वैराग्य आणखीच तीव्र झालं.

समर्थकार्य संपताच सांगलीच्या व्यापाकडं पूर्ण पाठ फिरवून त्यांनी आपलं आयुष्य ध्यानधारणेला व नामाला वाहून घेण्यासाठी सज्जनगड सोडला आणि माहुलीच्या घाटावर वास्तव्य केलं. ब्रह्मचर्य पाळून, मधुकरी मागून, ते प्रथम आईसाहेबांच्या घाटावर राहिले आणि १९१२ नंतर ते त्या घाटासमोरच्या रामेश्वर घाटावर मंदिराच्या ओवरीत, उपासना करून अंतकाळापर्यंत राहिले. ते रामाचं नवरात्र रामेश्वर घाटावरच्या राममंदिरात करीत. पण १९१५ च्या रामनवमीला या वर्षी नवरात्र नाही, म्हणून त्यांनी सूचक उद्‌गार काढले आणि चैत्र शु ।। ६ दि. २२ मार्च रोजी रामेश्वर घाटावर रामासमोर अंतकाळ गाठला.

।। श्रीराम ।।

# डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

## (आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

**३५. साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

**३६. मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

**३७. बोधपाठ :** आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

**३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) :** आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

**३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) :** जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

**४०. गुरुतत्त्वतरंगिणी :** गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

**४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत**

**४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation**

**४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :**
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

**५५. शिदोरी :** व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

**५६. विचारविसावा :** विसावा देणारी विचारांची विद्या

**५७. सारविस्तार भाग २ :** चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

**५८. महाराजांची शाळा :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

**५९. साधनपदावली भाग २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

**६०. आरतीपुष्पमाला :** डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

**६१. विनवणीची वाणी :** चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

**६२. श्रद्धेची पहाट :** खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

**६३. उपासनामाला :** येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

**६४. पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

**६५. अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**६६. कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

**६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

**६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

**६९. संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

**७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

**७१. उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

**७२. अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७३. श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

**७४. अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७५. अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

**७६. जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

**७७. स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

**७८. वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**७९. अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

**८०. वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**८१. भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

# पावनपथ

श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग